# १

# सामाजिक, राजकीय धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

**घटक रचना**


१.१ उद्देश्य

१.२ प्रस्तावना

१.३ शिवकालीन राजकीय पार्श्वभूमी

१.४ शिवकालीन प्रशासन व्यवस्था

१.५ शिवकालीन महसूल व्यवस्था

१.६ शिवकालीन अर्थकारण

१.७ शिवकालीन समाज व संस्कृती

१.८ शिवकालीन वाङमयविश्व

१.९ समारोप

१.१० संदर्भग्रंथ

१.११ प्रश्नावली


## १.१ उद्देश्य :

- शिवकालीन राजकीय पार्श्वभूमी आढावा घेणे
- शिवकालीन प्रशासकीय व्यवस्थेची माहिती करून घेणे.
- शिवकालीन अर्थव्यवस्थेचा आढावा घेणे
- शिवकालीन समाज, संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करणे
- शिवकालीन वाङ्मयनिर्मिती आढावा घेणे.

## १.२ प्रस्तावना :

शिवपूर्वकालीन समाज हा पारंपरिक, गतानुगतीक, स्थितीप्रिय, उदासीन, तटस्थ होता. वतनासक्ती आणि वतनाविषयीचे प्रेम होते. वतनासाठी खून, मारामाऱ्या हा नित्याचा भाग होता. राज्य कोणाचे, राज्यकर्ते कोण, त्यांचा धर्म कोणता यांविषयी समाजाला काही घेणेदेणे नव्हते. अस्मिता आणि चैतन्य नसलेला, लोळागोळा होऊन पडलेला हा समाज होता. अशा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शिवाजीराजांनी स्वराज्याच्या, मुक्ततेचा आनंद आणि अस्मितेचा विचार रुजविला . सामान्य लोकांच्या असामान्य कर्तबगारीचा आणि हौतात्म्य पत्करण्यासाठी तयार असणाऱ्या शेकडो लोकांनी फुलविलेला हा ताटवा श्रीशिव छत्रपतींची महत्ता अधोरेखित करतो. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात सर्वसामान्य लोकांना राज्य आपले आहे, असे वाटणे ही घटनाच मोठी अनोखी होती. एखाद्या घराण्याचे राज्य, राजाचे राज्य असे मानण्याच्या या काळात हे राज्य आपले आहे, राज्य आणि राज्याच्या सुरक्षिततेत आपलीसुद्धा सुरक्षितता आहे आणि म्हणून हे राज्य टिकविणे

आपली जबाबदारी आहे, ही भावना समाजमनात निर्माण करणारा भारतीय इतिहासातील शिवाजी राजा हा एकमेव लोकनेता आहे. स्वराज्याची आणि स्वातंत्र्याची निर्माण केलेली ही प्रेरणा किती प्रभावी होती आणि खोलवर रुजली होती, याचा प्रत्यय मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंडात येतो. राजा नाही, राज्य नाही, राजधानी पडलेली, महाराणी शत्रूंच्या कैदेत, युवराज कैदेत, सैन्य नाही, संपत्ती नाही, शस्त्रसामग्री नाही तरीही या संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीच्याविरुद्ध अथक लढण्याची प्रेरणा ही इतिहासातील एकाकी, एकमेव घटना आहे. या प्रेरणांची निर्मिती हे श्रीशिवछत्रपतींचे सामर्थ्य आहे.

## १.३ शिवकालीन राजकीय पार्श्वभूमी :

**मराठी सत्तेचा उदय**

'ब्रिटीशांनी भारत जिंकला तो मराठी सत्तेचा बिमोड करून' – ग्रँड डफच्या या विधानावरून मराठी सत्तेचे भारतीय इतिहासातील महत्व लक्षात येते. छत्रपती शिवाजींनी तोरणा जिंकला ( इ.स. १६४६ ) आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली.

**मराठी सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी**

महाराष्ट्राचे भौगोलिक वेगळेपण, संतांचे सामाजिक, धार्मिक सुधारणांचे प्रयत्न, त्यातून झालेले सामाजिक संघटन, दख्खनेतील मराठेपूर्व सत्तांतील संघर्ष व त्यातून मराठ्यांत जागृत झालेली राजकीय महत्वकांक्षा, तसेच छत्रपती शिवरायांचे नेतृत्व यांतून महाराष्ट्रात मराठी सत्तेचा राजकीय सत्ता म्हणून उदय झाला.

**महाराष्ट्र धर्म**

मध्ययुगीन महाराष्ट्रातील संतांच्या सामाजिक, धार्मिक सुधारणांमुळे मराठी सत्तेच्या उदयाची तयार झालेली नैतिक पार्श्वभूमी म्हणजे महाराष्ट्र धर्म होय. म. गो. रानडे यांनी Rise of Maratha Power या ग्रंथात प्रथम ही संकल्पना मांडली.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म व कारकीर्द**

मुगल सत्तेला सर्वात मोठे आव्हान देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रूवारी १६३० मध्ये शिवनेरी किल्ल्यावर झाला. चिटणीस, बखर, शेडगावकर बखर यांसारख्या उत्तरकालीन साधनांत शिवजन्म साल १६२७ असे आढळते. पण समकालीन प्राथमिक साधने म्हणून समजल्या जाणाऱ्या परमानंद कृत 'शिवभारत', अब्दुल हमीद लाहोरी कृत 'बादशहानामा', 'जेधे शकावली', राजस्थानात प्राप्त कागदपत्रांत १६३० असाच जन्म सालाचा उल्लेख आढळतो आणि सध्या १६३० हेच साल अधिकृत साल म्हणून ग्राह्य समजले जाते.

बेंगलोरहून शिवरायांनी पुण्याच्या जहाँगिरीत परतताच राजमाता जिजाबाईच्या साहाय्याने राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. जहाँगिरीतील वतनदारांचा पाडाव केला. सत्ता टिकवायची असेल तर किल्ले ताब्यात असणे गरजेचे आहे हे शिवरायांनी ओळखून पुण्याच्या शेजारील तोरणा, राजगड, कोंढाणा हे किल्ले ताब्यात घेतले. ( इ.स. १६४६-१६४७ )

**जावळीची मोहीम ( इ.स. १६५६ )-**

घाटावरून कोंकणात उतरण्याचा एक महत्त्वाचा मार्ग महाबळेश्वर प्रदेशातून जात होता. याच प्रदेशात मोऱ्यांची वतने होती. व्यापार आणि व्यूहात्मक महत्त्व पाहता मोऱ्यांचे सहकार्य मिळवणे अथवा त्यांचा बिमोड करणे एवढे दोनच पर्याय शिवाजींपुढे होते.

विजापूरच्या सेवेत असणाऱ्या मोऱ्यांना ‘चंद्रराव’ किताब मिळाला होता. स्वराज्याच्या स्थापनेच्या वेळी दौलतराव मोरे हा या जहाँगिरीचा प्रमुख होता. त्याचा १६४९ मध्ये मृत्यू झाला. छत्रपती शिवरायांच्या साहाय्याने यशवंत मोरे जहागिरीचा प्रमुख बनला. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आलेल्या बाजी शामरावला आश्रय देणे, मावळ खोऱ्यातील देशमुखानं  छत्रपती शिवाजी महाराजांच्या  विरोधात भडकवणे या गोष्टी व जावळीचे असणारे महत्व पाहून महाराजांनी  आक्रमण करून यशवंतरावास ठार मारले. रायरीचा अभेद्य किल्ला ताब्यात घेतला. रायरी, रामगड, चंद्रगड, मकरंदगड यांसारखे किल्ले स्वराज्याचे अंग बनले. त्यामुळे शिवाजींचे कोकणातील स्थान बळकट होऊन कोकणात राज्य विस्तार करण्यास भौगोलिक आधार प्राप्त झाला.

**अफजलखानाचा पाडाव ( १६५९ ) –** जावळी प्रकरणाने आदिलशाही दुखावली होती. तसेच त्यांना मोगलांचे ही पाठबळ होते. त्यातूनच विजापूर दरबाराने अफजलखानाची शिवाजीच्या विरोधात पाडाव करण्यासाठी नेमणूक केली.

अफजलखानाची पूर्वप्रसिद्धी, त्याची सैन्यशक्ती लक्षात घेऊन शिवरायांनी ‘शक्तीपेक्षा युक्तीचा’ वापर केला आणि आपला तळ प्रतापगडावर हलवला व शिवरायांनी अफजलखानास प्रतापगडाच्या पायथ्याशी भेटण्यास बोलावले. भेटीत खानाने दगाबाजी करायचा प्रयत्न केला. पण छत्रपतींनी चपळाईने खानावर हल्ला करून त्याला ठार मारले. (इ.स. १६६९) अफजलखानाच्या मृत्यूने स्वराज्यावरील मोठे संकट टळले. अफजलखानाच्या मृत्युनंतर आदिलशाहीतील गोंधळाचा फायदा घेऊन मराठ्यांनी वाळवे, कऱ्हाड, पन्हाळा, कोल्हापूर - पर्यंतचा विजापूरचा प्रदेश ताब्यात घेतला.

शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूरचा सरदार सिद्धी जोहर (इ.स. १६६०) मराठ्यांवर चालून आला. महाराज पन्हाळ्यावर असताना सिद्धी जोहरने पन्हाळ्यास वेढा घातला. ( मार्च १६६० ) पण शिवरायांनी पन्हाळ्यावरुन स्वत:ची शिताफीने सुटका करून घेतली. या प्रसंगात बाजीप्रभू देशपांडे यांनी पत्करलेल्या हौत्यात्म्याची कथा चीरस्मरणीय आहे.

**शाहिस्तेखानास शास्त ( १६६३ ) –**  औरंगजेब बादशाह बनताच त्याने आपले लक्ष दक्षिणेवर केंद्रित केले. आणि आपला मामा शाहिस्तेखान याची दक्षिण सुभ्यावर नेमणूक केली. शाहिस्तेखानाने पुण्यात आपला मुक्काम टाकला. आसपासच्या प्रदेशांत लुटालूट करण्यास सुरुवात केली. म्हणून खानावर छुपा हल्ला करण्याचा बेत रचला. अष्टमीच्या रात्री रमजान महिन्यात पुण्यातील लाल महालावरती हल्ला केला. ( ५ एप्रिल १६६३ ) या हल्ल्यात खानाचा मुलगा फत्तेखान मारला गेला. शाहिस्तेखानाचे प्राण वाचले. पण त्याच्या हाताची बोटे तुटली. मराठ्यांच्या या पराक्रमाचा शेजारील सत्ताधीशांवर  परिणाम झाला आणि त्यांनी मराठ्यांशी चांगले संबंध निर्माण करण्यावर भर दयायला सुरुवात केली.

munotes.in

**'सुरतेची लुट' ( १६६४ ) –** मराठ्यांनी आक्रमक धोरण चालू ठेवत मुगल प्रदेशातील सुरतेवर आक्रमण केले. (१६६४) व सुरत शहरातील श्रीमंत मोगल व्यापारी व युरोपियन वखारींची लूट केली. मुगल आणि विजापूरशी संघर्ष करत असताना स्वराज्याची बरीच हानी झाली होती. त्याची भरपाई करणे, मुगल सत्तेच्या विस्तारास मर्यादा घालणे आणि इंग्रज, डच, फ्रेंच या परकीय सत्ताधीशांवर दहशत बसवणे या अनेक उद्देशांनी मराठ्यांनी सुरतेवर आक्रमण केले. संपत्तीचा फायदा मराठ्यांनी स्वराज्याचे सामर्थ्य वाढवण्यासाठी केला. या स्वारीने मुगलांचाही पराभव होऊ शकतो हे दाखवून दिले व मोगल अजिंक्यत्वास तडा गेला.

**पुरंदरचा तह (१६६५) –** शाहिस्तेखानाची नाचक्की, सुरतेवरची स्वारी यांमुळे चिडलेल्या औरंगजेबाने मराठ्यांच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी मिर्झा राजे जयसिंगाची दक्षिण सुभ्यावर नेमणूक केली. महाराष्ट्रात येताच जयसिंगाने आक्रमक धोरण राबवायला सुरुवात केली आणि पुण्याच्या दक्षिणेस असणाऱ्या पुरंदर किल्ल्यास वेढा दिला. ( इ.स. १६६५) मुरारबाजी देशपांडेनी मोठ्या धैर्याने पुरंदर लढवला पण त्यात यश आले नाही. शेवटी वास्तवाचे भान ठेवून शिवरायांनी जयसिंगाशी पुरंदरचा तह केला. ( १४ जून १६६५ )

मराठ्यांचा बंदोबस्त केल्यानंतर आदिलशाही व कुतुबशाहीचा शेवट करण्याची जबाबदारी जयसिंगावर सोपवली होती पण दक्षिणेत जयसिंगास अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. या परिस्थितीत शिवाजीराजे दक्षिणेत राहणे योग्य नाही हे ओळखून शिवरायांच्या आग्रा भेटीची जयसिंगाने व्यवस्था केली.

**आग्रा भेट (१६६६) –** आग्राभेटीला जात असताना शिवरायांनी स्वराज्याची सूत्रे राजमाता जिजाबाईंच्या हाती सोपवली. ५ मार्च १६६६ रोजी राजगड सोडला. भोपाल, नरवर, ग्वाल्हेर, धोलपूर मार्गे ते मे मध्ये आगऱ्यास पोहोचले. १२ मे १६६६ रोजी औरंगजेबचा वाढदिवस होता. दिवाण – इ – खास मध्ये शिवरायांना नेण्यात आले. त्या ठिकाणी शिवरायांनी नजराणा पेश केला स्वतःस पंचहजारी मनसबदारांच्या रांगेत उभे करणे, स्वागत करत असताना केलेला अवमान, यांमुळे दुखावलेले शिवराय तडक दरबारातून बाहेर पडले. त्यानंतर लगेचच शिवाजींना आग्र्यात कैद करण्यात आले. शिवरायांनी सुटकेसाठी विविध प्रकारे प्रयत्न करण्यास सुरुवात केली. महाराजांनी आजारपणाचे सोंग घेतले आणि दानधर्म सुरु केला आणि मुगल पहाऱ्याच्या बेसावधपणाचा फायदा घेऊन १९ ऑगस्ट १६६६ रोजी आग्र्यातून स्वतःची सुटका करून घेतली. मुगलांची या प्रकरणात मोठी बेइज्जत झाली. शिवरायांना ठार मारले नाही, ही आपली घोडचूक ठरली असे औरंगजेबास स्वतःच्या मृत्युपर्यंत वाटत होते. त्यानंतर परत एकदा सुरतेची लुट (१६७०) करून आपली आक्रमकता शिवरायांनी दाखवली.

**शिवराज्याभिषेक (१६७४) –** शिवरायांनी मराठा राज्याची स्थापना केली, तरी त्यांना १६७४ पर्यंत तांत्रिकदृष्ट्या मोगलांचेच मनसबदार समजले जात होते. आपली सत्ता जहागीर नसून ते स्वतंत्र राज्य आहे हे स्पष्ट करणे, वतन देणे, न्यायदान करणे, याला कायदेशीरपणा प्राप्त करून देणे आणि जास्तीत जास्त लोकांची सत्तेस मान्यता होणे यासाठी गागा भट्ट यांच्या हस्ते ६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवरायांनी स्वतःचा

munotes.in

राज्याभिषेक करवून घेतला. याप्रसंगी नवे शक व नाणी सुरु केली. अष्टप्रधान मंडळाची घोषणा केली.

गागा भट्टाने केलेल्या राज्याभिषेकात राहिलेल्या अनेक चुका निश्चलपुरी याने दाखवल्या. त्यामुळे कोणाच्या मनात शंका राहू नये आणि जास्तीत जास्त लोकांची राज्याभिषेकास संमती मिळावी यासाठी शिवरायांनी २४ सप्टेंबर १६७४ रोजी तांत्रिक निश्चलपुरीकडून दुसरा राज्याभिषेक करवून घेतला.

**दक्षिणस्वारी (१६७६) –** दक्षिणेत राज्यविस्तार करण्याची इच्छा, कर्नाटकातील वडिलोपार्जित जहागिरीचा हिस्सा मिळवणे, आदिलशहास शह देणे, खजिन्याची भरपाई करणे अशा अनेक उद्देशांनी ही स्वारी आखली होती. यावेळी महाराजांनी ५०,००० ची फौज, हंबीरराव मोहिते, येसाजी कंक इ. सेनानी सोबत घेतले होते.

गोवळकोंड्यात कुतुबशाहीची भेट घेऊन त्याच्याशी मैत्री केली. त्यानंतर आदिलशहाचा किल्लेदार नासीर अहमदखान याला स्वतःकडे घेऊन जिंजीचा किल्ला ताब्यात घेतला. व्यंकोजीशी सुरुवातीपासून शिवरायांनी सामोपचाराचे धोरण स्वीकारले होते. पण व्यंकोजीच शिवरायांच्या सैन्यावर चालून आला, त्यावेळी त्याचा पराभव करण्यात आला व त्याच्याशी तह करून दुरावा संपवला गेला.

**छत्रपती संभाजी**

मराठयांच्या इतिहासातील एक वादळी व वादग्रस्त व्यक्तिमत्व म्हणजे छत्रपती संभाजी होय. शिवरायांच्या पत्नी सईबाई यांच्या पोटी संभाजीचा जन्म १४ मे १६५७ रोजी झाला. सईबाईचे लगेचच निधन झाल्यामुळे जिजाबाईंनीच त्यांचे संगोपन केले. छत्रपती शिवरायांनी संभाजी राजांना राजकारण आणि अन्य विषयांचे शिक्षण देण्यासाठी केशवभट आणि उमाजी पंडित यांची नेमणूक केली होती. रायगडावर छत्रपती शिवरायांनी राज्याभिषेक केला. (इ.स. १६७४ ) त्यावेळी संभाजीस युवराजपदाचा मान प्राप्त झाला होता.

छत्रपती शिवरायांचे निधन झाले ( ३ एप्रिल १६८० ) त्यावेळी मराठी राज्याचा वारसाप्रश्न सोडवला नसल्यामुळे संघर्षाची स्थिती निर्माण झाली. संभाजी त्यावेळी पन्हाळगडावर होता. त्यांना शिवरायांच्या मृत्यूची बातमी समजू न देण्याचा सोयराबाई व इतरांनी प्रयत्न केला व लगेचच राजारामला गादीवर बसवले. पण महत्त्वाचे सरदार व अधिकाऱ्यांना आपल्याकडे घेऊन संभाजीने रायगडावर ताबा मिळवला. (जून १६८० )

छत्रपती संभाजीने स्वतःचा राज्याभिषेक करवून घेतला. ( १६ जानेवारी १६८१ ) पण संभाजी राजेंवर विषप्रयोग करून अण्णाजी दत्तो, बालाजी चिटणीस, हिरोजी फर्जंद यांनी सोयराबाईच्या मदतीने राजारामला गादी देण्याचा प्रयत्न केला. पण कटाचा सुगावा लागल्यामुळे छत्रपती संभाजी त्यातून बचावले. कट करणाऱ्यांना शिक्षा करून त्यांचा बिमोड करण्यात आला.

त्यादरम्यान औरंगजेबाचा मुलगा अकबर स्वतंत्र राज्य मिळवण्यासाठी पित्याविरुद्ध उठाव करून संभाजीकडे आला. ( ६ मे १६८१ ) पण हे सख्य दृढ मैत्रीत अथवा कोणत्याही

राजकीय परिवर्तनात बदलले नाही. अकबर प्रकरणामुळे औरंगजेबास दक्षिण भारतात आक्रमण करण्याचे निमित्त मिळाले व प्रचंड सैन्य घेऊन तो दक्षिणेत उतरला. (१६८२ )

संभाजी सत्तेवर येताच पहिला महत्त्वाचा संघर्ष झाला तो पोर्तुगीजांशी. मराठी सैन्याने पोर्तुगीजांचा विविध ठिकाणी पराभव केला. त्यानंतर संभाजीनी जंजिऱ्याच्या सिद्धींच्या विरोधात अरबांशी मैत्री करून नियंत्रण मिळवायचा प्रयत्न केला.

मराठ्यांचा पराभव करायचा असेल तर विजापूर व गोवळकोंडा यांची मराठ्यांना मिळणारी प्रत्याक्षाप्रत्यक्ष मदत, सहानूभूती मिळाली नसली पाहिजे असा विचार करून औरंगजेबने प्रथम विजापूर (सप्टेंबर १६८६ ) व नंतर गोवळकोंड्याचे कुतुबशहाचे राज्य ( सप्टेंबर १६८७) संपवले.

औरंगजेब दख्खनेत १६८१ साली उतरला असला तरी सुमारे ५ वर्ष त्याला कोणता महत्त्वाचा किल्ला जिंकता झाला नव्हता. साल्हेरचा किल्ला मुगलानी १६८६ मध्ये ताब्यात घेतला. त्यानंतरच मुगल व मराठ्यांचा खरा संघर्ष सुरु झाला. मुगलानी राजधानी रायगड घेण्याचा दोनदा प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. रायगड – पन्हाळा संघर्षात (१६८५ ) मराठ्यांनी मुगलांवर मात केली, तर बुऱ्हाणपूरच्या लुटीने (१६६० ) मुगलांची नाचक्की झाली. महाराष्ट्रात मुगलांशी लढा सुरु असतानाच संभाजीने कर्नाटकात स्वारी केली. ( एप्रिल १६८१ ) कर्नाटकातील जमीनदार नायकांच्यातील दुहीचा फायदा घेऊन कर्नाटकात मराठी मुलुखाचा विस्तार केला. पुढे मुगलांशी लढताना राजारामला या प्रदेशात आश्रय घेता आला.

संभाजींच्या हालचालीवर मुगलांची बारीक नजर होती. छत्रपती संभाजी संगमेश्वर मार्गे रायगडावर जाणार होते. मुक्रबखानाने संगमेश्वर वर हल्ला केला. कवी कलश, स्वराज्याचे सरसेनापती म्हाळोजी घोरपडे यांनी संभाजींच्या संरक्षणासाठी प्रयत्न केला. यात कवी कलश जखमी झाला तर म्हाळोजीने देह ठेवला. संभाजी राजांना पकडण्यात आले. छत्रपती संभाजी, कवी कलश यांची धिंड काढली गेली. त्यांचे अमानवीय हाल करून ११ मार्च १६८९ मध्ये कोरेगाव या ठिकाणी त्यांची हत्या करण्यात आली.

छत्रपती संभाजीस राज्यकारभार करण्यास फक्त नऊ वर्ष मिळाली. त्यातील सुरुवातीची वर्ष गृहकलहात गेली होती. नंतर सारी वर्ष मुगलांशी, पोर्तुगीजांशी संघर्ष करण्यात. प्रशासनात छत्रपती संभाजीस परिवर्तन करण्यास वाव मिळाला नसला तरी या संघर्षात त्यांचे नेतृत्वगुण चमकून निघाले.

'बुधभूषण' नावाचा राजकारणावरचा ग्रंथ लिहून छत्रपती संभाजींच्या आपल्या बुद्धिमत्तेचे, मोगलांशी केलेल्या संघर्षातून त्यांच्यातील शौर्यत्वाचे, नायकत्वाचे प्रत्यंतर येते, तर शांतपणे त्यांनी अमानुष छळ सहन करत मृत्यूचा स्वीकार केला. त्यातून त्यांचा धीरोदात्तपणादिसून येतो.

**छत्रपती राजाराम व मराठ्यांचा स्वतंत्र संग्राम –**

राणी येसूबाई व मराठा सरदारांच्या संमतीने राजाराम यांना छत्रपतीपद देण्यात आले. (१२ फेब्रुवारी १६८९) आणि छत्रपतींच्या अनुपस्थितीत संकटकाळात राज्याचा कारभार

चालवा यासाठी प्रतिनिधी म्हणून प्रल्हाद निरांजींची नेमणूक करण्यात आली. अष्टप्रधान व महत्वाच्या पदांवरील व्यक्ती संभाजी महाराजांच्या काळात होत्या, त्याच कायम ठेवण्यात आल्यामुळे त्यांची निष्ठा राजारामाना कायम मिळाली आणि मराठ्यांच्या इतिहासातील स्वातंत्रलढ्याच्या पर्वास तेथूनच सुरुवात झाली.

**रायगडाचा वेढा (१६८९) –** राजाराम सत्तेत येताच त्यांनी मोगलांशी वितुष्ट आलेल्या इंग्रज व पोर्तुगीजाना आपल्या बाजूस वळवले.  पण राजाराम रायगडावर असताना मोगल सेनापती जुल्फीकारखानाने गडास वेढा घातला. ( मार्च १६८९) त्यावेळी राजघराण्यातील व्यक्तींच्या जीवास धोका निर्माण झाला आणि राज्य कारभार पाहणे अवघड बनू लागले. त्यामुळे राजाराम महाराजांनी रायगडावरून निसटून जिंजीस जावे आणि तेथून मोगल सत्तेविरुद्ध लढा सुरु ठेवावा असे ठरले. त्यानुसार रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी इ. मुत्सद्दी बरोबर घेऊन छत्रपती राजाराम रायगडावरून निसटले. ( ५ एप्रिल १६८९). 'पन्हाळ्यावरती' 'रामचंद्रपंत अमात्य' यांना 'हुकुमत पनाह' पदवी देऊन स्वराज्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली व छत्रपती राजाराम यांनी जिंजीस प्रयाण केले.

**जिंजीचा संघर्ष –** छत्रपती राजाराम जिंजीला पोहोचताच तेथून त्यांनी राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. नोव्हेंबर १६८९ मध्ये रायगड मुगलांच्या हाती पडला. राजमाता येसूबाई व राजकुमार शाहू यांना मुगलानी कैद केले.

औरंगजेबने आपला सेनापती जुल्फिकार – खानास जिंजीकडे जाण्याचे व जिंजी ताब्यात घेण्याचे आदेश दिले. त्याने ऑगस्ट १६९० मध्ये जिंजीस वेढा घातला.

पण संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांची होणारी सततची आक्रमणे व काही प्रमाणात जुल्फीकार खानची हेतूपूर्ण उदासीनता यांमुळे मराठ्यांचे पारडे कायम वरचढ राहिले. पण औरंगजेबाचे करडे आदेश आल्यावर छत्रपती राजाराम जिंजीतून निसटले. ( नोव्हेंबर १६९७) व नंतर जुल्फिकारखानाने जिंजीचा ताबा घेतला.

**राजारामांचे महाराष्ट्रात आगमन व मृत्यू –** जिंजीतून परतताच छत्रपती राजाराम महाराजांनी साताऱ्यातून कारभार पाहण्यास सुरुवात केली. ( फेब्रुवारी १६९८) स्वराज्याच्या प्रदेशाचा दौरा करून लोकांच्या तक्रारी दूर करायच्या, लोकांना प्रेरणा दयायच्या, किल्ल्यांची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न सुरु केला. कर्नाटकात, खानदेशात स्वाऱ्या केल्या. खानदेश वऱ्हाडकडील मोहिमेवरून छत्रपती राजाराम महाराज साताऱ्यास आले. मुगल सैन्याने साताऱ्यास वेढा घातल्याने ते सिंहगडावर आले. सिंहगडावर अल्पशा आजाराने त्याचे ३ मार्च १७०० रोजी निधन झाले.

**वतनदारी व राजाराम –** छत्रपती संभाजींचा मृत्यू झाल्यानंतर स्वराज्याची स्थिती अनेक अंगांनी बिकट झाली होती. मुगलांनी स्वराज्याचा  बराच भाग जिंकून घेतला होता. मराठी सरदारांना  मनसबदारी, वतनांचे आमीष दाखवून स्वतःकडे घेतले होते आणि स्वराज्यातील लुटालुटीने, युद्धामुळे खजिना रिकामा झाला होता. त्यामुळे सेनानीना रोख वेतन देणे शक्य नव्हते. या कठीण परिस्थितीतुन बाहेर पडण्याचा एक मार्ग होता तो म्हणजे वतनदारी.

छत्रपती राजाराम महाराजांनी मराठी सरदारांना मुगल प्रांतातून स्वराज्याचा भाग मुक्त करावा व त्या क्षेत्रात वतन प्राप्त करावे असे सांगितले त्यामुळे नागोजी माने, नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे यांच्यासारखे मोठे मराठा सरदार औरंगजेबास पक्ष सोडून छत्रपती राजारामना मिळाले व स्वराज्याच्या संरक्षणासाठी लढू लागले.

छत्रपती राजाराम गादीवर बसले त्यावेळी ते एकोणीस वर्षाचे होते. त्यांच्यावर अकस्मात स्वराज्याची जबाबदारी पडली. स्वराज्याची स्थिती बिकट असताना त्यांनी योग्य व्यक्तींना स्वराज्याच्या कार्यात सामावून घेतले आणि संघर्ष कायम ठेवत औरंगजेबसारख्या कसलेल्या सेनापतीस व त्याच्या धोरणांना समर्थपणे तोंड दिले. मराठ्यांचा संघर्ष १६८९ ते १७०० याकाळात चालला आणि स्वराज्य टिकले, ते छत्रपती राजाराम महाराजांच्या नेतृत्वामुळेच.

**महाराणी ताराबाई ( १७०० ते १७०७)**

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर (इ.स.१७००) औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत मराठ्यांचा स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष राजाराम महाराजांच्या पत्नी ताराबाई यांच्यावर नेतृत्वाखाली लढला गेला. राजमाता येसूबाई व शाहू मुगलांच्या कैदेत असल्यामुळे मराठी सत्तेची जबाबदारी त्यांच्यावर आली.  ताराबाईनी आपला पुत्र छत्रपती शिवाजी महाराज महाराज (दुसरा) यास गादीवर बसवले व राज्याची सर्व सूत्रे स्वतःकडे घेतली.

सातारची लढाई (जून १७००) पन्हाळगडाचा संघर्ष (मे १७०१) विशाळगडाचा वेढा (१७०२) इ. अनेक महत्त्वाचे संघर्षाचे प्रसंग या काळात घडले. मुगल –मराठे संघर्षाने आता वेगळेच वळण घेतले होते. मराठ्यांचा ताब्यातील किल्ला घेण्यासाठी मुगलांचा वेढा पडल्यावर मराठे तो किल्ला पूर्ण ताकदीने लढवत. तो किल्ला लढून जिंकणे अशक्य आहे असे दिसताच मुगल पैसे देऊन तो किल्ला आपल्या ताब्यात घेत आणि पुढच्या मोहिमेवर जात. मराठ्यांनी परत मुगलानी घेतलेला किल्ला ताब्यात घेतला.

गनिमी काव्याचा वापर करून मुगलांची रसद तोडली जाई. लुटली जाई. दक्षिणेत औरंगजेब गुंतलेला पाहून नेमाजी शिंदेंच्या नेतृत्वाखालील मराठी सैन्य नर्मदा ओलांडून भोपाळपर्यंत धडकले होते. (ऑक्टोबर १७६३) धनाजी जाधवांनी गुजरातवर स्वारी करून गुजरातचा सुभेदार अब्दुल हमीद याला कैद केले व प्रचंड संपत्ती महाराष्ट्रात आणली.

औरंगजेबला महाराष्ट्रात येऊन पंचवीस वर्ष झाली होती. महाराष्ट्र त्याला ताब्यात घेता आला नाही. शेवटी निराशेने अहमदनगर येथे २० फेब्रुवारी १७०७ मध्ये त्याचा मृत्यू झाला. मराठी स्वराज्य संपवायला आलेला भारताचा बादशाह महाराष्ट्रातच कायमचा विसावला. मराठ्यांच्या या स्वातंत्र्य संग्रामाचा शेवट झाला, तो महाराणी ताराबाईच्या नेतृत्वाखाली. कवी गोविंद ताराबाईच्या पराक्रमाचे वर्णन करताना म्हणतो,

‘दिल्ली जाली दीनवाणी ! दिल्लीशाचे गेले पाणी

ताराबाई रामराणी! भद्रकाली कोपली !!’

पण लवकरच शहा आलम प्रथम मुगल सत्ताधीश बनला आणि १७०७ मध्येच त्याने राजकीय हेतू लक्षात घेऊन संभाजीपुत्र शाहूंची सुटका केली आणि मराठ्यांच्या इतिहासातील नवीन पर्वाची सुरुवात झाली. मुगलांना अपेक्षित होते तसेच झाले आणि मराठ्यात शाहू आणि ताराबाई असे गट पडले व संघर्ष सुरु झाला. याच शाहूंच्या गटाची सरशी झाली. त्यावेळी महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूरला जाऊन नवीन राज्याची स्थापना केली.

## १.४ शिवकालीन प्रशासन व्यवस्था

**मराठा प्रशासन**

शिवरायांनी फक्त राज्यविस्तारच केला नाही, तर प्रशासन व्यवस्थेची घडीही व्यवस्थित बसवली. स्वराज्याचे चार भागात विभाजन करून त्यावर कार्यक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक केली.

छत्रपती साऱ्या प्रशासनाचे केंद्रबिंदू असले तरी त्यांच्या मदतीसाठी अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात होते. राज्याभिषेकाप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांनी पुढीलप्रमाणे अष्टप्रधानमंडळ नेमले होते.

| पद | कार्य | व्यक्ती |
|---|---|---|
| पेशवा | प्रशासन देखरेख | मोरोपंत त्रिंबक |
| मुजुमदार | जमाखर्च | नारो नीळकंठ |
| सेनापती | सैन्यप्रमुख | हंबीरराव मोहिते |
| सुरनिस | पत्रव्यवहार | आण्णाजी दत्तो |
| वाकनिस | दैनंदिन प्रशासन | दत्ताजी त्रिंबक |
| सुमंत | परराष्ट्र व्यवहार | रामचंद्र त्रिंबक |
| पंडितराव | धार्मिक कार्य | रघुनाथ पंडित |
| न्यायाधीश | न्यायदान | निराजी रावजी |

या प्रधानात सेनापती मराठाच नेमला जात असे. पंडितराव, न्यायाधीश यांच्या व्यतिरिक्त बाकी सर्वांना सैन्य मोहिमांमध्ये भाग घ्यावा लागे. या प्रधानांना रोख पगार दिला जात असे. तसेच कोणतेच पद वंशपरंपरागत दिले जात नसे.

**अठरा कारखाने, बारा महाल** – मुलकी राज्यकारभाराचे १८ कारखाने १२ महालांत विभाजन केले होते.

**१८ कारखान्यात –** खजिना, जवाहिरखान, अंबरखाना, आबदारखाना, तामिलखाना इत्यादींचा तर;

**१२ महालांत –** पोते महाल, टंकसाल, दरुनी महाल, वहिली महाल, पागा महाल इ. चा समावेश होत असे.

**प्रांतिक शासन**

स्वराज्याची विभागणी विविध प्रांतात करण्यात आली होती. प्रांत प्रमुखास सरकारकून म्हणत असत. प्रांताची विभागणी अनेक (चौदा) सुभ्यांत केली होती. प्रांत प्रमुखास 'सुभेदार' अथवा 'देशाधिकारी' म्हणत.

सुभ्याची विभागणी महालात करत . साधारणत: दोन महाल मिळून सुभा तयार होत असे. महालाचा प्रमुख अधिकारी 'हवालदार' असे. त्यानंतर परगणा हा प्रशासनाचा महत्वाचा घटक असे. त्यावर देशमुख व देशपांडे हे वतनदार प्रशासन पाहत असत, तर गावाचा कारभार पाटील व कुलकर्णी हे वतनदार पाहत.

## १.५ शिवकालीन महसूल व्यवस्था

पूर्वपरंपरागत महसूल पद्धतीस आण्णाजी दत्तो यांच्या साहाय्याने बदल करून नवीन महसूल पद्धती शिवाजीने सुरु केली. शिवशाहीत काठीच्या साहाय्याने मोजणी करून जमिनीच्या प्रतीनुरूप पिक प्रकारानुसार आणि ३ वर्षांची सरासरी लक्षात घेऊन महसूल वसूल केला जाई. महसूल वसुली एकूण उत्पन्नाच्या ३० टक्के ते ४० टक्के होती. नैसर्गिक आपत्तीत महसूल वसुलीत सवलत दिली जाई. वसुली रोख रक्कम अथवा धान्य रुपात वसूल करत.

**चौथ –** मराठी राज्याच्या उत्पन्नाचा हा एक घटक होता. स्वराज्याबाहेरच्या प्रदेशास देण्यात येणाऱ्या संरक्षणासाठी त्या प्रदेशाकडून ही रक्कम वसूल केली जाई.

**सरदेशमुखी –** स्वराज्याच्या प्रदेशातून अथवा ताब्यात घेतलेल्या मुलखातून राजाचा एक खास हक्क म्हणून सरकारी महसुलाच्या १/१० रक्कम राजाच्या खाजगी तिजोरीत त्याच्या वैयक्तिक खर्चासाठी जमा करत., त्यास सरदेशमुखी समजत. ते वेगळे उत्पन्नाचे साधन नव्हते, तर एकूण उत्पन्नाचाच तो एक भाग होता.

सैन्य व्यवस्था – पायदळ, घोडदळ, आरमार ही सैन्याची महत्त्वाची अंगे होती. सेनापती हा सर्व सैन्याचा प्रमुख समजत असत. पायदळाची रचना पुढीलप्रमाणे होती.

सर्व हजारी – सेनापती

सात जुमलेदार – हजारी

तीन हवालदार - जुमलेदार

पाच नाईक – हवालदार

दहा सैनिक – नाईक

**घोडदळ –** बारगीर व शिलेदार असे सैनिकांचे दोन प्रकार होते. बारगिरास सरकार मार्फत घोडा व शस्त्रे दिली जात, तर शिलेदाराकडे स्वतःची हत्यारे व घोडा असे. पायदळाची रचना पुढील प्रमाणे होती.

सर्वपंचहजारी – सेनापती

५ हजारी – १ पंचहजारी

१० जुमलेदार – १ हजारी

५ हवालदार – १ जुमलेदार

२५ घोडेस्वार – १ हवालदार

**आरमार –** आरमारात कोळी, भंडारी लोकांची भरती होती. गुराब, गलबत, माचवा, पगा इ. विविध प्रकारची जहाजे आरमारात होती. त्याशिवाय विजयदुर्ग, सिंधुदुर्ग यांसारख्या सागरी दुर्गांचे बांधकाम करून आरमारास छत्रपती शिवाजी महाराजांनी बळकटी प्राप्त करून दिली होती.

**किल्ले प्रशासन –** आसपासच्या भूप्रदेशावर सत्ता टिकवणे व संकटकाळात आश्रयस्थान म्हणून किल्ल्यांचे स्वराज्यात महत्त्व होते.

राज्यात सुमारे ३०० किल्ले होते. त्यांचे वनदुर्ग, गिरीदुर्ग, स्थलदुर्ग, जलदुर्ग असे प्रकार पाडले जात असत. किल्ल्यावर हवालदार ( मराठा ) सबनीस ( ब्राम्हण ) कारखानीस (प्रभू) हे अधिकारी असत. या अधिकाऱ्याच्या वेळोवेळी बदल्या होत असत. याशिवाय कार्यक्षम गुप्तहेर व्यवस्था मराठा राज्यात होती. बहिर्जी नाईक हा गुप्तहेर विभागाचा प्रमुख होता.

वंशपरंपरेचा अभाव, रोख पगार, वेळोवेळी बदल्या, तत्कालीन जातीपातींतील अभिमान – दुराभिमानाचा वापर, प्रशासनाची विभागणी आणि कल्याणकारी शासनाचे गुण ही स्वराज्याची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये होती.

## १.६ शिवकालीन अर्थकारण

नावनिर्मित राज्य आर्थिक दृष्टीने सक्षम करण्याच्या राज्याचा प्रयत्न ही दुर्मिळ बाब आहे. प्रजेचे कल्याण आणि राजाचे उत्पन वाढवने या दोन्ही गोष्टीचा राजानी समतोल साधला . राजाच्या उत्पन्नामुळे मुख्य स्तोत्र जमिनीवरील धारा पद्धती होत . मालिक अबरणे सुरू केलेली धारा पद्धती राज्यात चालू होती. कोणत्या पदतीचा अवलंब केला , हा तपशीलचा भाग आहे . जमीन मोजण्यासाठी साखळीचे की काठीचे माप उपयोगात आणले जात होते यापेक्षा सर्व पद्धती ठरविताना राजानी रयतेस विश्वासत घेतले . लोकमान्यता महत्वाची मानली . मुलकत ‘ साहेबी कुलकर्णीशिवाय (सरकारी अमालदार ) कोणाचीही नाही असे केले . नवीन रयात येईल त्यास गुरेधोरे ढयावी , बिजास दान पैका देण्यात येई . या प्रकारे रयतेचे पालनपोषण केले . मुलकत देवा – ब्राह्याणाचे मशिदीचे , इनामती हाखंही नक्त द्रव्यात बंदुण देऊन पोत्यावरून (तिजोरितून) देण्याची व्यवस्ता केली.

नवनिर्मित राज्य आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत कसे असू शकेल यासाठी राजांनी अटोकाट प्रयत्न केले. शेती सुधारणा, उद्योगधंदे वाढीसाठी प्रयत्न हा याचाच भाग होता. राज्याचे उत्पन्न कसे वाढेल आणि राज्य सक्षम कसे असेल, असेच आर्थिक धोरण आखण्यात आले होते. व्यापारविषयक धोरणामध्ये स्थानिक व्यापारी वर्गाच्या हिताला प्राधान्य देण्यात आले. इंग्रज, फ्रेंच, डच किंवा पोर्तुगीज या परकीय व्यापाऱ्यांवर अनेक निर्बंध लादण्यात आले होते. स्थानिकांना स्पर्धेची झळ पोहोचणार नाही यासाठी काळजी घेतली होती. इंग्रजांचा आणि मराठी मुलखाचा जवळचा संबंध होता. परंतु त्यांना सुद्धा अंतर्गत व्यापारात हस्तक्षेप करता येणार नाही, याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे कोकणात चालणारा मिठाचा व्यापार, स्थानिक उत्पादन आणि व्यापारासाठी संरक्षक धोरणाचा उपयोग राजांनी केला होता. नरहरी आनंदराव या कुंडाळच्या सरसुभेदारास मिठावरील करासाठी इ.स. १६७१ मध्ये लिहिलेले पत्र राजांच्या अर्थनीतीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. राजे लिहितात, "तुम्ही घाटी जकातजवर सविणे, बारदेशात मीठ विकते त्याचा हिशोब प्रभाहळीकडे संगमेश्वराकडे मीठ विकते त्याने कित्येक जबर पडते ते मनास आणून त्या अजमासे जकाती जबर बैसविणे की संगमेश्वरी विकले आणि घाट पावेतो जे बेरीज पडेल त्या हिशेबे बारदेशीच्या मिठास जकाती घेवणे. संगमेश्वराहून बारदेशीचे मीठ महाग पडेल ऐसा जकातीचा तह देणे. "५ आपल्या देशाच्या उत्पन्नास मागणी वाढावी, 'साहेबाचा बहुत फायदा होईल.' असे धोरण अधिकाऱ्यांनी राबवावे. विविध उत्पन्नांचे स्रोत स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी उपयुक्त ठरतील, आर्थिक स्थिती बळकट होईल, यासाठी हे प्रयत्न होता.

स्वराज्यात शेतकऱ्यांच्या हिताचा विचार अपरिहार्य होता . त्यांच्या उन्नती-विकासाचा विचार हा मुख्य मुद्दा होता. शिवपूर्वकाळात सर्वसामान्य रयतेची स्थिती अत्यंत दयनीय होती. वेळप्रसंगी राजसत्तेला न जुमानणारे वतनदार होते. वतनदार रयतेचा छळ करीत असत. अशा स्वयंघोषित वतनदार राजांना महाराजांनी वठणीवर आणले. त्यांचे वाडे, हुडे, कोट पाडिले, त्यांचा कारभार नियंत्रित केला. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्याचे आदेश देण्यात आले. सुभेदाराला ताकीद देण्यात आली की, रयत तजावजा (दयनीय) होऊ न देणे. जमीन पडीक राहणार नाही, याची काळजी घेतली गेली. श्रीशिवछत्रपतींचे राज्याभिषेकानंतरचे एक पत्र आहे. रामजी अनंत सुभेदाराला लिहिलेल्या पत्रातील प्रत्येक शब्द राज्याचे शेतकऱ्यांच्या संदर्भातील धोरण आणि उत्तरदायित्व स्पष्ट करणारा आहे. ज्या शेतकऱ्यांवर मागील बाकीचा बोजा आहे, त्या संदर्भात राजे या पत्रात लिहितात, "मागील बाकीचा बोजा त्यांच्यावर आहे, आणि तो देण्याची त्यांची ऐपत नाही तो कुणबी अगदी मोडून गेला आहे आणि गाव सोडून तो जाऊ पाहत आहे. अशी बाकी ज्या कुळांवर असेल, ते सारे माफ करण्यासाठी खंडाचे हप्ते तहकूब करून नंतर साहेबाला कळवावे, की या पद्धतीने लागवड करून साहेबांचा फायदा केला आहे आणि आणखी येक कुळाची बाकी वसूल न झाल्याने त्या गरीब कुळास ती माफ केली आहे, असे साहेबास कळविले म्हणजे साहेब माफीची सनद देतील."६ शेतकऱ्यांविषयीची काळजी त्याचबरोबर शेतीच्या विकासाची आस्था याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे हे पत्र कुणबिया कुनब्याची खबर घेऊन त्याला तवानगी येतो करून किर्द करावी, हा आजही अबाधित वाटणारा विचार आहे. बळीचे राज्य येवो त्यासाठी त्यांची इडा पिंडा टाळण्याचा हा कृतिशील व आदर्श प्रयत्न होता. वरील पत्रातील उताऱ्यातून रयतेच्या कल्याणाची आंतरिक आस्था स्पष्टपणे दिसून येते. राज्याचे धोरण म्हणून सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून, त्यांच्या हिताचा विचार करून

राज्यसुद्धा आर्थिकदृष्टीने कसे परिपूर्ण होईल, याचा विचार प्राधान्याने केला आहे. रयतेच्या सुखदुःखाशी जोडलेली ही नाळ माध्ययुगीन कालखंडात कुठेही आणि कोणत्याही स्थितीत अपवाद होतो ,हे नमूद करणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेसोबत सुत्ररूपाने असे म्हणता येईल की,

१. महसूल वसूलीसाठीची अन्यायी मक्तेदारी पद्धती बंद करण्यात आली .

२. जहागिरी देण्याची पद्धत बंद करण्यात आली.

३. जमीनदाराचे जमीनदारीचे हक्क काढून घेण्यात आले .

४. शेतीच्या विकासासाठी तगाई पद्धती सुरू करण्यात आली.

५. नैसर्गिक आपत्ती किंवा शत्रूकडून नुकसान झाल्यानंतर रयतेला महसुलात सूट देण्याची पद्धत सुरू करण्यात आली .

६. युद्धामुळे ओस पडलेल्या गावांना पुनः वसविण्यासाठी मदत दिली जात असे.

७. सारा वसूलीची प्रत्यक्ष पीकपाण्यावर आधारित पद्धत सुरू केली . एकूण अर्थकारणाचा कणा रयत होती .

**रयतेचे राज्य**

मध्ययुगात सर्व भारतभर नव्हे , तर सर्व जगातील सत्तांचे स्वरूप राजसत्तांचे होते. परंतु शिवाजीराजांच्या राजसत्तेचे स्वरूप अनियंत्रित , निरंकुश सत्तेचे नव्हते. रयतेचे राज्य हा सतराव्या शतकात , पुढील दोनशे वर्षांनंतरचा विचार होता . या राज्यसत्तेच्या अंतरंगात खरी लोकशाई होती. प्रस्थापित राजसत्ता ही जनतेची सत्ता, जनतेसाठीची सत्ता होती. राज्य माझे आहे आणि म्हणून ते टिकवण्याची ,वाढवण्याची जवाबदारी माझी आहे; हा एकात्म भाव मध्ययुगीन भारताच्या इतिहासात केवळ शिवशाहीच्या संदर्भात दिसतो . शिवाजीराजानी राज्यभिषेक करवून घेतला . श्रीशिवछत्रपतीची बिरुदावली मध्ययुगीन काळाच्या संदर्भात समजून घ्यावी लागते . हे राज्य मध्ययुगीन प्रस्थापित प्रघाताप्रमाणे राजाचे राज्य नव्हते. सर्व सामान्य जनतेला हे राज्य आपले वाटत होते . इ . स .१० व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंतच्या मध्य-युगीन कालावधीत हे भाग्य शिवशाहीच्याच वाट्याला आले होते . राज्य आपले आहे , हा विचार जनतेच्या मनात रुजविणारा पहिला राजा होता . इतिहासाला दिलेल वळण लोकांच्या मनात स्वातंत्र्याची आकांक्षा प्रज्वलित करणारा होता. या जागवलेल्या आकांक्षाचे श्रीशिवछत्रपती हा प्रतिनिधी होता. जे राज्य जनतेला आपल वाढते , ते राज्य बुडवणे कोणतेही सतेला शक्य नसते . राजाच्या रक्षणासाठी जनता होतम्या पत्करण्यासाठी सिद्ध होते आणि याच कारणामुळे हे राज्य नष्ट करयच आतंक ,आव्हाहत औरंगजेब बादशने सर्व संथयाशी केला होता . या राजाच्या भोगहळीक विस्तार मोठा नसला , तरी निर्माण केलेले आव्हान मोठे होते ; याची जाणीव अत्यंत धृत असणाऱ्या मोगल बादशला होती .

मध्ययुगीन इतिहासाच्या संदर्भात प्रभावीपणे पुढे येणार या राजाच्या बाबतीला एक मुदा आहे . रयतेचा राजावरील आणि राज सतेवरील न ढळणारा विश्वास . इ . स .१६८० पर्यंतच्या शिवचरित्रात अनेक प्रतिकुल प्रसंग आहेत . माघार घ्यावी लागली , पराभव स्वीकारवे लागले , मिर्झाराजा जायसिंग बरोबरच्या पुरंदरच्या तहात तर जवळपास सर्व

राज्य गमावले गेल्याची स्थिती निर्माण केली होती . कुठल्याही पराभवाची किंवा आव्हानाची किंवा होरपळून निघण्याच्या परिस्थितिसुद्धा जनतेचा राज्यावरील विश्वास कायम आहे . ज्या काळात सत्ताकक्षा आणि त्यातून उदभवलेली बंडे ही व्यवस्थेचा अपरिहार्य भाग होता, त्या काळात लोकांचा राजावरील विश्वास कायम होता . सर्व प्रकारे आपले या सतेशी निगडीत आहे . आणि म्हणून शिवाजीराजाच्या 'आमच्या इमानिवर आपली मान ठेवून आम्हापाशी या' या आवाहाना प्रमाणे लोक विश्वास ठेवून राजाच्या पाठीमागे उभे होते . मध्य युगीन इतिहासाला न समजणारी अशी अकल्पित स्थिती आहे .

## १.७ शिवकालीन समाज व संस्कृती

शिवकाळात खेद हा सामाजिक, आर्थिक जीवनाचा केंद्रबिंदू होता. खेड्यांची विविध नावे होती. कसब्याच्या ठिकाणी व्यापाराचे ठिकाण असे. तर खेड्याचा विस्तार झाल्यास मुळ खेडे 'बुद्रुक' म्हणून व नवे खेडे ' खुर्द' म्हणून ओळखत. गावातील प्रशासकीय जबाबदारी असणाऱ्या 'वतनदारांना' कामाच्या मोबदल्याबद्दल जमीन प्राप्त होत असे. अशा वतनदारांत पाटील, कुलकर्णी, चौगुले, शेटे - महाजन यांचा समावेश होत असे. त्याशिवाय गावातील लोकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी बलुतेदार, अलुतेदार असत.

गावातील अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या सेवा पुरवणाऱ्या सेवकांना बलुतेदार म्हणत. या बलुतेदारांत सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, न्हावी, धोबी, गुरव, जोशी, भाट, मुलाणा यांचा समावेश होत असे. त्याशिवाय गावासाठी आवश्यक, पण अनिर्वाय नसणाऱ्या सेवा पुरवणाऱ्यांना अलुतेदार म्हणत. त्यात जंगम, शिंपी, कोळी, तराळ, सोनार, माळी , तेली इ. चा समावेश होत असे.

शिवकाळात समाज पुरुषप्रधान होता. सतीप्रथा त्यावेळी अस्तित्वात होती. शहाजी राजेंच्या मृत्युनंतर जिजाबाई सती जाणार होत्या. त्यावेळी शिवरायांनी त्यांना रोखले, हे सर्वज्ञात आहे. समाजातील काही घटकात स्त्रियांना 'पाटदाम' भरून पुनर्विवाह करण्याचा अथवा घटस्फोट घेण्याचा मार्ग खुला होता.

चौल, दाभोळ, कल्याण, राजापूर, वेंगुर्ला इ. महत्वाच्या बाजारपेठा होत्या. खेडशिदापूरची बाजारपेठ शिवकाळात वसवली होती. पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज, इंग्रज व्यापारी कंपन्यांची विविध ठाणी होती. ते पण व्यापारात सहभागी होत होते. शिवराई अच्युतराई, पातशाही, धारवाडी, वेंगुर्ला, मोहर इ सुवर्णनाणी, चांदीच्या नाण्यात रुपया, टका, अब्बासी; तांब्यांच्या नाण्यात पैसा, रुका, दाम, जितल, अडका यांचा समावेश असलेला दिसतो.

स्थापत्य क्षेत्रात शिवकाळात मूलभूत असे बदल दिसत नाहीत. स्वराज्य, स्थापना, संरक्षण व विस्तार यांमध्येच शिवकाळातील राज्यकर्त्यांचा काळ गेल्यामुळे किल्ले आणि राजकीय उपयुक्तता लक्षात घेऊनच गड, किल्ले व इमारती बांधल्या.

## १.८ शिवकालीन वाङ्मयविश्व

मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने मराठेशाही अथवा शिवकाळ अथवा स्वराज्यस्थापनेचा काळ अतिशय महत्वाचा मानला जातो. इ. स. १६५० ते १८०० हा स्वराज्याचा काळ होय. शिवाजी महाराजांच्या काळामध्ये जितकी उच्च प्रकारची ग्रंथोत्पत्ती झाली तितकी केव्हाच झाली नाही असे केतकरांनी म्हटले आहे ( केतकर, श्री. व्यं., १९६४ ) इ. स.१४४८ मध्ये लिहिल्या गेलेल्या महिकावतीच्या बखरीतील 'महाराष्ट्रधर्मा'चा पुढल्या काळात मराठी संतांना ध्यास लागलेला होता. समर्थ रामदासांच्या काव्यात हा 'महाराष्ट्रधर्म' पुन्हा आलेला आहे. म्हणजे मधल्या २०० वर्षांच्या काळात येथल्या लिहित्या लोकांनी महाराष्ट्रधर्माची जाणीव जागी ठेवलेली दिसते. ही जाणीवच मराठी वाङमयच्या निर्मितीला पोषक ठरली असावी. या कालखंडात विपुल वाङमयनिर्मिती झाली. तिचे वर्गीकरण केतकरांनी पुढीलप्रमाणे केलेले आहे १. बखरीची रचना, २. ऐतिहासिक संस्कृत काव्यास सुरुवात, ३. राज्यव्यवहारकोशाची निर्मिती, ४. संस्कृत शब्दांच्या स्वीकाराने भाषेचे अर्वाचीनकरण, ५. स्वतंत्र शृंगारिक काव्याचे लेखन, ६. 'महाभारत', 'रामायण', 'भागवत', 'योगवासिष्ठ' इत्यादि ग्रंथांची भाषांतरे, ७. मराठी शब्दकोशाची सुरुवात, ८. स्त्रियांचे कवितालेखन, ९. नाटके लिहिली आणि खेळली जात होती, १०. पोवाडे करणाऱ्या कवींना राजाश्रय, ११. भक्तिवाङ्मयाला बहर, १२. धर्मप्रचाराला संघटित रूप, १३. मराठी वाङ्मय निर्मितीची विविध केंद्रे अस्तित्वात आली.

वाङ्मयाच्या बाबतीत महत्वाचा असलेला हा काळ महाराष्ट्राच्या संदर्भात कर्तृत्वाचा काळ होता. मात्र या काळाची तयारी आधीच्या एका शतकात झालेली होती. मराठी साहित्याच्या संदर्भात एकनाथ दासोपंतादी ग्रंथकारांना त्याचे श्रेय जाते तसेच राजकीय संदर्भात शहाजी राजांकडे जाते. "हिंदवी स्वराज्य हे शहाजीराजांचे स्वप्न होते तर शिवाजी महाराजांना घडलेला साक्षात्कार होता." (कुलकर्णी, रं., १९९५ : ३६ ) . मराठेशाहीचा अथवा स्वराज्य स्थापनेचा महत्कृत्याचा पाया शहाजीने घातला, असे राजवाडे यांनी म्हटले आहे ( जोशी, लक्ष्मणशास्त्री, १९५८ ). संत एकनाथांच्या निधनानंतर तीस वर्षांनी शहाजीचा स्वराज्य स्थापनेचा पहिला उद्योग झालेला दिसतो. शहाजीच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नांना शिवाजी महाराजांच्या लोकोत्तर कर्तृत्वामुळे फळ आले. "अस्मितेचा, मराठी राज्याच्या अभिमानाचा रुजवून काढलेला माणसांचा ताटवा हीच शिवाजी महाराजांची अद्वितीय, चिरस्मरणीय व महाराष्ट्रीय लोकांस आजवर पुरलेली आणि उपयोगास येणारी कामगिरी होय. हीच इतिहासास पुसून टाकणे असंभवनीय वाटते" असे शेववलकरांनी म्हटलेले आहे (शेजवलकर, त्र्यं. शं., १९६४: ५६ ) "शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वामुळे जनतेत प्रखर अशी स्वराज्यनिष्ठा जागृत झालेली होती." ( कुलकर्णी, श्री. रं.,१९९५: ४५ ).

बखरकारांच्या दृष्टीने शिवाजी महाराज हे वीरनायक होते. शिवाजीराजांविषयीच्या नऊ बखरी आढळतात. कृष्णाजी अनंत सभासदकृत ' शिवछत्रपतींचे चरित्र' ( इ. स. १६९७ ), रघुनाथ यादव चित्रेकृत ' चित्रगुप्तविरचीत बखर' ( १७६१ ), दत्ताजी त्रिमल वाकेनवीस व आण्णाजी रंगनाथ मलकारेकृत '९१ कलमी बखर' ( १७७० ), मल्हार रामराव चिटणीसकृत 'सप्तप्रकरणात्मक चरित्र' ( १८१० ), गणपतराव गोविंदराव बरवेकृत 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' ( १८१७ ), खंडो बल्लाळ चिटणीसकृत 'शिवदिग्विजय' ( १८१८ ), 'हकीकती बखर', ' शेडगावकर बखर', 'शिवप्रताप'.

"शिवजीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीचे स्वभाववर्णन बखरकारांनी केलेले आढळत नाही" असे राजवाडे यांनी म्हटले आहे (जोशी,लक्ष्मण शास्त्री, १९५८:२२३). बखरकारांना, पोवाडे रचणाऱ्या शाहिरांना शिवाजी महाराजांचे कर्तृत्व लोकविलक्षण वाटलेले आहे. शिवाजी हा अवतारी पुरुष होता, अशीच बखरकारांची श्रद्धा होती. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची इतिहासनिष्ठ चिकित्सा करताना राजवाडे, शेजवलकर आदी इतिहासज्ञांचा अभिप्राय याच प्रकारचा आहे असे दिसते.

शहाजीराजांच्या कारकीर्दीपासून ते राजारामाच्या मृत्यूपर्यंतच्या काळाएवढी शिवकालीन भावविश्वाची व्याप्ती असल्याचे, शिवाजी, संभाजी व राजाराम या चारही कारकीर्दीना व्यापणारा कालखंड हाच शिवकालीन भावविश्वाच्या व्याप्तीचा काल असल्याचे द. ग. गोडसे यांनी म्हटलेले आहे (गोडसे, १९७२: ३७ ). शिवकालीन भावविश्व आणि त्या भावविश्वाचा अविष्कार करणारी 'शक्तीसौष्ठव शैली' याविषयी गोडसे यांनी सविस्तर विवेचन केलेले आहे. गोडसे यांच्या मते, शिवकालीन मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वामन पंडित यांचे वाङ्मयीन अविष्कार शक्तीसौष्ठव शैलीतलेच कसे आहेत हे स्पष्ट करणारी अनेक उदाहरणे या साऱ्यांच्या साहित्यातून काढून देता येतील. गोडसे यांच्या मते, शिवकालीन भावविश्वाचा निर्भर वारा प्यालेले वाङ्मय म्हणजे शिवकालीन शाहिरी वाङ्मय.

साहित्यक्षेत्रात शिवकाळात विविध प्रकारचे साहित्य निर्माण झाले. परमानंदचे शिवभारत हे शिवरायांचे चरित्र, पर्णालपर्वतग्रहणाख्यानम इ. जयराम पिंडेचा पन्हाळा विजय विषयक ग्रंथ, शिवरायांच्या आज्ञेवरून तयार केलेला 'राज्य व्यवहारकोश' (रघुनाथ पंत हनुमंते, धुंदीराज लक्ष्मण व्यास ), छत्रपती संभाजी महाराजांनी राजकारणावर लिहिलेला 'बुधभूषण ' हा ग्रंथ शिवकालीन राजकीय व्यवहाराची माहिती देणारा आज्ञापत्र ग्रंथ. महत्वाच्या घटनांची , घडामोडींची माहिती देणाऱ्या सभासद बखरी, कलमी बखर इ बखरी. संत तुकाराम, संत रामदासांचे वाङ्मय, अगीनदासाचा अथवा अज्ञानदासाचा अफजलखानावरील पोवाडा, तुळशीदासाचा 'सिंहगड पोवाडा' यांचा उल्लेख करावा लागतो. या लेखनात संस्कृत बरोबर मराठीचा देखील समावेश होतो.

धार्मिक जीवनात वारकरी संप्रदाय, रामदासी पंथ महत्वाचे होते. रामदासांनी प्रयत्नवाद, कर्मयोग व बलोपासना करण्याची शिकवण दिली. तर संत तुकारामांनी समाजातील भोंदूपणावर कडाडून हल्ला चढवत सदाचार, भक्तीचे,प्रयत्नांचे, अभ्यासाचे महत्व स्पष्ट केले.

## १.९ समारोप

शिवकाळाचा विचार केला तर हे स्पष्ट होते की राजतंत्रात्मक शासन असले तरी ते शोषक नव्हते. प्रजेच्या कल्याणाची, प्रगतीची त्यात जशी काळजी घेतली जात होती, तशीच धार्मिक सहिष्णुता ही जपली गेली. मध्ययुगाच्या मर्यादा असल्या तरी रचनात्मक कार्य करणारे छत्रपती शिवाजी महाराज त्यांच्या काळातील इतर शासकांमध्ये जसे वेगळे ठरतात तसेच ते आजही अनेक बाबींत आदर्श व प्रेरणादायी ठरततात , ते त्यांच्या जीवनकार्यामुळे.

## २.१० संदर्भ ग्रंथ :

१) आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण शिल्पकार चरित्रकोष: इतिहास ,साप्ताहिक विवेक, २००९

२) अशी होती शिवशाही , अ. रा. कुलकर्णी , राजहंस प्रकाशन

३) मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन,२००५

४) 'वार्षिकी २०१४ :महाराष्ट्र भाग १',संपा. तुकाराम जाधव, युनिक ॲकाडमी,२०१४

५) History of the Marathas, Pednekar, Mukadam, Manan Publication

## २.११ प्रश्न

१) शिवकालीन राजकीय परिस्थितीचा सविस्तर आढावा घ्या.

२) शिवकालीन समाजाचे आणि संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

३) शिवकालीन प्रशासकीय व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

४) शिवकालीन वाङ्मय निर्मितीचा आढावा घ्या.

५) शिवकालीन अर्थकारणाचे स्वरूप स्पष्ट करा.

६) शिवकालाचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विशेष स्पष्ट करा.

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# वाङ्मयीन प्रेरणा

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ संत तुकाराम
२.३ संत तुकारामांचे अभंग
२.४ संत बहिणाबाई
२.५ संत बहिणाबाईचे अभंग
२.६ संत रामदास
२.७ संत रामदासाचे वाड़:मय
२.८ संत वेणाबाई
२.९ संत वेणाबाईच्या साहित्याचा परिचय
२.१० समारोप
२.११ संभाव्य प्रश्नावली
२.१२ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे :-

१) शिवकालीन कालखंडाचा परिचय करून देणे.

२) तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा परिचय करून देणे.

३) संत तुकारामांच्या वाड़:मयीन कार्याचा परिचय करून देणे.

४) संत बहिणाबाईच्या वाड़:मयीन कार्याचा परिचय करून देणे.

५) संत रामदासांच्या साहित्याचा परिचय करून देणे.

६) संत वेणाबाई यांच्या कार्याचे स्वरूप व्यक्त करणे.

७) महाराष्ट्र धर्माचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

## २.१ प्रस्तावना :

'शिवकाल' या कालखंडाचा एक मोठा विशेष म्हणजे या काळात महाराष्ट्राला एक नव्या धर्मियांचा परिचय झाला. उत्तरेकडून आलेले इस्लामी आक्रमण महाराष्ट्रात स्थिरावले. देवविषयक कल्पना, आचार विचार, तत्त्वज्ञान, संस्कृती, राजकीय जागृती इ. वेगवेगळ्या बाबतीत सर्वस्वी वेगळ्या अशा परंपरेचा आघात महाराष्ट्रावर झाला. राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात बजबजपुरी माजली. देवधर्म, मूर्तिपूजा, मंदिरे, धार्मिक कृत्ये यांना अवकळा आली. लुटालूट, कत्तली, जुलूम आणि दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींनी महाराष्ट्र त्रस्त झाला. दक्षिणेत तुंगभद्रेच्या दक्षिण किनाऱ्यावर स्थापन झालेल्या

विजयनगरच्या राज्याचा एक धागा पूर्वपरंपरेचा होता. याच काळात अहमदनगर, विजापूर वऱ्हाड, गोवळकोंडा येथे इस्लामी राज्ये नांदली. नगर येथील निजामशाही व विजापूरची आदिलशाही यांच्या स्वामित्वाखाली महाराष्ट्राचा बराचसा भाग होता. या ही आधी काही शंभर दीडशे वर्षे गुलबर्ग्याच्या बहामनीशाहीचा अंमल महाराष्ट्राच्या काही भागांवर होता. इस्लामी राज्य परंपरेत प्रारंभी लढाया, खून, रक्तपात, विश्वासघात, धर्मवेडापयी भयंकर कृत्ये यांचेच थैमान होते.

या पारतंत्र्याच्या व अराजकाच्या काळात ब्राह्मण व क्षत्रिय यांचे तेज कमी झाले. अनेकांनी मुसलमानी सत्ताधीशांची ताबेदारी पत्करण्यास सुरूवात केली. आणि  या परिस्थितीत धर्माचे स्वरुपही पालटले. अनके सुलतानी संकटांनी ग्रस्त झालेले, तशाच त्या ठिकाणी दुष्काळासारख्या आपत्ती समाजाला टिकून होत्या. परंपरागत वर्णधर्माचा लोप पावत होता. अनाचार माजत राहिला. फसवेगिरी, बुवाबाजी, ढोंग यांना ऊत आला. पोटासाठी समाजात नवनवी कर्मकांडे आली. त्यासाठी नवससायास आले. खरे आत्मज्ञान कोणालाही नको होते. लुटालुट, जाळपोळ आणि अत्याचार यांनी त्रस्त झालेली प्रजा या भोंदू गुरुच्या भोवती अगतिकपणे जमा झाली. क्षत्रिय व ब्राह्मण यांचे तेज कमी झाल्यामुळे बजबजपुरी माजली होती. धर्म विचित्र अवस्थेला येऊन पोचला होता. क्षुद्र देवदैवतांचा बडेजाव माजला होता. सात धाण्यांचे कडबोळे, तेल, काजळ, कुंकू, मालिदा यावर देव संतुष्ट होत होते. जोगी, जंगम, फकीर, साधू, बैरागी यांच्या स्वार्थी भटकण्यातून खऱ्या धर्माची ओळख कोणासच होत नव्हती. त्याच काळात अशा वातावरणातच मुसलमानी आक्रमणांनी या समाजाची घडी विस्कटलेली होती. समाजमन कणखर व्हावे, यासाठी संतांनी कार्य केले.

## २.२ संत तुकाराम

वारकरी संप्रदायाच्या मालिकेतील तुकोबा हे अखेरचे महत्त्वाचे संत ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर महाराष्ट्र पारतंत्र्यात गेला. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरणावर झाला. तुकोबांच्या जीवनकाळात उत्तरेतील मोगलांचे आक्रमण थोपविण्यासाठी सर्व बहामनी कुळांची धडपड चालू होती. निजामशाही, आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही या आप-आपसांत लढत होत्या. मोगल आणि निजामशाही यांच्यात वैर असल्यामुळे सततच्या संघर्षामुळे तुकोबांच्या गावाच्या आसपासचा प्रदेश उजाड झाला होता. यावनी चालीरीती, संस्कृती, भाषा, रूढी व परंपरा यांचा खोल परिणाम मराठ्यांवर झाला. सतत चालेल्या संघर्षामुळे मराठी प्रदेशातील अर्थव्यवस्था ढासळून गेली होती. समाजात प्रचंड अव्यवस्था माजली होती. समाजात ढोंगी लोकांची संख्या वाढली होती. समाजाची दैन्यावस्था झाली होती. लोक आचारभ्रष्ट झाले होते. समाजाची फसवणूक चालू होती.

इ.स.१६२८ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. अन्नपाण्याअभावी अनेक माणसे, गुरेढोरे, पशुपक्षी हे तडफडून मेले. महागाई भयंकर वाढली. अनेकांचे दिवाळे निघाले, दिवाळखोरी, दारिद्रय, अप्रतिष्ठा आणि अपमान यामुळे तुकारामांच्या मनातील सुरक्षिततेची भावना नाहिशी झाली. तुकोबा अंर्तबाह्य हादरले. परिणामी संसाराची विरकपी येऊन तुकारामांच्या वृत्ती उदासीन झाल्या. त्यामुळे प्रपंच व व्यवसायाकडे तुकारामांनी पाठ फिरविली.

तुकारामांच्या जीवनातील खराखुरा क्रांतिकाल म्हणजे एकवीस-बाविसावे वर्ष होय. या कालखंडानंतर तुकारामांच्या विचारसरणीची दिशाच बदलली. तशातच गीता आणि भागवत या ग्रंथांचा तुकारामांचा व्यासंग गाढा होता.

प्रेरणा : १६३३ मध्ये तुकारामांना बाबाजी बैलथांनी स्वप्नात गुरुपदेश दिला. गुरूंगी त्यांना रामकृष्ण हरी हा मंत्र दिला. थोड्याच दिवसांत त्यांना कवित्त्वस्फूर्ती झाली. तुकारामांचे साडेचार हजार अभंग उपलब्ध आहेत.

## २.३ संत तुकारामांचे अभंग:

विठ्ठल : घरी विद्येची परंपरा नाही. विठ्ठलच आपल्या मुखातून बोलतो आहे अशी त्यांची धारणा होती. आत्मसंयम, अहिंसा, करुणा, क्षमा, शांती ही शाश्वत मूल्ये वारंवार येतात. ह्या मुल्यांच्या आग्रहाने व प्रसाराने संस्कृतीची एकात्मकता सुरक्षित ठेवली. तुकाराम हे सिद्धहस्त कवी आहेत. तेच वास्तव आहे.

परिमळ म्हणून घोळू नये फूल। खाऊ नये मूल आवडले।
काय एक नव्हे धडितां अंतरी। कासवीचे परी वेळोवेळी।
मोतियांचे पाणी चाखू नये स्वाद। यंत्र भेदूनि नाद पाहू नये।
कर्मफळ म्हणूनी इच्छू नये काम। तुका म्हणे कर्म दावूं लोकां॥

फुलास मधुर सुगंध आहे म्हणून ते एकदम कोणी चोळून टाकत नाही. मूळ आवडते म्हणून कोणी खाते का? कासवीप्रमाणे आपल्या पिलांचे नजरेने पालन करता येणार नाही का? चमकदार मोत्यांची पाणी चाखण्याचा वेडेपणा करू नये अथवा मधुर ध्वनीचे वाटा फोडून कोणी त्याचा नाद पाहू नये. तद्वतच कर्म देणारी फळे असली तरी इच्छा धरून कर्म करू नये. तुकारामांना लोकसंवाद साधण्याची हौस आहे. कर्मफळांची इच्छा करून कर्म करू नये. हे सांगताना तुकारामांनी विविध दृष्टांत दिले आहेत.

तुकारामांनी सज्जनांची महती अनेकदा गायिली आहे. सज्जनांबद्दल सांगताना ते असे म्हणतात की –

करितो कवित्व म्हणाल हे कोणी।
नव्हे माझी वाणी पदरीची।
माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार।
मज विश्वंभर बोलवितो

ही त्यांची आपल्या कवित्वाविषयी नम्रतेची भूमिका होती.

**भक्ती :**

तुकारामांच्या अभंगसृष्टीची मुख्य प्रेरणा म्हणजे भक्ती. विठ्ठलाची भक्ती त्यांनी केली त्याचबरोबर शिव आणि राम या देवतांची स्तुती गायिली आहे. विठ्ठल हा परमेश्वर असून तो सखा, पिता, माता, प्रियकर व वल्लभ आहे. भक्तीमध्ये ओढ व तीव्रता आहे. त्यांना

munotes.in

विठ्ठलरूपाचे आकर्षण आहे. त्याच्या पायाशी सर्वसुख आहे. तुकाराम विठ्ठलाचे नाते माऊलीशी जोडतात.

तू माउलीहून मयाळ। चंद्राहूनि शीतळ।
पाणियाहूनि पातळ। कल्लोळ प्रेमाचा।
त्यांच्या अभंगातून विठ्ठलभेटीची तळमळ जाणवते.

**नीतिधर्माचा प्रसार :**

मानवाची श्रेष्ठता व कनिष्ठता ही अंतरंगाची शुद्धता व कर्तृत्व यावरून ठरते. मानसिक शुध्दता व सदाचार हे त्यांच्या भक्तीचे निकष आहेत. ते शुध्द आचरणावर भर देणारे होते. त्यांच्या उपदेशात विठ्ठलरूपाची ओढ व आस त्यांना लागलेली आहे. त्यांच्या हृदयातून तळमळ व्यक्त होते. विठ्ठलाचे रुप डोळ्यांत साठवावे असे त्यांना वाटते. परमेश्वराच्या निकट जाण्याची, त्यांच्याशी जवळीक साधण्याची आपली इच्छा तुकाराम व्यक्त करतात. उपमा आणि दृष्टांताचा मेळ घालून तुकाराम आपली तळमळ व्यक्त करतात.

भेटी लागी जीवा लागलीसे आस। पाहे रात्रं दिवस वाट तुझी।
पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन। तैसे माझे मन वाट पाहे।
दिवाळीच्या मुळा लेकी आसावली। पाहतसे वाटुली पंढरीची।
भुकेलिया बाळ अतिशोक करी। वाट पाहे परि माऊलीची।
तुका म्हणे मज लागलीसे भूक। धावूंनि श्रीमुख दावीं देव॥

पौर्णिमेचा चंद्र जसा चकोरास जीवन वाटतो तसे माझे मन वाट पाहात आहे. दिवाळीच्या वेळी माहेराच्या आमंत्रणाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या मुलीप्रमाणे अथवा भुकेलेले बाळ आई करिता जसा अतिशोक करतो त्याप्रमाणे माझे मन आता व्याकुळ झाले आहे. तेव्हा आता श्रीहरीने येऊन मला आपले श्रीमुख दाखवावे. अशी विठ्ठलभेटीची इच्छा तुकाराम व्यक्त करतात. काव्यातील उपमा (चकोर-चंद्र) आणि व्यवहारातील दाखला (आई-मूल आणि माहेर – मुलगी) असा सुंदर मेळ अभंगात घातला आहे.

तुकारामांनी अंतिम आनंदाच्या प्राप्तीसाठी मनाशी संवाद साधून कवितेची उभारणी केली. स्वानुभवातील आत्म साक्षात्कारानंतर त्यांची खरीखुरी कविता आकाराला आली. तुकारामांची कविता आत्मसंवादी आहे.

चंदनाचे हात पाय ही चंदन। परिसा नाही हीन कोणी अंग।
दीपा नाही पाठी पोटी अंधकार। सर्वांगे साकर अवघी गोड।
तुका म्हणे तैसा सज्जनापासून। पाहातां अवगुण मिळे चिना॥

सज्जन हे चंदन, दीप, साखर यांच्याप्रमाणे अवगुणहीन असतात. आपल्याकडे काही राखून न ठेवणे हा चंदनाचा दीपाचा, साखरेचा गुण सज्जनांना आपोआपच मिळतो. चंदन आणि सोने ही प्रतिमा सज्जनांचे हृदय व्यक्त करण्यासाठी करतात.

तुकारामांच्या अभंगात विठ्ठलभक्तीचा साक्षात्कार व त्याला भेटण्याची तळमळ दिसून येते.

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटावरी ठेवूनियां।
तुळशीहार गळं कासे पीतांबर। आवडे निरंतर तेचि रूप।
मकरकुंडले तळपती श्रवणी। कंठी कौस्तुभमणि विराजिता।
तुका म्हणजे माझे हेचि सर्व सुख। पाहीन श्रीमुख आवडीने ॥

त्याच्या या प्रसिद्ध अभंगात तुळशीहार, मकरकुंडले, कौस्तुभमणी, पीतांबर यांनी साकारलेल्या सगुण रूपाचे दर्शन आहे. भक्त पुंडलिकाने फेकलेल्या विटेवर हे विठ्ठलाचे सुंदर ध्यान आहे. श्रीविठ्ठलाचे अती व मनोहर, सुंदर व सुखकारक रूप आहे. हे श्रीमुख मला सतत आवडीने पाहावे असे वाटते. यातच माझे सर्व सुख आहे असे ते म्हणतात. जीवनामध्ये त्यांना जे जे अनुभव आले त्या त्या अनुभवातून ते धीटपणे सामोरे गेले. त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. समाजाचे रोकठोक मूल्यमापन करताना तुकाराम नीतिशिक्षकाची भूमिका बजावताना दिसतात. ते नास्तिक मतांचे खंडण करतात. विठ्ठलाच्या नामाची गोडी वाढवून त्याचा अहोरात्र प्रसार करणे हेच आमचे काम आहे.

आम्ही वैकुंठवासी। आलो या चि कारणासी।
बोलले जे ऋषी। साच भवि वतीया।
झाडु संत्रांचे मारग। आडराने भरले जग।
उच्छिष्टाचा भाग। शेष उरले ते सेवूं।
पिटू भक्तीचा डांगोरा। कळिकाळासी दरारा।
तुका म्हणे करा। जयजयकार आनंदे ॥

आम्ही वैकुठीचे जन इहलोकात याच कारणासाठी आलो आहोत. ऋषीनी सांगितलेला मार्गच आम्ही आचरणात आणला आहे. संतांचा विचारमार्ग स्वच्छ करू आणि भक्तीचा डांगोरा पिटू. लोकांना नीतिमार्ग सांगून सन्मार्ग दाखविणे यात त्यांना रस आहे. जगाला सदाचरणाचा मार्ग दाखवितात. माणसाचे मोठेपण हे त्याच्या जातीवरुन ठरत नाही. तर एकातांत स्वयंस्फूर्तीने प्रकट झालेले आहेत.

तुका म्हणे होय मनासी संवाद।
आपुलाचि वाद आपणासी ॥ -

अशी त्यांच्या मनाची अवस्था आहे त्यामुळे अभंगात सहजोद्गार निघतात.

तुकारामांच्या कवितेतील संवाद असे :-

परिसे गे सुनबाई। नको वेचू दूध दही।
भिक्षुक आल्या घरा। सांग गेली पंढरपुरा ॥
सून म्हणे बहुत निके। तुम्ही यात्रेसी जावे सुखे।
सासूबाई स्वहित जोडा। सर्व मागील आशा सोडा ॥

(सासू-सून संवाद)

तुकारामांची कविता बहुसंवादी ठरते.

तसेच आपल्या पत्नीबरोबरचे संवादही येतात.

न करवे धंदा । आइता तोंडी पडे लोंद ॥

उठिले ते कुटिले टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ

(जिजाई – तुकाराम संवाद)

तुकारामांच्या या अभंगात पंढरपुरला जाणारी एक सासू (आवा) आपल्या सूनेला संसारातील कोणत्या गोष्टी सांभाळावयाच्या ते सांगून, जास्त जेवू नको, फार खर्च करू नकोस असे सर्व काही सांगते – व शेवटी वेशीपासून पुन्हा घरी येते. –

मुले लेकरे घरदार । माझे येथेचि पंढरपूर – असे ती गुणांवरून ठरते, असे तुकारामांचे मत होते. राक्षसी स्वभावाचा आणि निर्दय अंत:करणाचा माणूस उच्च कुळातील व उच्च जातीतील असला म्हणून मोठा ठरत नाही. येथे जाती अप्रमाण आहे. आपल्या अंगी दया-क्षमा-शांती हे सद्‌गुण असणारा मनुष्यच मोठा आहे मग तो कोणत्याही जातीचा असो. अस्पृश्य जातीत जन्माला आलेली माणसे ही ब्राह्मणापेक्षाही श्रेष्ठ असू शकतात.

ब्राह्मण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्वता निश्चयेसी ।

रामकृष्ण नामे अचारी सरळें । आठवी सावळे रुप मनी ।

शांति क्षमा दया अलंकार अंगी । अभंग प्रसंगी धैर्यवंत ।

तुका म्हणे गेल्या षड़उर्मी अंगे । सांडुनिया मग ब्रह्मचि ती ।

जो रामकृष्ण नामाचा उच्चार करतो, मनात ईश्वरमूर्तीचे ध्यान करतो, दया, क्षमा, शांती या गुणांनी तो अलंकृत आहे. संकटकाळी जो धैर्यशील राहतो, कामक्रोधादि षडरिपू ज्याला सोडून गेले आहेत, असा मनुष्य जातीने अंत्यज असला तरी तोच खरा ब्राम्हण होय. भक्ति मार्गात परमेश्वरप्राप्तीचा व भक्तीचा अधिकार चांडाळा नाही असल्यामुळे व मुळात भेदभाव नसल्यामुळे अस्पृश्याला शिवल्यावर रागावणार खरा ब्राम्हणच नव्हे, कारण सर्वव्याप्त ब्रह्माचे ज्ञान त्याला झालेले नसते.

महारासि शिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ।

नातळे चांडाळ । त्याच्या अंत्तरी विटाळा ।

चांडाळाला शिवल्यावर विटाळ होतो असे जो मानतो त्याच्या मनातच विटाळ असतो. उच्च वर्ण आणि कनिष्ठ वर्ण यांची मूळ एकल्याची भूमिका कायमच चालू आहे. सामाजिक भेदभावामुळे उत्पन्न झालेली विषमता टळेल आणि सामाजिक अन्याय नष्ट होतील. समाजातील दारिद्रयाने आणि अज्ञानाने तुकोबा व्यथित होतात पण दंभाने ते पेटून उठतात. ढोंगी, दांभिक साधु बैराग्याचा बुरखा टराटरा फाडून टाकतात. समाजातील दांभिकतेला कडाडून विरोध करतात. त्यांनी त्यांचे स्वरूप उघडे केले आहे -

नको दंतकथा येथे सांगो कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ।

अनुभव येथे व्हावा शिष्टाचार । न चलती चार आम्हांपुढे ।

निवडी वेगळे क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळाली ।

तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे । येरा गबाळाचे काय काम ॥

माझ्याजवळ कपोलकल्पित कथा सांगू नका. अनुभवरहित बोल खरे कोण मानतील? अनुभव हाच शिष्टाचाराचा दंडक व्हावा. आमच्यापुढे अनुभवाचा आधार नसलेले इतर उपाय चालणार नाहीत. एकत्रित असलेले दूध तुकारामांच्या भोवतीच्या समाजात क्षुद्र दैवतांचा सुळसुळाट झाला होता. त्या क्षुद्र दैवतांमध्ये –

नव्हे जोखाई जाखाई। मायराणी मेसाबाई ॥१॥
बळिया माझा पंढरिराव। जो या देवांचाही देव ॥ धृ ॥
रंडी चंडी शक्ती। महामांस भासिती ॥२॥
बहिरव खंडेराव। रोटी सुटीसाठी देव ॥३॥
गणोबा विक्राळ। लाडु मोदाकांचा काळ ॥४॥
मुंजा म्हैसासुरें। है तो कोण लेखी पोरे ॥५॥
वेताळे फेताळे। जळो त्यांचे तोंड काळे ॥६॥
तुका म्हणे चित्ती। धरा रखुमाईचा पती ॥७॥

जाखाई, जोखाई, मेसाबाई, रंडी, चंडी, भैरोबा, खंडोबा, गणोबा, मुंजा, म्हसोबा, वेताळ ही शेंदरी दैवते आहेत. रंडी चंडीना मद्य आणि मांस लागते. ह्या सर्वांत विठ्ठल हा श्रेष्ठ आहे. तो देवांचा देव आहे. त्यांनी सर्व ग्राम्य देवतांची हजेरी घेतली आहे. त्याकाळी समाजात देवाच्या नावाने पशुपक्ष्यांचा बळी दिला जात असे. क्षुद्र देवतांच्या पुढे नवस बोलले जात असत. त्यातूनच अंधश्रध्दा वाढीस लागली होती.

तुकोबांनी लोकांना संसारात कसे वागावे यासाठी सुंदर उपदेश केला आहे ते म्हणतात –

माणसांनी जगातील कुप्रवृत्तीपासून दूर राहावे आणि आपले मन शुध्द ठेवावे असा पुन्हा-पुन्हा उपदेश तुकारामांनी केला आहे. लोकांनी संसारात कसे वागावे यासाठी सुंदर उपदेश केला आहे. ते म्हणतात –

जोडीनिया धन उत्तम वेव्हरे। उदास विचारे वेच करी।
....परउपकारी नेणे परनिंदा। परास्त्रिया सदा बहिणी माया।
भूतदया गाई पशूंचे पालन। तान्हेल्या जीवन वनामाजी।
शांतिरूपे नव्हे कोणाचा वाईट। वाढवी महत्त्व वडिलांचे।
तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे ॥

सचोटीचा व्यवहार करून धन मिळवावे आणि उदास वृत्तीने ते खर्च करावे. गैरप्रकारांनी खूप पैसे गोळा करणे, त्याच्या जोरावर विलासी जगणे, पैशाच्या जोरावर उन्मत्तपणे वागून दुसऱ्यांचा छळ करणे या गोष्टींना तुकारामांचा विरोध होता. दुसऱ्यांवर उपकार करावा, दुसऱ्याची निंदा करू नये, परस्त्रियांना आई-बहिणीप्रमाणे मानावे . प्राणीमात्रांविषयी दया बाळगा. वनातील तहानलेल्या वाटसरूसाठी पाण्याची सोय करावी. कुणाचेही वाईट चिंतू नये, करू नये. शांत वृत्ती धारण करावी. कुणाचा मत्सर करू नये. आपल्यापेक्षा वडील असलेल्यांचा आदर करावा. जीवनात वाईट लोकांची संगती कधीच असू नये. देण्याची उदारता आमच्याकडे आहे. सज्जनाला आम्ही कमरेची लंगोटी देऊ तर दुष्टाच्या डोक्यात काठी मारू. आम्ही आईवडिलांपेक्षा प्रेमळ आहोत पर वेळ आल्यावर शत्रूपेक्षाही मोठा

घातपात करू. आमच्या वागणुकीपुढे अमृताची गोडी फिकी आहे तरी प्रसंगी विषाने लाजावे इतकी घातक आमची वागणूक असते. खरे पाहता आम्ही पूर्णत: गोडच आहोत. ज्याची जी इच्छा असेल ती आम्ही पूर्ण करू. तुकारामांनी साधूलाच प्रत्यक्ष परमेश्वरच मानले आहे.

जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥
मृदृ सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ॥
ज्यासि आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी ॥
दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगु किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥

समाजातील रंजल्या गांजल्या लोकांना जो प्रेमाने आपले म्हणतो, तो साधु होय, तोच देव होय. सज्जनाचे चित्त लोण्याप्रमाणे अंतर्बाह्य मऊ असते. निराधारांना जो प्रेमाने हृदयी धरतो आणि सेवकादिकांवर जो मुलांप्रमाणे दया दाखवितो, त्याच्याविषयी काय सांगावे ? ती भगवंताची प्रत्यक्ष प्रतिमाच आहे.

परस्त्री, मद्यपान एवढेच त्यांच्या दृष्टीने जीवन असते. असे लोक अपवित्र जीवन जगतात. रसना, विषय आणि कीर्ती यासाठी ते घटावलेले असतात. अशा लोकांवर टीका करताना तुकोबा म्हणतात –

ऐसे कैसे जाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ॥१॥
अंगा लावूनिया राख । डोळे झांकुनी करिता पाप ॥२॥
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ॥३॥
तुकाम्हणे सांगोकिती जळोतयांची संगती॥४॥

स्वत: वाईट कर्मे करतात आणि स्वत:ला साधू म्हणतात. डोळे झाकून पाप करतात. अशा लोकांची संगती नको असे सांगतात.

तुकारामांची भाषाही खेड्यापाड्यातील भाषा आहे. लोकाध्दाराच्या आणि आंतरिक ओढीतून त्यांचा भाषा आकाराला येते. तुकारामांच्याकवितेचीभाषात्रासादिकआहे. त्यांचे लोकजीवनाशी निगडीत असलेले अभंग म्हणजे बोल भाषाच आहे. तुकारामांची भाषा हृदयाला भिडणारी आहे. ती मितभाषी आहे. त्यांची परस्पराविरोधी भाषाभिव्यक्ती आहे.

मराठी सारस्वताचे ते महान लोकधन आहे. त्यांच्या अभंगाचा सूक्ष्मनर्म विनोद हा विशेष म्हणता येईल.

तुकारामांच्या कवितेत अशा अनेक प्रसंगांतून, विषयातून विनोद – उपहासाची पखरण झालेली दिसून येते. उदा : कर्कश बायको, व्याभिचारिणी स्त्री, बायकोच्या अधीन झालेला नेभळट, लाचार नवरा, ज्यांना विरकप होणे जमले नाही असे स्त्रीपुरुष, भोळे, मतिमंद, वेडेलोक, कवित्व मिरविणारे, चोरणारे नकली कवी, भोंदूसाधूइ. लोकांना तुकारामांनी

विनोद – उपहासातून टीकेचे लक्ष्य बनविले. वा.ल.कुलकर्णी तुकारामांच्या भाषेबद्दल म्हणतात की – ही वाणी म्हणजे तुकारामांच्या व्यक्तिमत्वाचा मुक्त आविष्कार आहे.

तुकारामांसारख्या संतश्रेष्ठाचा साक्षात्कार हा कधीही एकेरी नसतो. त्याला एक सामाजिक अंग असते.

आपण जेवुनी जेवजी लोकां । संतर्पण करी तुका । हे त्यांचे श्रेष्ठ लोककार्यच आहे. सर्वांना सन्मार्ग दाखवून दिलासा देण्याचे काम तुकोबाने कधी कळवळ्याने तर कधी रागावून केले.

तुकारामांची बुध्दी कुशाग्र होती, त्याची भक्ती व श्रध्दा अलौकिक होती. तुकारामांच्या गौरव मुक्तकंठाने सर्व समाजात गौरव केला आहे. त्यांच्या अलौकिक गुणांबद्दल अतिशय आदर वाटत आहे.

वृक्षवल्ली आम्ही सोयरी वनचरे । पशीही सु-स्वरे आळीवीती ।

साधकावस्थेत काळात तुकारामांनी आपली तपसाधना कशी केली ते या अभंगात सांगितले आहे. जनसमुदाया पासून दूर एकान्तात परमेश्वर विषयक जे चिंतन त्यांनी केले त्यास ते 'क्रिडा' म्हणतात. हरिकषांचे स्मरण-मनन करीत असताना भंडावणाऱ्या विविध प्रश्नांच्या उत्तरासाठी मनातल्या मनातच त्यांचा चाललेला संघर्ष येथे उल्लेखिला आहे. तरीपण रानातला आपला जीवनक्रम एकंदरीत किती सुखावह होता याचीच आठवण करीत आहे.

लहानपण देगा देवा । मुंगीसाखरेचा रवा ।

रात्रंदिन आम्हां युध्दाचा प्रसंग । अंर्तबाह्य जग आणि मन ।

आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच ?? यत्न करू ।

तुकारामांचे अभंग म्हणजे मराठी माणासाचे धन आहे. हा अमोल वचनांचा ठेवा आहे. मराठी माणसाचे जीवनमूल्यांचे भान त्यामुळे जागे राहिले आहे.

## २.४ संत बहिणाबाई :

बहिणाबाईस तुकोबांची संगत लागली होती. ही कवयित्री तुकोबांना आपले गुरू मानते. तिचा प्रप्रंच अत्यंत दु:खदायक व कष्टदायक होता. तिला तुकोबांचा सहवास संतोषदायक वाटत होता. एक थोर कवियित्री म्हणून बहिणाबाईची योग्यता मोठी आहे.

ज्ञान, भक्ती, वैराग्य, ब्रह्म, माया, विठ्ठल, पंढरी, संतसंगत, अनुताप, सद्गुरू, प्रतिव्रता धर्म अशा अनेक विषयांवर त्यांनी अभंग लिहिले आहेत.

बहिणाबाईंनी ५३ अभंग लिहिले. आत्मवृत्त तिने विस्ताराने वर्णन केले आहे. हे अभंग अतिशय कदणरसपूर्ण आहेत. बहिणाबाईंनी मागील ३५ अभंगात तिने आपल्या मागील तेरा जन्मांचा आश्चर्यकारक वृत्तान्त सांगितला आहे. बहिणाबाईच्या अभंगात श्रीसुलभ गोडवा व प्रसाद आहे.

## २.५ संत बहिणाबाई अभंग:

"मस्त्य जैसा जळावाचुंनी चरफडी। तैसी ते आवडी तुकोबांची" असा वेध घेतला आहे.

तुकोबांनी तिला स्वप्नात आदेश दिला व हाती गीता दिली. पुढे तिला प्रत्यक्ष तुकारामांचा सहवास लाभला.

नित्य हरिकपा होतसे देउळी। तुकोबा माऊली वैष्णवांची। असा प्रत्यय आलेला दिसतो.

बहिणाबाई यांचा एक प्रसिद्ध अभंग म्हणजे "संतकृपा जाली । इमारत फळा आली ।" बहिणाबाईंचे 'ब्राह्मण कोणास म्हणावे' या विषयावरील बहिणाबाईंचे ४३ अभंग आहेत. हे आजही जातिविचार करणाऱ्या पुरोगामी विचारवंताना थक्क करून सोडणारे आहेत.

'ब्रह्मभाव देही सदा सर्वकाळ। ब्राम्हण केवळ तोचि एक।'

बहिणाबाईस कवित्वाची स्फूर्ती कशी झाली एक साहित्यिक म्हणून तिचा जन्म कसा झाला हे अभंगातून व्यक्त केले आहे.

लावियेले नेत्र निदृत जागृती। तुकाराम मूर्ति देखियली।

ठेवियला हस्त मस्तकी बोलून। दिधले वरदान कवित्वाचे॥

बहिणी म्हणे नेणे स्वप्न की जागृती।

इंद्रियाच वृत्ती ओसरल्या॥१॥

बहिणाबाईंचा पती कामानिमित्त पुण्यास गेला असता त्यांच्या आईची परवानगी घेऊन तीन रात्री त्यांनी आनंद ओवरीत राहून ध्यान केले. त्यावेळी त्यांना हा अनुभव आला. बहिणाबाईच्या जीवनावर तुकारामांचा फार मोठा प्रभाव पडला.

अवघेचि ते जन्म आठवती मज।

अंतरीचे गुज मृत्यु वेळा।

आदशीत जैसे दिखे प्रतिमुख।

तैसे जन्म देख दिसती डोळा।

अशी त्यांनी ग्वाही दिली आहे. बहिणाबाईंना याची जाणीव हे लोक 'लटिके' मानतील, परंतु ते मुर्ख आहेत. म्हणून त्यांना हे सांगूच नये. त्यांना तेरा जन्मांपूर्वीचे सारे काही आठवते. पण ते सांगण्याचा आपला उद्देश नाही असे त्या म्हणत. देवाच्या कृपेवाचून कितीही मोठा माणूस असो त्याला हे कळणार नाही. येथे नम्रच झाले पाहिजे.

नामसंकीर्तन सर्व काळ जया।

भक्तिवंत तया म्हणो आम्ही॥

बहिणी म्हणे भक्ति खरी मोक्षदा ती।

पाहिजे संगती संतसेवा।

munotes.in

खरीभक्ती ही मोक्ष प्राप्त करून देते त्यासाठी संतसेवा आवश्यक आहे. नामस्मरण सर्व काळी केले पाहिजे. त्यालाच भक्त म्हणता येते. खरा भक्त कोणाला म्हणावे हे नेमकेपणाने बहिणाबाईंनी सांगितले आहे.

ब्रह्मांड जयाचे उदरी होती घडामोडी सर्वकाळ ॥

बहिणी म्हणे ते हे पंढरीची मूर्ती ।

उकारली व्यक्ती विठ्ठलमिषे ॥

वारकरी पंथात सगुण आणि निर्गुण या दोहोंचाही आदर केला जातो. विठ्ठल मूर्ती ही ब्रह्मांडापेक्षा वेगळी आहे. ती वेदांपेक्षा निराळी आहे. चोवीस तत्वांच्या पलीकडची आहे. सहा (शाक्ते) चार (वेद) अठरा (पुराण) यांनाही हे अगम्य कळेना. अशी ही पंढरीची मुर्ती आहे. वैकुंठवासी परमेश्वराने हे स्वेच्छेने निर्माण केले आहे. वारकरी सगुण आणि निर्गुर यांचा मेळ कसा घालतात हे या अभंगावरून कळते.

वारकरी संप्रदायाला गीता पूज्य आहेच. ओंकाराचे ज्ञान झाल्यानंतर तू ब्रह्म होशील. प्रणयापासून सृष्टीचा विस्तार आहे. ॐ या ओंकारापासूनच वेद विस्तारले आहेत.

बहिणी म्हणे मूळ ओंकाराचे ज्ञान ।

जालीया निर्वाण ब्रह्म होसी ॥

विठ्ठलाचे मूर्तीचे चित्रमय साजेसे रूप ती व्यक्त करते.

विटी नीट उभा समचरण साजिरे ।

पारुले गोजिरी सुकुमार ।

शोभती दंतपंक्ती जेशा हिऱ्याच्या ज्योती ।

बहणी म्हणे तया घ्याती हृदयामाजी १

विठ्ठलाची घनश्याम मूर्ती विटेवर उभी आहे. ती गोजिरी सुकुमार आहे. ती वेदांना अगोचर असून श्रृतींच पलीकडे आहे. बहिणाबाई तिला हृदयामध्येच पाहते.

विटेचा संकते पाचवी अवस्था । ब्रह्मसायुज्जता शब्द रूपा ।

करी हात दोन्ही खुणाची दाखवी । अनेक एकत्वी पहा कैसे ।

यातील रचनेचे कौशल्य वाखाण्यासारखे आहे. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या मूर्तिरूपाचा अर्थ बहिणाबाई उलगडू दाखवतात.

धन्य धन्य ते पंढरी । जेथे नांदतो श्रीहरी ।

धन्य धन्य चंद्रभागा । जेथे वास पांडुरंगा ॥

धन्य धन्य पुष्पावती । जेथे वृंदा हे श्रीपती ।

बहिणी म्हणे धन्य धन्य । पांडुरंगी जे अनय ।

बहिणाबाईंनी अभंगात वारकरी पंथाच्या प्रगतीचा इतिहास सांगितला आहे.

संतकृपा झाली इमारत फळा आली ।

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।

नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।

जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।

तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।

बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरुपर केले वोजा ।

भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे काठी घालू माथा । अशी भाषा आहे.

त्यांची भाषा म्हणजे भावकाव्याची गंगोत्री आहे.

जळावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ।

चुकलिया माये । बाळ हुरूहुरू पाहे ।

यासारखी उपमा प्रतिमांची भाषा आहे. त्यात लोक जीवन दिसले.

त्यांच्या रचनेत नादमयता निर्माण केली आहे.

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनिया ।

साधुसंत येति घरा । तोचि दिवाळी दसरा ।

यासारखी अशी प्रासदिक रचना आहे.

तुकारामांच्या बहुतेक रचना आत्माविष्काराकरिता निर्माण झाल्या. भाषा ही कधी सरळ, कधी सडेतोड, कधी फटकळ तर कित्येक वेळा अर्वाच्य ही असे. त्यांच्या वाणीतील भेदकता, बुध्दीचे स्वातंत्र्य व अंतरीचा प्रत्यय या तीन गुणांमुळे तुकोबांचे काव्य श्रेष्ठ ठरले आहे.

तुकोबांची अभंगवाणी हा मराठीतील लोककाव्याचा महान आदर्श आहे. मराठी माणसाचे आणि बहिणी म्हणे मूळ नाशासी कारण ।

क्रिया आणि धन मोक्षमार्गी ।

येथे पुरुषांचे मन जडते. याचे बहिणाबाईला आश्चर्य वाटते व ती 'धय' म्हणते. वैराग्य मनामध्ये दृढ होईल तेव्हाच आत्मज्ञान होईल.

बहिणाबाईचे समाज निरीक्षण सूक्ष्म आहे. त्यामुळे मोक्षाविषयी लोकांच्या काय, काय समजुती असतात याची ती एक यादीच देते. संन्यासी, तापसी, पंचकिरणाचा शोध घेणारे

मौनी, जपी, तपी, अनुष्ठाने, पंचमुद्रा लावणारे हे सर्वजण आपआपल्यालाच मोक्ष मिळतो असे मानतात. काहीजण नाना प्रकारच्या देवतांचे ध्यान करतात. पण बहिणाबाई स्पष्टपणे सांगते – 'मोक्ष आहे तो निराळा' आत्मज्ञानासंबंधी बहिणाबाई म्हणते, हे आत्मज्ञान बाजारात नसले. ते विवेकाने, सद्गुरूच्या सहवासाने, पांडुरंगाच्या कृपेने मिळते. साधक नाना प्रकारच्या साधना करतात. त्यांना आत्मतत्व मिळत नाही. आत्मज्ञान घेण्यासाठी विवेक, वैराग्य आणि सद्गुरूची कृपा पाहिजे. श्रवण, मनन, निजध्यास असेल तर त्यास साक्षात्कार होईल. आत्मा प्राप्त होण्यासाठी हाच मार्ग आहे. आत्मज्ञानाला संतांचा सहवास प्रेरक ठरतो. आत्मज्ञानामुळे संचित जळते. पण हे आत्मज्ञान संत संगे आकळे म्हणून संतांचा सहवास करावा.

बहिणाबाई भक्तीत पूर्णपणे रंगून गेल्या होत्या.

गाऊ नाचूं प्रेमे हरिनाम कीर्तनी । भावोनियां जनी जनार्दन ॥

बहिणाबाई गोकूळ गोपाल, गोपिका, वृंदावन, गोवर्धन या साऱ्यांची वारकरी पंथातले महापुरुष, ज्ञानदेव, नामदेव, जनार्दन, एकनाथ, तुकाराम यांनी आपले योगदान भक्तिमार्गाने दिले आहे. ज्ञानेश्वरांनी हे वारकरी संप्रदायाचे देऊळ उभे केले. नामदेवांनी त्याचा प्रसार केला. जनार्दन व एकनाथ यांनी या भक्तिपरंपरेला महाराष्ट्रात उच्च कोटीचे स्थान मिळवून दिले आणि तुकारामांनी त्यावर कळस चढविला. ही वारकरी संप्रदायाची ध्वजा कायम फडकत राहिल. हा वारकरी संप्रदायाच्या प्रगतीचा इतिहास आहे.

चालता पाऊल पंढरीच्या वाटे ब्रह्मसुख भेटे रोकडेची ।

बहिणी म्हणे ऐसा आनंद वाटेचा ।

कोण तो दैवाचा देखे डोळा ।

अभंगातून एका सिद्ध होऊ पाहणाऱ्या अंर्तमुख साधकाच्या मानसिक वाटचालीचा व चिंतनाचा प्रत्यय आपल्याला देते. बहिणाबाई निर्गुण ब्रह्माचे वर्णन करते त्याप्रमाणे ती रंगून कृष्ण अभंगही लिहिले. कृष्णाची बाळक्रीडा ही सगुण भक्तीला फार प्रेरक आहे.

देह घट लवंडोनी रिता केला ।

निजज्ञाने पाणीया भरिभला ।

बहणिी म्हणे लाधले सुखे सुख ।

जैसे जीवनी लवण समरस ।

कृष्ण घडा फोडतो याचे सुरेख वर्णन आले आहे.

क्रियांचा लोभ हा एक अवगुण असल्यामुळे बहिणाई स्त्री सहवासाचा निषेध करते.

प्रशंसा करते. कारण कृष्णाशी संबंध आलेला आहे.

बहिणाबाईने भरपूर रचना केल्या आहेत. विशेष म्हणजे त्या रचनेत वैविध्य आहे. ती कुठेही एकसूरी होत नाही. तिचे रचनेवर प्रभूत्व आहे. त्यांच्या श्लोकातून विठ्ठलाचा महिमा, शिवमहिमा, काशीक्षेत्राचा महिमा, पंढरीचा महिमा, गुरूचे सामर्थ्य, आत्म्याची थोरवी हे नानाविध विषय आलेले आहेत. विसंगती व दुंभगलेपण अभंगातून जाणवते आहे. बहिणाबाईचे आत्मबळ मोठे होते. ती स्वत:ची स्वत:च घडली व विकास केला. म्हणून ती स्वयंसिद्धा आहे.

डॉ. ना. ग. जोशी म्हणतात – मराठी संताच्या कव्यरचनेची फडकती ध्वजा म्हणूनही बहिणाबाईचा उल्लेख मराठी साहित्याच्या इतिहासात होणे हे क्रम प्राप्तच आहे

## २.६ संत रामदास :-

रामदासांचा जन्म १७ व्या शतकाच्या प्रारंभीचा इ.स. १६७८ मधला आहे. रामदासांचे मूळ नाव नारायण. बाराव्या वर्षाच्या अभ्यासानंतर ते तीर्थयात्रेच्या निमित्ताने बाहेर पडले. मुसलमानी आक्रमणाखाली सर्व समाज त्यांनी पाहिला. लोकांमध्ये दारिद्र्य व अज्ञान होते. त्यांना स्वत:च्या आध्यात्मिक मुक्तीपेक्षा लोककल्याणाची अधिक गजर आहे. लोकांना एकत्र आणण्यासाठी राम आणि मारुती या दोन देवतांचे उत्सव त्यांनी सुरू केले. शिवाजी राजांच्या राजकीय कार्याला समाजातून पाठिंबा देणारे वातावरण घडविले. शिवाजी महाराज आणि रामदास या दोघांनाही महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी कार्य केले.

तो कमी –अधिक ओव्यंचा बनला आहे.

ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।

येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग

असे प्रारंभीच म्हटले आहे.

उपासना, भक्तिभाव, वेदान्त, परमार्थ, अध्यात्मविचार यांना दासबोधात भरपूर वाव आहे.

दासबोधामध्ये व्यवहारकथन आहे. समर्थांच्या लोकस्थितीचे वर्णन आहे. प्रयत्नांची पूजा समर्थांनी सांगितली आहे.

म्हणोन आळस सोडावा । यत्न सक्षिपे जोडावा ।

आलस्य अवघाच दवडावा । यत्न उदंडाचि करावा ।

शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ।

असा त्यांचा उपदेश आहे. समर्थानी वेळोवेळी प्रपंचाचाही गौरव केला आहे.

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका । अशी त्यांची शिकवण प्रसिद्ध आहे.

गृहस्थाश्रमाचाही ते गौरव करतात.

परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तू यमयातना भोगिसी ।

सुंदर अक्षर ल्याहावे । स्पष्ट नेमंस्त वाचावे । असे सांगणसही विसरत नाहीत.

अभ्यासावे प्रगट व्हावे । नाही तरी झांकोन असावे । अशीही सूचना ते देतात.

## २.७ संत रामदासांचे वाङ:मय:

**दासबोध :-**

दासबोध म्हणजे रामदासांचे अनेक वर्षाचे चिंतन त्यांचा अभ्यास आणि त्यांचा अनुभव यामधून निर्माण झालेली एक स्वतंत्र वाङ:मयकृती आहे. हे अध्यात्मचिच निरूपण आहे हे समाजाच्या उन्मतीसाठी प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यासाठी आहे. अध्यात्मातील कृतार्थपणा व ऐहिक जीवनाची समृध्दी या दोन्ही गोष्टींना उपयोग होईल असा उपदेश रामदासांनी दासबोधातून केला. त्यातील विषय व्यापक आहेत. भक्ती, सृष्टीचा जन्म आणि विनाश, गुरू-शिष्यांची लक्षणे, पढतमुर्खाची लक्षणे. उत्तम पुरुषाची लक्षणे, चातुर्याची वैशिष्टये, प्रपंचाचे मोठेपण, राजकरणाची मूलतत्तवे, लेखनक्रिया असे असंख्य विषय दासबोधात आहेत.

अनेक ओव्यांचा बनलेला एक समास, दहा समासांचे एक दशक आणि वीस दशकांचा मिळून बनलेला दासबोध ग्रंथ आणि दासबोधाची रचना आहे. यातला प्रत्येक समास म्हणजे एकेका स्वतंत्र विषयावरचा

नाना रत्ने साठविली । ती अभाग्याने त्यागिली ।

लोखंड म्हणोनि । तैसी भाषा प्राकृत ।

असे वर्णन आहे.

समधीचा उपदेश, त्यांचे परमार्थविवरण, त्यांचा प्रपंचविवेक, पंथीयांना त्यांची शिकवण समजून घेण्यासाठी 'दासबोध' आहे.

दासबोधातील चौदाव्या शतकातील तिसऱ्या समासात दासबोधात समर्थांनी कवित्वकळीलक्षण सांगितले आहे.

जेणे घडे भगवद्भक्ती । जेणे घडे विरक्ती ।

ऐसी कवित्वाची युक्ती – हे सांगतात.

धीट, पाठ, प्रासादिक असे कवित्वाचे प्रकारही सांगितले आहे.

कवित्व नसावे धीटपाठ । कवित्व नसावे खटपट ।

कवित्व नसावे उध्दट । पाषांडमल ।।

कवित्व नसावे वादंग । कवित्व नसावे रसभंग ।

कवित्व नसावे रंगभंग । दृष्टातहीन ।

त्याचबरोबर –

कवित्व असावे निर्मळ। कवित्व असावे सरळ।

कवित्व असावे प्रांजळ। अन्वयचे

कवित्व रम्य व गोड असावे .

त्यांची कवित्व भक्तिरसाने भाविकाचा मनाचा ठाव घेणारे आहे.

दासबोध ग्रंथ वीस दशकांचा असून प्रत्येकात दहा-दहा समास निरनिराळ्या विषयांवर आहेत.

नरदेहाचे महत्त्व व सार्थक, ज्ञानोत्तर भक्ती, अध्यात्मयोग, शुध्दज्ञान, साधक व सिध्ध यांची लक्षणे, अध्यात्मज्ञानाची थोरवी, पंचमहाभूतातील देव, सृष्टीची उभारणी व संहारणी, उपासनेचे प्रकार, अंतरात्म्याची ओळख, मोक्षाचे स्वरूप, मुर्खांची लक्षणे यावरून दासबोधाच्या अंतरंगाची कल्पना येते.

जन्म दु:खाचा अंकुर। जन्म शोकाचा सागर।

जन्म भयाचा डोंगर। चळेना ऐसा।

येथपासून सुरू झालेल्या दशकात जन्म, देह, संसार यांचे भयानक वर्णन करताना दिसतात.

धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो।

अशी नरदेहाची स्तूती केली आहे. परमार्थ साधनासाठी नरदेह उत्तम पाहिजे असे त्यांना वाटे. दुर्लभ अशा नरदेहाचा नाश करू नये असे म्हटले आहे. या नरदेहामुळेच गणेशपूजन, शारदावंदन, ग्रंथलेखन, तीधीटण, श्रवणमनन, सन्मार्गसाधन, मुक्तिसाधन वगैरे गोष्टी करता येतात.

नाना वेष नाना उपाश्रम। सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम या शब्दात प्रपंचाचा वर्णन करतात.

मराठीत काय अर्थ आहे? असे विचारणाऱ्यांना ते सांगतात.

येक म्हणती मऱ्हाठे काय। हे तो भल्यासी ऐको नये।

ती मूखें नेणती सोय। अधीन्वयाची। लोहाची मांइस केली।

**करुणाष्टके :-**

करुणाष्टके म्हणजे रामभक्तीने ओथंबलेली रामदासांची भावकविता आहे. करुणाष्टांमध्ये कधी देवदेवतांची नामावली किंवा कधी विवेकाने वागण्याचा उपदेश असला तरी मुख्यत: रामाची भक्ती, त्यांच्याविषयीची अपार ओढ आणि त्यांच्या विरहाने होणारी मनाची तगमग करुणाष्टकांमधून दिसते. प्रपंचातील सुखदु:खानी शिणलेले मन रामाजवळ विसावण्यासाठी व्याकूळ दिसते.

चार-चार ओळींची कडवी आहेत. त्यांच्या मनातील तळमळ दिसून येते. मनाला लागलेली टोचणी, तळमळ आणि देवविरहाचे दु:ख व्याकूळतेने व्यक्त केले आहे.

अनुदिन अनुतापे तापलो रामराया ।

परम दिनदयाळा नीरसी मोहमाया ।

अचपळ मन माझे नावरे आवरीता ।

तुजविण शिण होतो, धाव रे धाव आता ॥

हे रामराया, मी प्रत्येक दिवशी पश्चातापाच्या आगीत भाजून निघलो आहे. हे परमेश्वरा । तू दीनांचा कैवारी आहेस, खोटे भ्रम, माया यांचा तू नाश करतोस. माझे मन मोठे चंचल आहे. कितीही प्रयत्न केला तरी भलत्या मोहांकडे धावले. आवरता आवरत नाही. तूच मला हवा आहेस. तुझ्यावाचून माझे मन तळमळले आहे. आता धावत ये.

**रामायण :-**

रामदासांनी पूर्ण रामकथा आपल्या काव्यात आणलेली नाही. मूळ रामायणातील दोन कांडे (विभाग) सुंदरकांड आणि युध्दकांड एवढ्यावरच आधारित त्याची रचना आहे. त्यातही सुंदरकांडाला महत्व कमी आहे. युध्दकांड मात्र त्यांनी विस्तारित रंगविले आहे. वीर रसाने भरलेली वर्णने त्यात आहेत. रामभक्त हनुमान हाही रामदासांचा श्रद्धाविषय होता. त्यामुळे हनुमानाचे पराक्रम, हनुमान – रावण युध्द आणि राम-रावण युध्द यांचे वर्णन करताना रामदासांना वीररसाचे भरते येते. आवेश आणि पराक्रम यांनी भरलेले प्रसंग रामदासांनी रंगविले आहेत. एक हजाराहून अधिक ओव्यांचे हे रामायण आणि १२५ श्लोकांचे लघुरामायण आणि दोन प्रकारची रामायणावरील रामदासांची रचना आहे.

बुध्दि दे रघुनायका, रघुनायका काय कैसे करावे, उदासीन हे वृत्ति कोठे न लागे, लवे नेत्रपाते स्फुरे आजि बाहे, इ. स्त्रोत्रे भाविकांचे अंत:करण सद्‌गदित करतात.

रामावरील भक्ती आणि त्याच्या विरहाने होणारी तगमग हा येथील विषय आहे. प्रपंचातील सुखदु:खांनी शिणलेले मन रामाजवळ अखेरचा विश्राम मिळावा म्हणून व्याकूळ झालेले इथे श्लोकांश्लोकांतून दिसते. जनसंपर्काला नकार, अनुतापाने ईश्वराकडे पुन:पुन्हा परतण्याची इच्छा, सांसरिक व्यापातापांच्या दु:खजाणिवा यांच्या दर्शनाने ही कविता वेगळेपणाने उठून दिसते. कामक्रोधादि षडरिपूंमुळे संवेदनशील अशा मानवी मनाचे प्रतिनिधीत्व करणारी ही करुणाष्टके म्हणजे ईश्वराचा व त्यांच्या चिंतनाचा ध्यास घेतलेल्या रामदासांची व्यक्तिगत आत्मजाणीव आहे. 'करुणाष्टके' ही धावा या काव्यप्रकारात मोडणारी रचना आहे. संकटात देवाने धावून यावे आणि आपली मुक्तता करावी अशी भूमिका येथे असते. आर्त भक्ताने व्याकूळ होऊन देवाची केलेली विनवणी हे धाव्याचे रूप असते. देवाशी केलेला हा एकतर्फी संवाद आहे. त्यांच्या भक्तीला आत्मनिवेदन हा प्रकार प्रगट होतो. येथे परमेश्वराला हाक मारलेली आहे. दु:खांनी मांडून फोडलेला टाहो हे धाव्याचे स्वरूप असते.रामदासांनाही येथे जळते हृदय माझे असे सांगितले आहे.

## मनाचे श्लोक :-



मराठीमाणसाच्या सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणजे समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक एकूण २०५ श्लोक आहेत. आपल्या मनाला उद्देशून केलेली ही श्लोक रचना आहे. रामदासी संप्रदायाची मंडळी मनाचे श्लोक म्हणून नंतर 'जय जय रघुवीर समर्थ' अशी ललकारी देत भिक्षेसाठी दाराशी येत असत.

सूत्ररूपाने जीवनासंबंधीचे मौलिक विचार या श्लोकांमध्ये गुंफिलेले आहेत. तुकारामाच्या वचनांसारखीच मनाच्या श्लोकांनाही सुभाषितांची योग्यता लाभली आहे.

मना वासना दृष्ट कामा नये रे ।

मना सर्वथा पापबुध्दी नको रे ।

मना सर्वथा नीति सोडू नको रे

मना अंतरी सार विचार राहो

अशा प्रकारचे सुबोध श्लोक म्हणजे रामदासांनी जीवनाचे सखोल चिंतन करून सामान्य माणसांसाठी लिहिलेले मौलिक असे विचार आहेत.

त्यांच्या या उपदेशाने लोकांच्या घरा-घरात प्रवेश केला आहे.

साधी, सरळ, प्रसादपूर्ण रचना मनाला भिडणारी आहे.

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा

मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥

नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।

गमू पंथ आनंत या राघवाचा ॥१॥

सर्वप्रथम कार्यारंभी गणेशाची स्तुती केली आहे. त्याप्रमाणे इथे केली आहे.

गणेश, जो सर्व गुणांचा ईश आहे, जो सर्व निर्गुणाचा मूळ आरंभ आहे. त्याला आणि देवी सरस्वती, जी चारही वाणींची मूळ आहे, तिला नमन करू आणि मग श्रीरामचंद्राचा जो अंत नसलेला मार्ग आहे त्यावर वाटचाल करू.

सज्जन मनाने कोणती पथ्ये पाळावयाची आहेत ते इथे सांगतात –

मना सज्जना भक्तिपंथेची जावे

तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे

जनी निंद्य ते सर्व सोडून द्यावे

जनी वंद्य ते सर्व भावे करावे ॥

हे सज्जन मना, नेहमी भक्तिमार्गाने गेले म्हणजे साहजिकच परमेश्वर पावतो. तेव्हा लोकांकडून ज्याची-ज्याची निंदा होईल असे सर्व काही सोडून द्यावे आणि लोकांना जे जे वंदनी आहे ते सर्व भक्तिभावाने करावे. यासाठी ईश्वरभक्ती करायला हवी व स्वत: ईश्वर प्रसन्न होईल.

इथे संत रामदास ‘सज्जन मना’ असा उल्लेख करतात.

नको रे मना द्रव्य ते पुदिलांचे

अति स्वार्थ बुध्दी नुरे पाप साचे

घडे भोगणे पाप ते कर्म खोटे

न होता मनासारिखे दु:ख मोठे।

मना दुसऱ्याच्या मनाचा हव्यास नको. अति स्वार्थबुध्दी म्हणजे केवळ पापाची धनी असते. आणि ज्या कर्मामुळे पापाचे फळ भोगावे लागेल असे कर्म करणे खोटेपणाचे असते. आणि त्या कर्मातून मनासारखे घडले नाही तर ते खूपच मोठे दु:ख ठरते. द्रव्याची संपत्तीची इच्छा अभिलाषा धरू नये. स्वार्थबुध्दी ठेवू नये. त्याचे दुष्परिमाण या जन्मात किंवा पुढच्या जन्मात भोगावे लागतील असे कर्म करू नये.

सदा सर्वदा प्रीति रामी धरावी

सुखाची स्वयें सांडी जीवी करावी.

देहे दु:ख ते सुख मानीत जावे

विवेके सदा स्वस्वरूपी भरावे

नेहमी श्रीरामाबद्दल प्रेम बाळगावे. सुखोपभोग टाळावा. देहाला पडणाऱ्या कष्टात सुख मानत जावे आणि नेहमी सारासार विवेक भरलेला असावा. रामाबद्दल भक्ति करत रहावे. सतत स्मरण करीत रहा म्हणजे इतर कुठलेही विकार होत नाही. देहसुखाचा त्याग करून श्रीरामाच्या प्रेमात रहा. असा विचार तुझ्या अंतरी भरलेला असू दे.

श्री समर्थ रामदास स्वामी यांनी लिहिलेले ‘मनाचे श्लोक’ आज आपण दैनंदिन जीवनात म्हणतो – हा आपल्या संस्कृतीचा घटक आहे. माणसाने आपले वर्तन कसे ठेवावे आणि कसे ठेवू नये याबद्दल समर्थ रामदास स्वामीनी नि:संदिग्ध खूप सविस्तर आणि मोलाचे मार्गदर्शन त्यांच्या काव्यात केले आहे.

आरत्या, स्त्रोत्रे, भूपाळ्या ह्या रामदासांच्या रचना महाराष्ट्रात बहुतेक भाविकांना परिचित आहेत. सुखकर्ता दु:खहर्ता ही गणपतीची आरती, लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ही शंकराची आरती किंवा ‘भीमरूपी महारुद्रा’ यासारखे मारूतीचे स्त्रोत्र या रचना लोकप्रिय आहेत.

munotes.in

**राजकीय प्रकरणे –**

रामदासांच्या मनाला समाजहिताची जी तळमळ लागली होती, त्या तळमळीतून काही लहान-लहान रचना केल्या आहेत. शिवाजीराजे आणि संभाजीराजे यांनी लिहिलेली दोन ओवीबध्द पत्रे यात आहेत. त्यात काही स्त्रोत्रे आहेत आणि आनंदवनभुवन हे ५९ ओव्यांचे अतिशय सुंदर असे काव्यही आहे. याशिवाय क्षात्रधर्म, सेवकधर्म, राजधर्म अशा स्वरूपाची पत्रे आहेत.

'अस्मानी सुलतानी' व परचक्र निरुपण अशी दोन प्रकरणे एवढे हे साहित्य आहे.

राजा किंवा लोकनेता कसा असावा असे फार मार्मिक विवेचन रामदासांनी शिवाजी महाराजांना पाठविलेल्या एका पत्रात केले आहे. त्याशिवाय शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीराजांना त्यांनी पाठविलेले पत्रही उत्तम राजाचे गुण कोणते, याचे वर्णन करणारे आहे.

आदर्श राजा कसा असावा, आदर्श राज्य कसे असावे, आदर्श समाज कसा असावा हे सुंदर शब्दचित्र आहे.

'आनंदवनभुवन' हे त्यांचे छोटेखानी काव्य म्हणजे आदर्श राजाचे स्वप्नच आहे. जगातील अमंगलाचा नाश होऊन सज्जनांचा विजय व्हावा या प्रेरणेने कार्य करणाऱ्या एका साधुपुरुषाचे आदर्श महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी धडपड केली. त्यांच्या डोळ्यापुढे उद्याच्या सुखी समाजाचे जे चित्र होते ते कसे होते.

आरोग्य जाहली काया। वैभवे सांडिली सीमा।

सार सर्वस्व देवाचे। आनंदवनभुवनी॥

माणसे आरोग्यसंपन्न, जीवनसमृध्द आणि देवाविषयी मनात भक्ती, यामुळे आनंदमय झालेले जग यांनी कल्पनेने पाहिले आणि वर्णन केले.

हे सर्वच वर्णन अतिशय आवेगपूर्ण, ओघवत्या भाषतले व उत्साहाने भरलेले आहे.

या साहित्याचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ५९ ओव्यांचे हे काव्य म्हणजे दुष्टांचे निर्दीलन व सज्जनांचे परिमाण करून धर्मस्थापना करू इच्छिणाऱ्या अवतारी पुरुषाच्या कल्पनेने आणि दर्शनाने हर्षभरीत झालेल्या रामदासांच्या संवेदनशील अंतकरणातून उमटलेले दिव्य सूक्त आहे. या काव्याच्या प्रेरणा कोणत्याही असल्या तरी समर्थाच्या जीवनकार्यातील धर्मस्वरूपी राजकारण आणि ऐहिक जीवनाचा सर्वांगीण उत्कर्ष आहे.

'आनंदवनभुवन' मधील शब्दयोजना, भावनांचा आवेश, विचारांचे अर्थ सौदर्य यांचा आस्वाद घ्यायचा तर ते काव्य मूळातूनच वाचले पाहिजे. तसेच विचाराबरोबर गेयता कळेल. म्लेच्छांची जुलमी सत्ता हे आमच्या देशावर व संस्कृतीवर मोठे संकट होते, मोठे विघ्न होते, या विघ्नांचा नाश करूम आमच्या संस्कृतीचा मोकळा श्वास घेता यावा यासाठीच कठोर परिक्षम घेणे आवश्यक होते. यासाठी म्लेच्छरूपी संकटाचा नाश करून 'निर्मळ जाहली पृथ्वी' असे पाहावे हे स्वामीचे ध्येय होते.

स्मरले लिहिलि आहे ।

बोलता चालता हरि ।

काय होईल ते पाहावे ।

आनंदवनभुवनी ॥

समर्थ म्हणतात, "पुढे घडणाऱ्या गोष्टी जशा आठवणीतील तशा लिहून काढल्या. यातील प्रत्येक चरण हा विचार करण्यासारखा आहे.

संसार वोढिता दु:खे।

ज्याचे त्यासीच ठाऊके ।

न सोसे दु:ख ते होते।

दु:ख शोक परोपर ॥

समर्थकालीन मुसलमानी राजवटीत हिंदुप्रजिची अवस्था अत्यंत वाईट झाली होती. प्रजेला कोणीही त्राता उरला नव्हता. जे दु:ख वाट्याला आले ते त्यालाच सहन करावे लागत होते. ते दुसऱ्याला सांगून उपयोग नव्हता. त्यावेळी सामान्य माणूस म्हणत होता की, हे देवा, पुष्कळ दु:ख सोसले. पुरे झाला आता हा संसार देह त्यागासाठी आता आनंदवनभुवनी यायचे आहे.

संकळ देवांचिये साक्षी । गुप्त उदंड भुवनि ।

सोख्यासी पावणे जाणे । आनंदवन भुवनी ॥

त्रैलोक्य चालिले तेथे । देव गंधर्व मानवी ।

ऋषिमुनी महायोगी । आनंदवन भुवनी ।

गंगेच्या प्रवाहात अनेक गुप्त भुवने आहेत. देवांची ही साप्तिदप भुवने पाहून खूप आनंद होतो. तेथे त्रिभूवनातील देव, गंधर्व, मानव, ऋषिमुनी असे महायोगी पुरुष ब्रह्मांडाचा आनंद घेत आहेत.

महा रम्य सरोवरे वाहताती ।

जगन्नायक राम सर्व मुनींसह स्वयंवरासाठी आनंदाने जेव्हा मिथिलेला आहे तेव्हा मिथिला कशी शोभत होती याचे वर्णन केले आहे.

उठावे रघुनायका आदिमूर्ती ।

करी कार्मुकी सज्ज हे गुणकीर्ती ॥

जनक रामाला सच्चिदानंद म्हणतो, सीतेला मूळ माया म्हणतो, यातून लौकिक नात्यांच्या पलीकडे जाऊन राम आणि सीता ही वस्तुत: कोण आहे हे जनकाला जाणवल्याचे दिसते. त्याच्या पुण्यश्लोक स्वभावावर यातून प्रकाश पडतो.

सीतस्वयंवर –

munotes.in

राम गुणाचा सागर । राम सुखाचा सुरतरू ।

राम भक्ताचे महिप । राम विसावा जनाचा ।

राम पुजावा विळासी । राम घ्यावा अहिर्णेसी ।

रामवेगळे मनासी । काही नावडे ॥

राम हा गुणांचा सागर आहे. तो सुखाचा कल्पतरू आहे. राम हा भक्तीचे माहेर आहे. अनेकांच्या मनातील विसावा आहे. राम हाच माझे सर्वस्वी आहे व रामा शिवाय मला काहीच आवडत नाही. जानकीचा मंगलोत्साह श्रोत्यांनी तत्परतेने ऐकावा व आपणही तो गावा म्हणून सीता स्वयंवराचे आख्यान सांगण्यास वेणाबाई प्रवृत्त झाली आहे. मरीच सुबादू यांचा वध, अहिल्योध्दार, धनुर्भग, वरपक्षाचे मिथिलेकडे प्रयाण, लग्नविधिचे वर्णन, नियोजित वराचे पूजन, हळदीचा कार्यक्रम, तेल लावणे, सुखवत, विवाह या प्रकारच्या वर्णनांतून वेणाबाईचे वर्णन कौशल्य दिसते.

## २.८ संत वेणाबाई:

समर्थ संप्रदायातील एक अधिकारी स्त्री व मठाधिपती म्हणून वेणाबाई प्रख्यात आहे.

वेणाबाईकृत रामायाण –

रामायण हे महाकाव्य भारतीय साहित्याचेच नव्हे तर संस्कृतीचेही भूषण आहे. एकूण ओवीसंख्या १५३६ उपलब्ध आहेत. सुंदरकांड हे शेवटचे असून साहजिकच वेणाबाईच्या मनातील आवडीने तिचा हेतु संपूर्ण झाला. यातून भावभक्तिचे दर्शन घडते.

धुर्नबाणधारी च लीलावत्तारी ।

सवे शेष लावण्य कामावतारी ।

करी खड्ग । तूणीर पृष्ठवरी हो ।

ऋषीच्या सवे चालिला श्री हरी हो ।

यज्ञरक्षणासाठी राम विश्वामित्राबरोबर वनात जायला निघाला तेव्हा हा राम धर्नुधारी होती. त्याच्या हाती खड्ग हे शाक्त होते. अतिशय देखणे लावण्य असलेला श्रीराम ऋषींच्या समवेत चालला होता.

काही सुभाचितांचीही रचना आहे.

सख्याची मनी नित्य आखंड भेटी ।

परी डोळ्यां पाहिजे दृष्टिभेटी

दीर्घकाळानंतर मारूतीची आणि रामाची  भेट झाली तेव्हा रामाने त्याला आलिंगन दिले.

कशी मिथिला शोभते हेमवर्णी ।

प्रभा कांकत्ती सर्व ही रत्नकीणी ।

वने पावने उपवने शोभताती ।

उत्तरायणाची वाट बघत भीष्म थांबलेला आहे. ज्याने निरंतर देवाचे स्तवन केले त्या कृपासागर देवाने भीष्म या भसराजला आपले रुप दाखविले.

## २.९ संत वेणाबाईच्या साहित्याचा परिचय:

वेणाबाईकृत आरत्या –

रामाची आरती – या आरतीत रामाचे अवतारकार्य सांगितले आहे. नलिनी दलनेमा, दुराति इ. संस्कृत शब्द त्यात आहेत. ही आरती नादमय व स्वर आहे.

**शेजारती श्रीरामाची –**

निद्रा करण्यासाठी 'राघव चला हो निज मंदिरात' अशी रामाची आळवणी केली आहे. रामाची स्तुती करताना ब्रह्मांडनायक, रघुकुळ टिळक अशी संबोधने वापरली आहेत.

उठियेले जगज्जीवन । सिलंसनाइन ।

वेणाबाई लिबलोण । उतरीतसे ।।

यातून व्यक्त होतो.

आत्मरंगाने रंगलेली तरल, पारमार्थिक अनुभूती ग्रंथित करणारी रामलीला, रामनाम, रामभजन यात रंगलेली, मनाला भिडणारा पारमार्थिक उपदेश करणारी, कधी वैचारिक तर भावनिक दाखविणारी पदरचना आहे. कधी ती भारदस्त, संस्कृत प्रचूर असते तर ती बोलीसदृश्य असते. वेणाबाईची पदरचनाही तिचे वाङ:मयीन मूल्य लक्षात घ्यावयास हवा.

**वस्तुवर्णन –**

महालाचे वर्णन, दशरथसभेचा थाट, बोहले, लग्नमंडप एकूण एक गोष्टी, देवाचे लग्न असल्यामुळे दैवी प्रभेने नटतात. कथनकाव्यात हा चमत्कार आध्यात्मिकता घडवून आणते. पात्रांच्या कृती, उक्ती यांना पोषक पार्श्वभूमी वस्तुवर्णनामुळे मिळते.

**दृष्टान्त :-**

चुकत्या धना पावे धनिक । किं गतराज्या पावे नायक ।

एखाद्या धनिकाचे हरवलेले धन परत मिळाले व एका राजाचे गेलेले राज्य परत मिळावे त्यावेळी त्यांची अवस्था कशी होईल तसा रामाला बघून दशरथाला आनंद झाला. कौसल्येसह सगळ्या माताही आनंदित झाल्या. त्यांनी रामाला आलिंगन दिले. दशरथाच्या आनंदाची अत्युत्कटता विशद करण्यास हे दृष्टान्त समर्थ आहेत.

**श्रीकृष्ण स्तुती :-**

श्रीकृष्ण स्तुती हिच्यात २८ ओव्या आहेत.

भीष्म शरपंजरी पडलेल्या अवस्थेत भाकीयुक्त अंत:करणाने कृष्णस्तुती करत आहे. वेणाबाई भीष्माच्या भावनेशी एकरूप झाली आहे.

शरांचे पिसोरे तनु गुप्त जाली ।

मयोरापरी सर्व काया बुडाली ।

विधी उत्तरायेण लक्षीत संधी ।

विवेकानिधी प्राण जावो न नेदी ।

ही कृष्णस्तुती भक्तिभावाने परिपूर्ण आहे. त्यात भीष्माला झालेला पश्चाताप आहे. भीष्माची उत्कट भक्ती आहे. लोकजागृतीच्या तळमळीच्या या पार्श्वभूमीवर समर्थाच्या ग्रंथकर्तृत्वाकडे पाहिले पाहिजे.

समर्थाच्या जन्मानंतर वीसबावीस वर्षातच महाराष्ट्रात एका फार मोठ्या राजकारणी पुरुषाचा जन्म झाला. समर्थाच्या डोळ्यांपुढे शिवरायांचे कार्य होते. संप्रदाय उभारणीच्या कार्यास समर्थांनी ज्या काळात सुरूवात केली त्याच काळात शिवाजी राजांच्या स्वराज्य स्थापनेच्या चळवळीस प्रारंभ झाला होता. शिवाजीराजांनी शहाजी राजांकडे बसून हिंदू राज्य पद्धतीचे निरीक्षण केले. शिवरायांच्या चळवळीचे रूप समर्थांना संतुष्ट करीत होते. समर्थांची प्रेरणा शिवाजीराजांना उपकारक होत असावी. दोघेही स्वतंत्र बुध्दीचे होते. ते कर्तुत्ववान पुरुष होते. व दोघांत आपुलकीची भावना होती.

निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।

अखंड स्थितीचा निर्धारु । 'श्रीमंत योगी'

पाहून समर्थाना खचित आनंद झाला असावा. पारतंत्र्यांची दु:खे समर्थांना पाहिली होती.

तेव्हा –

यशवंत, किर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।

पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा

हे पाहून समर्थाच्या मनास समाधान वाटले असावे

मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।

ही गर्जना होती.

म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचे माजले बंड

सोबत पाहून समर्थांना कृतकृत्यता वाटली.

'याचसाठी तुझा तू वाढवी राजा' म्हणून समर्थ तुळजा भवानीला प्रार्थना करीत. आणि शिवरायांच्या अलौकिक कार्याला यश येत आहे हे पाहून त्यांना संतोष वाटे.

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो जाला,

बुडाला औरंग्या पापी । म्लेच्छसंहार जाहला । मोहिली मांडिली क्षेत्रे'

अशा उद्‌गारांतून समर्थांना झालेला आनंद स्पष्ट होतो.

म्हणूनच – समर्थ

शिवरायांचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।

असा उपदेश करून 'महाराष्ट्र राज्य करावे।

जिकडे तिकडे असा उपदेश करतात –

त्याकाळात समाजाची वर्तमान स्थिती बदलावी अशी वाटते. त्या बदलासाठी लोकसंघटन आवश्यक होते. लोकसंघटन करणारे नेतृत्व तयार व्हावे अशी गरज त्यांना जाणवली होती. रामदासांनी लोकजीवनाचा दर्जा उंचावण्याचे प्रयत्न केले. तुकारामांनी सामाजिक स्थिती बदलण्याचे प्रयत्न केले. लोकांना संघटित करण्याचे प्रयत्न केले आणि समाजाला चांगले नेतृत्व लाभावे असे प्रयत्न केले. शिवाजीराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य स्थापनेसाठी शर्थीने प्रयत्न चालविले होते. धर्माधिष्ठित समाजात देवाचे अधिष्ठान राज्याला मिळाले पाहिजे. हे त्यांनी ओळखले होते. मुसलमान राज्यकर्त्यांनी इथले धर्मजीवन आणि समाजजीवन उद्‌ध्वस्त केले होते. स्वराज हे ईश्वरी आशीर्वादाने नांदावे आणि तिथे सर्वांचे जीवन त्यावर आधारलेले असावे असा त्यांनी प्रयत्न केले. रामदासांनी समाजाची उन्नती अपेक्षित होती. सुखी जीवन व संपन्न समाज असावा. प्रत्येकाने आपआपला धर्म सुखाने सांभाळावा. देवावर निष्ठा असावी आणि भक्तीचे व्यवहार निर्भयपणे चालावा असे त्यांना मनोमन वाटत होते. मराठी माणसांना एकत्र करणे गरजेचे होते. त्यांच्यात प्रेम आणि अभिमान निर्माण करावे असे होते. समाजाचे दैन्य व दुबळेपण नाहीसे व्हावे असे वाटते.

मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।

असे समर्थांचे वचन आहे. मराठी माणसाने एकत्र येऊन महाराष्ट्राच्या उध्दारासाठी कार्य करावे. या काळात लोकांची अस्मिता जागृत झाली. हाच महाराष्ट्र धर्म होय.

## २.१० समारोप

शिवाजीराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य स्थापनेसाठी शर्थीने प्रयत्न चालविले होते. धर्माधिष्ठित समाजात देवाचे अधिष्ठान राज्याला मिळाले पाहिजे हे त्यांनी ओळखले होते. मुसलमान राज्यकर्त्यांनी येथील धर्मजीवन व समाजजीवन उध्वस्त केले होते. म्हणून स्वराज्य हे ईश्वरी आर्शीवादाने नांदावे. सर्वांचे जीवन न्यायावर आधारलेले असावे असे प्रयत्न त्यांनी केले. रामदासांनी समाजाची उन्नती अपेक्षित होती. सुखी जीवन व संपन्न समाज असावा आणि प्रत्येकाने आपला धर्म सुखाने सांभाळावा. देवावर निष्ठा असावी आणि भक्तीचा व्यवहार निर्भयपणे चालावा असे त्यांना वाटत होते. मराठी माणसे एकत्र करून मराठी संस्कृतीविषयी आणि प्रदेशाविषयी त्यांच्या मनात प्रेम निर्माण करावे, अभिमान निर्माण करावा असे दोघांनीही प्रयत्न केले. समाजाचे दैन्य आणि दुबळेपर नाहीसे व्हावे आणि त्यांनी स्वाभिमानी, समर्थ जीवन जगावे अशा प्रेरणेने कार्य केले.

munotes.in

मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।

असे समर्थाचे वचन आहे.

मराठी माणूस जो जो असेल तो तो एकत्र यावा आणि त्यांनी महाराष्ट्र प्रदेशाच्या अभिमानाने त्यांच्या उध्दारासाठी कार्य करावे असा या वचनांचा अर्थ आहे.

त्यांनी आपल्या कार्यातून महाराष्ट्रीय माणसाची अस्मिता जागी केली.

## २.११ संभाव्य प्रश्नावली

१) शिवकालीन सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा परिचय करून द्या.

२) संत तुकारामांच्या अभंगांची वैशिष्टये स्पष्ट करा.

३) तुकारामांची कविता बहुसंवादी ठरते – उदाहरणासहित स्पष्ट करा.

४) संत बहिणाबाईच्या अंभागाचे वेगळेपण स्पष्ट करा.

५) संत बहिणाबाई स्वयंसिध्दा आहे – हे काव्याआधारे स्पष्ट करा.

६) संत रामदासांच्या साहित्याचा परिचय करून द्या.

७) 'आनंदवनभूवनी' विषयी थोडक्यात माहिती द्या.

८) दासबोध व करुणाष्टके यांविषयी माहिती द्या.

९) संत वेणाबाई यांच्या साहित्याचा सविस्तर परिचय करून द्या.

१०) संत वेणाबाई यांच्या कवितेचे वाड़:मयीन मूल्य स्पष्ट करा.

## २.१२ संदर्भ ग्रंथ :-

१) मालशे सं.ग. मराठी वाड़:मयाचा इतिहास – खंड दूसरा मॅ.सा.प. प्रकाशन

२) ल. रा. पांगारकर – तुकारामचरित्र

३) डॉ. सौ. शैला गावंडे – १० संत कवियित्री

४) गं. बा. सरदार – रामदास दर्शन

५) अ. ना. देशपांडे – मराठी वाड़:मयाचा इतिहास भाग – सातवा

६) अ. ना. देशपांडे – मराठी ड़:मयाचा विवेचक इतिहास

❄❄❄❄❄❄❄

# ३

# संत तुकाराम, संत बहिणाबाई, संत रामदास व संत वेणाबाई

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय विवेचन
३.३ संत तुकारामांचा जीवन परिचय
३.४ तुकारामांचे अभंग
३.५ तुकारामांचे कार्य
३.६ संत बहिणाबाई
३.७ बहिणाबाईंचे निवडक अभंग
३.८ संत रामदास
३.९ मनाचे श्लोक व आनंदवनभुवन
३.१० संत वेणाबाई
३.११ वेणाबाईंचे निवडक अभंग
३.१२ सरावासाठी स्वाध्याय
३.१३ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दीष्टे

- संत बहिणाबाई अभंगांचा परिचय करून घेता येईल.
- शिवकालीन संत म्हणून संत रामदासांचा जीवन परिचय करून घेता येईल.
- वेणाबाईंच्या अभंगांचा परिचय होईल.
- शिवकाळातील वारकरी व समर्थ संप्रदायांच्या कवींच्या काव्याचा परिचय करून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

**<u>संत तुकाराम</u> –**

तुकाराम हे एकनाथांच्या नंतरचे भागवत संप्रदायातले श्रेष्ठ असे संत कवी सतराव्या शतकात रामदासांच्या आणि शिवाजीराजांच्या काळातच होऊन गेले. त्यांचा जन्म आणि मृत्यू यांच्या निश्चित वर्षाबद्दल अभ्यासकांमध्ये मतभेद असले तरी सर्व साधारणपणे इ.स. १६०६ ते १६४९ असा त्यांचा जीवन काळ मानला जातो.



munotes.in

महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी आहे. या भूमीत ३५० वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज होऊन गेले, त्याच काळात संत तुकारामही झाले. एकाच काळात होऊन गेलेल्या या दोन महापुरुषांची आरती आजही समाज गात आहे. संत तुकाराम तत्कालीन समाजाची सांस्कृतिक आणि सामाजिक नांगरणी करीत होते तर शिवाजी महाराज राजकीय जागृती करीत स्वराज्य स्थापित होते. तुकाराम आपल्या कीर्तनातून स्वरचित अभंग गात. त्यांच्या वाणीत संसाराचा आणि जीवनाचा अनुभव ठासून भरलेला असे. तुकारामांचे आयुष्य संकटे आणि संघर्षाने भरलेले होते. संसार, आजूबाजूचे जग, ईश्वर आणि स्वतःचे मन याच्याशी शेवटपर्यंत ते झगडताना दिसतात, तर छत्रपती शिवाजी महाराजांची तलवार रयतेच्या कल्याणासाठी व यवनांविरोधात अहोरात्र तळपत होती. तुकारामांच्या भाषेत या दोघांच्याही आयुष्याचे वर्णन करायचे झाल्यास "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग| अंतर्बाह्य जग आणि मन||" असे करावे लागेल.

## ३.२ विषय विवेचन

तुकाराम महाराजांच्या वाटचालीचा विचार करताना तत्कालीन महाराष्ट्राचा आणि वारकरी संप्रदायाच्या विकासाचा विचार महत्त्वाचा आहे. संत ज्ञानेश्वरांपासून विस्तारत राहणारा वैष्णव संप्रदाय तुकारामांच्या काळापर्यंत महाराष्ट्रात चांगला रूजला होता. तो महाराष्ट्रात सर्वदूर पसरला होता. या विस्ताराचे वर्णन तुकाराम शिष्या बहिणाबाई यांनी केले आहेच. तिच्या वर्णनाप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा म्हणजेच भागवत धर्मरूपी मंदिराचा पाया घातला आणि संत तुकाराम हे या मंदिराचे कळस झाले. तुकारामांनी आपल्या साध्या भाषेत विठ्ठल भक्तीचा सर्वोच्च अविष्कार केला. त्यांनी विठ्ठल भक्तीत आपले आत्मानुभव ओतप्रोत भरले. अतिशय रसाळ आणि जिव्हाळ्याच्या भाषेत त्यांनी आपले काव्य रचले. त्यांच्या रचनेचे स्वरूप पाहता त्यांच्या इतका थोर तत्त्वज्ञ कवी आणि महान संत झालेला दिसत नाही. आज साडेतीनशे वर्षानंतर सुद्धा भजनाच्या शेवटी तुकाराम, तुकाराम, तुकाराम असे तुकोबांचे नामस्मरण केले जाते. त्यांच्या नामस्मरणात खेरीज भजनाची सांगता होत नाही.[i]

munotes.in

ज्ञानेश्वर महाराजांनी उभारलेल्या भागवत धर्माच्या मंदिरावर कळस घडविण्याची कामगिरी शिवकाळात देहूच्या तुकाराम महाराजांनी पार पाडली. ज्ञानेश्वरांनी स्त्री, शुद्ध अधिकाऱ्याच्या अध्यात्मिक उन्नतीचे जे ध्येय आपल्यापुढे ठेविले होते ते तुकारामांच्या रूपाने जणू काही प्रत्यक्षात अवतरले. "वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा" असे म्हणण्याचा अधिकार प्राप्त करून घेऊन तत्कालीन शूद्र म्हणविल्या जाणाऱ्या संताने आत्मोन्नतीचा खरोखर कळस गाठला हाच तुकारामांच्या चरित्राचा सामाजिक अर्थ होय.[ii]

## ३.३ संत तुकारामांचा जीवन परिचय

**तुकारामांचे जीवन चरित्र:**

तुकारामांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले. वाडवडील देहूचे महाजन. या सधन घराण्यात पूर्वापार विठ्ठलभक्ती चालत आलेली. ते जातीने कुणबी होते. मात्र त्यांच्या घरी महाजनकी म्हणजे सावकारी होती. वाण्याचा धंदा परंपरेने चालत आलेला होता. तुकारामांचा रखुमाबाई व जिजाबाई उर्फ आवली यांच्यासोबत विवाह झाला होता. तुकाराम

सतरा वर्षाचे असतानाच त्यांचे आईबाप वारले. भयंकर दुष्काळ पडला. पहिली पत्नी अन्नावाचून मेली तिचा पुत्र संताजीही मरण पावला. दुकानदारी मध्ये दिवाळे निघाले. संसाराची वाताहात तुकोबांनी उघड्या डोळ्यांनी पाहिली. या उद्विग्नतेतूनच जीवनाला सामोरे जाण्यासाठी लागणारा मनाचा नि:संगपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात उतरला. उद्विग्न तुकाराम गावाबाहेरील भंडारा डोंगराचा आश्रय घेऊ लागले. त्याने लोकांत सोडला आणि एकांत शोधला. ते हळूहळू ईश्वर चिंतनात रमले. गुरू केशव चैतन्यांकडून त्यांना 'राम कृष्ण हरी' हा मंत्र मिळाला. नामदेवांच्या दृष्टांताने कवित्वाची स्फूर्ती होऊन तुकोबा आविष्कारात्मपर अभंग रचना करू लागले. अंतर्मुख दृष्टीने जीवनाचा शोध घेऊ लागले. त्यांच्या ठिकाणी अद्वैतबोधाचा उदय झाला आणि 'आम्हा हे कौतुक जगा द्यावी नीत|' किंवा 'धर्माचे पालन | करणे पाखंड खंडन||' या प्रकारची त्यांची ध्येयनिश्चिती होत गेली. साधक आवस्थेत लोकांनी त्यांची हेटाळणी उपहास करायला सुरुवात केली. परंतु अध्यात्मिक दृष्ट्या आत्मिक समाधान लाभताच 'आता उरलो उपकारापुरता' अशा सिद्ध भावनेने त्यांची अभंग वाणी लोकांना उपदेश करू लागली. तुकारामांचे वैकुंठ गमन इ. सन १६४९ साली झाले.

तुकारामांचे लिहून घेतलेले अभंग म्हणजे 'तुकाराम गाथा' होय. जी गायली जाते ती गाथा. तुकारामांचे अभंग हे प्रसंगानुरूप योग्य मार्ग दाखवणारी काव्यरचना आहे. लोकांना नीती आणि अनीती, धर्म-अधर्म कर्तव्य-अकर्तव्य, उचित-अनुचित, न्याय-अन्याय, विधी-निषेध इत्यादी विचार पटवून देण्यात त्यांच्या वाणीला दुसरी जोड नाही. तुकाराम बाबतीत लोकव्यवहारात 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' असे बोलण्याचा रिवाज होऊन बसला आहे.

## ३.४ तुकारामांचे अभंग

निवडक दहा अभंग :

**अभंग १:**

राजस सुकुमार मदनाचा पुतळा |
रविशशिकळा लोपलिया ||१||

कस्तुरीमळवट चंदनाची उटी |
रुळे माल कंठी वैजयंती ||२||

मुगुट कुंडले श्रीमुख शोभले |
सुखाचे ओतले सकळ ही ||३||

कासे सोनसळा पांघरे पोटोळा |
घननीळ सावळा बाईयानो ||४||

सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा |
तुका म्हणे जीवा धीर नाही ||५|| (मंगलाचरण/०४)

munotes.in

**<u>शाब्दिक अर्थ</u>:** राजस, सुकुमार असा हा विठ्ठल म्हणजे जणू मदनाचा पुतळा आहे. सूर्य-चंद्राच्या प्रभा त्याच्या तेजात लपल्या आहेत. त्याच्या कपाळी कस्तुरीचा मळवट भरला असून, अंगावर चंदनाची ऊटी लावलेली आहे. गळ्यात वैजयंतीमाळा रूळत आहेत. मस्तकावर मुकुट व कानात कुंडले असलेले सुंदर रूप म्हणजे जणू सर्व सुखाचे आगर आहे. त्याने कमरेला जरीकाठी पितांबर नेसले आहे आणि भरजरी शेला पांघरला आहे. बायानो, असा हा विठुराया सावळ्या रंगाचा आहे. तुम्हीही सर्वांनी हे रूप मनात जपून ठेवावे. तुकाराम म्हणतात, आता जीवाला धीर धरवत नाही. श्रीमुख पहिल्याखेरीज माझ्या मनाला समाधान लागत नाही.

सर्व संतांना आणि भक्तांना वेड लावणारा पांडुरंग अत्यंत देखणा आहे. तुकारामांनी या सुंदर विठ्ठलावर लिहिलेले अभंग वारकऱ्यांना पवित्र आणि सुखाचा अक्षय ठेवा झाले आहेत. 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी | कर कटावरी ठेवूनीया|| तुळशीहार गळा कासे पितांबर | आवडे निरंतर तेची रूप||' असं वर्णन केल्या नंतर तुकारामांनी विठ्ठलाला मदनाचा पुतळा म्हटलेले आहे. हा विठ्ठल तेजाने शोभणारा सुकुमार असून, त्याच्या तेजापुढे सूर्याचे आणि चंद्राचे तेज सुद्धा लोपून जाते. विठ्ठलाच्या कपाळावर कस्तुरीचा मळवट आहे. अंगकांती मेघाप्रमाणे सावळ्या रंगाची आहे. विठ्ठलाच्या डोक्यावर मुकुट कोटी-कोटी सूर्यांच्या लखलखाटापेक्षा अधिक तेजस्वी आहे. विठ्ठलाच्या दोन्ही बाजूला उद्धव आणि अक्रुरा सारखे श्रेष्ठ भक्त उभे असतात आणि त्याचे पवाडे नेहमी गातात. पांडुरंग हा अनन्यसाधारण आहे आणि तुकारामांचा तर तो प्रत्यक्ष सखाच आहे. विठ्ठलाचे वर्णन करताना तुकारामांनी त्याला अनंत नावाने साद घातली आहे अनंत, मधुसूदना, पद्मनाभा, नारायणा, जनार्दन, अविनाश, आदिदेव, सकाळदेव, महानुभव, केशव, सदाशिव, विश्वंभर, गरुडध्वज, करूणाकर, सहस्त्रपादा, कमलनयन, कमलापती, मदनमूर्ती, मोहन, वामन, वसुदेव नंदन, देवकीनंदन, जगजीवन, बाळकृष्ण, गोपिकारमण, असुरमर्दन, चैतन्यघन, गोविंद, मुकुंद, जगजेठी, वासुदेव, पंढरीनाथ, अच्युत, दीनानाथ, विश्वपती, विराटस्वरूप, विश्वबाहू, विश्वचक्षू, विश्वदेवता, परमपुरुष, ऋषिकेश अशा अनंत नावाने विठ्ठलाला आळवताना तुकाराम महाराज तल्लीन होतात.

**<u>*जाती हीनता नष्ट करण्याचा उपाय विठ्ठल भक्ती:</u>**

आपल्या आयुष्याच्या पूर्वार्धात जेव्हा तुकाराम केवळ साधक होते त्यावेळी आपल्या क्षुद्रत्त्वामुळे, हीन जातीमुळे त्यांना फार दुःख सहन करावे लागले. नीच वर्णाच्या लोकांना संकर होऊन ते एक झाले होते. यामुळे उच्चवर्णीयांनी व पुरोहित वर्गाने आपल्या उच्च गावाचे रक्षण करण्यासाठी श्रेष्ठ-कनिष्ठ त्याची बंधने कडक केली होती. आपल्याशिवाय इतर लोकांना नीच म्हणून ते समाजात त्यांचा अपमान करीत होते. जातीयतेला नष्ट करण्याचा एकच उपाय होता तो म्हणजे विठ्ठल भक्ती, कारण तिच्या क्षेत्रात जातीहीनता किंवा श्रेष्ठता मानली जात नव्हती. म्हणून असे दिसून येते की आपल्या सारख्या लोकांना त्यांनी भक्तिसंप्रदायात येण्याचा उपदेश केला. जन्मलेल्या जाती नष्ट होऊन त्यांना अन्य वर्णासमान श्रेष्ठत्व प्राप्त व्हावे यासाठी हा एकच मार्ग होता. त्यांच्या दृष्टीने तर केवळ ईश्वर नामस्मरण करणारा भक्तच सर्वात श्रेष्ठ आहे मग तो कोणत्याही जातीत जन्मलेला असो. हे सामाजिक कार्य नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ आदी सर्व भागवत संप्रदायाच्या संतांनी केले आहे.

**अभंग २:**

वाळो जन मज म्हणोत शिंदळी ।

परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥

सांडूनि लौकिक जालियें उदास ।

नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥

नाइकें वचन बोलतां या लोकां ।

**म्हणे जालों तुका हरिरता ॥३॥ (विराण्या/०७)**

**अर्थ:-** लोक माझा त्याग करोत अथवा मला शिंदळ म्हणोत, पण या वनमाळीला मी विसरणार नाही.||१|| लौकिक टाकून मी उदास झाले आहे मला भय नाही व जिवित्वाची आशा नाही ||२|| तुकाराम महाराज म्हणतात, लोक कितीही जरी बोलले तरी मी त्यांचे ऐकणार नाही मी हरीच्या ठिकाणी रत झाले आहे||३||[iii]

<u>**विवेचन**</u> **:** तुकोबांचा हा अभंग म्हणजे विराणी आहे. भक्तवर्य तुकोबांनी विरहीणीचे स्वरूप कल्पून वनमाळी नाम प्रियकराशी झालेली तद्रुपता व्यक्त केली आहे. आपल्या आवडत्या प्रियकरावर उघडपणे प्रेम करताना आसपासच्या जगताची लौकिकाची लाज बाळगावी लागते, पण तसे केले तर मनमुरादपणे प्रेमच करता येत नाही. यासाठी लौकिकाला दुर्लक्षावे लागते. इतकेच नव्हे तर लोकांची कुजबुज ऐकून न ऐकल्यासारखी करावी लागते. मनाचा ठाम निर्धार झाला की मग लोक वाळीत टाकोत, शिंदळ म्हणोत त्याबद्दलची भीती वाटत नाही. जिवित्वाची आशा वाटत नाही. रूढार्थाने व्यभिचार वाटावा असे हे प्रेम आहे. पण व्यभिचारी निष्ठेच्या प्रतिपादनार्थ व्यभिचाराचे हे रूपक वापरले आहे. वाळो हे काव्यात्म रूप, लौकिक सांडणे हा पदबंध, उदास आणि आस ही विरोधविन्यासात्मक यमकाची जोडी काव्यात्मकता निर्माण करतात. 'जालीये उदास, नाही भय आस जीवित्वाची' या चरणात ही लय तोलण्याचे कामही यमकामुळे झाले आहे.[iv]

**अभंग ३:**

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद-भ्रम अमंगळ॥

आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा॥

कोणाही जीवाचा न घडावा मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचे॥

तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुखदु:ख जीव भोग पावे॥ (अभंग ४६)

**अर्थ :** तुकोबांनी या अभंगात वैष्णव धर्मच स्पष्ट करून सांगितला आहे. सबंध जग हे विष्णुमय आहे अशी जाणीव ठेवून राहणे हा वैष्णवांचा धर्म. भेदाभेद मांडणे, विभिन्न मतमतांतरे यात अडकणे हे अमंगळ आणि भ्रममूलक आहे. भागवत भक्तांना ते कळवळ्याने सांगतात की आपण जे काही हितकर करायची इच्छा आहे ते खरोखरीचे हितकर करा. नंतरच्या चरणात तर आचारसंहिता सांगितली आहे. आपल्याकडून कोणाही जीवाचा मत्सर

घडू नये. कारण सर्व जग सर्वेश्वराने भरलेले आहे. या सर्वेश्वराचे पूजन हेच या धर्माचे वर्म होय. शेवटच्या अभंगाच्या वर्णनात तुकाराम महाराज म्हणतात की ज्ञानेंद्रिये ही एकाच देहाचे अवयव असून त्यांनी सेवनाने केलेल्या विषयांचे सुख-दुःख भोगणारा एकच जीव आहे. भेदाभेद, द्वेष, मत्सर ही मानवजातीची सनातन दुखणी एका वैष्णव धर्मात लयाला गेलेली आहेत असे तुकाराम सांगतात. माणूसपणाचा अवकाश विस्तीर्ण होत सर्वेश्वरापर्यंत पोचतो यासाठी भागवत भक्तांनी प्रस्तुत अभंगात वर्णिलेली आचारसंहिता पाळायला हवी.

**अभंग ४ :**

माया तें चि ब्रह्म ब्रह्म तेची माया |अंग आणि छाया तया परी ||

तोडितां न तुटे सारितां निराळी | लोटांगणांतळी हारपते ||१||

दुजे नाही तेथे बळ कोणासाठी | आणिक ते आटी विचाराची ||२||

तुका म्हणे उंच वाढते उंचपणे | ठेंगणी लवणे जैसी तैसीं ||३||

(६५)

<u>अर्थ व विवेचन</u> : माया हेच ब्रह्म आणि ब्रह्म हेच माया होय; ज्याप्रमाणे शरीर आणि त्याची छाया यांचे अद्वैत असते तसे. उत्तरार्धातल्या अर्ध्या चरणाने पूर्वार्ध स्पष्ट केला आहे. शरीराच्या अंगभूत असलेली छाया ही तोडता तुटत नाही, बाजूस सारता सारिली जात नाही. एखाद्याने तिच्यापासून सुटका करून घ्यायचे म्हटल्यावर जमिनीवर लोटांगण घातले तरीही ती त्या लोटांगणाच्या तळाशी नाहीशी होते. पहिल्या चरणाच्या उत्तरार्धाचे हे विस्तारण आहे. सावली ही स्वतंत्र, दुसरी अशी गोष्ट नसतानाही बळजबरीने तिच्या स्वतंत्र अस्तित्वाचा अगर तिच्या नाशाचा विचार करणे हा व्यर्थ खटाटोप होय. हे चरणही प्रथमचरण उत्तरार्धाचे विस्तारणच आहे. महाराज म्हणतात: आपण उंच वाढलो, तर छाया उंच वाढते आणि आपण जर लवलो तर तीही लवण्याबरहुकूम ठेंगणी होते. ब्रह्म आणि माया यांच्या संबंधाचा जो द्वैती विचार लोक करतात, त्याचा निरास तुकोबा अंग आणि छाया यांच्या चपखल दृष्टांताने करतात. तुकोबांच्या काव्यातील चरणांचा जो वाक्यविन्यासात्मक भाग असतो; म्हणजे तो अल्पाक्षर आणि लयबद्ध कसा असतो हे ध्यानात घ्यायला हवे. उदा. 'तोडितां न तुटे सारितां निराळी' व 'तुका म्हणे उंच वाढे उंचपणे | ठेंगणी लवणे जैसी तैसी' या चरणांचा विचार करावा.[v]

**अभंग ०५ :**

कानडीने केला मऱ्हाटी भ्रतार | एकाचे उत्तर एका न ये ||१||

तैसे मज नको करू कमळापति | देई या संगती सज्जनांची ||२||

तिनेँ पाचारिले इल बा म्हणोन | येरु पळे आण झाली आतां ||३||

तुका म्हणे येरा येरा जे विच्छिन्न | तेथेँ वाढे सीण सुखा पोटी||४||

**अर्थ**: एका कानडीने स्त्रीने मराठा नवरा केला. त्यामुळे काय घोटाळा झाला ते तुकोबाराय सांगतात,"तिने कानडीत बोलावे आणी त्याने भलतेच समजावे आणि नवरा मराठीत बोलला तर तिने भलताच अर्थ घ्यावा. असे म्हणून ते देवाला विनवतात, हे देवा तुम्ही माझी अशी अवस्था करू नका. मला संतांची संगत द्या. म्हणजेच एकमेकांचे बोलणे आम्हाला कळेल. एका वेळेला त्या कानडी बायकोने 'इल बा' असे म्हणून त्याला बोलावले त्याला वाटले ती आपल्याला बाबा म्हणते आणि शपथ घालते. म्हणून तो तिच्यापासून दूर पळू लागला. अशा विसंगत लोकांच्या एकत्र येण्याने सुखाऐवजी शीणच वाढतो. म्हणून ते देवाला म्हणतात, मला भलत्या संगतीत टाकू नको.

**अभंग ०६ :**

सुख पाहता जवापाडे | दुःख पर्वता एवढे ||१||

धरी धरी आठवण | मानी संतांचे वचन ||२||

नेले रात्रीनें अर्धे | बाळपण जराव्याधें ||३||

तुका म्हणे पुढा |घाणा जुंती जसी मूढा ||४|| (८८)

**अर्थ :** जगतगुरू श्री तुकाराम महाराज अभंगात व्यक्त होताना म्हणतात की संसारामध्ये सुख जवाएवढे कमी असते, किंचित असते आणि दुःख पर्वता एवढे असते. तू संतांचे वचन मान. त्यांची नेहमी आठवण ठेव. अरे या इहलोकात मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा शंभर वर्षे आहे. त्यापैकी अर्धी वर्षे झोपेत जातात. रात्रीची वेळ वजा केले म्हणजे पन्नास वर्षे राहीली. त्यातील बारा वर्षे बाळपणात जातात. काही व्याधीत जातात आणि उरलेली वार्धक्यात जातात. अरे मुर्खा, अशा रितीने हा देह व्यर्थ जाऊन पुन्हा जन्ममृत्युरूपी घाण्याला तू जुंपला जाशील.

**विवेचन :** माणसाच्या आयुष्याच्या परिघात माणसाला जागे करण्यासाठी तुकोबा सदुपदेश करतात. माणूस सुखाचीच अभिलाषा ठेवणार. पण संसारामध्ये सुख जवाएवढे किंचितसे आहे आणि दुःख मात्र पर्वतप्राय मोठे आहे. यास्तव तू संतांचे वचन मान आणि त्याची आठवण म्हणजे धर. काय आहे की, माणसाच्या एकूण आयुष्यातले अर्धे रात्रीत जाते. उर्वरित अर्ध्या आयुष्यातील काही बालपणात, काही आजारपणात तर काही म्हातारपणात जाते. मग आयुष्य उरते कोठे? तुकाराम महाराज म्हणतात की; अरे मूर्खा, अशा पद्धतीने आयुष्य गेल्यावर मग पुन्हा जन्ममृत्यू रूपी घाण्याला जुंपला जाशील. या अभंगात मानवी आयुष्याचा संदर्भ कशामुळे कळतो? तर बालपण जराव्याधी यांमुळे! दिवसाच्या प्रमाणात रात्र असते म्हणून प्रत्येकाचे जवळपास अर्धे आयुष्य रात्रीच जात असते. 'तुका म्हणे पुढा |घाणा जुंतीजसी मूढा ||' यात घाण्याला जुंपला जातील असे म्हटले आहे तर हा घाणा कोणता? आयुष्याच्या संदर्भात जन्म-मृत्यूचा. वाचकाला या अनिर्देशित गोष्टी संदर्भ जागवून भरून काढाव्या लागतात हे वाचक प्रतिसाद सिद्धांतातले प्रमुख प्रमेय आहे. 'सुख पाहता जवापाडे | दुःख पर्वता एवढे ||' हा चरण तर उद्बोधक सुभाषित म्हणून मराठीत सर्वतोमुखी असतो.[vi]

**अभंग ०७ :**

तीळ जाळिले तांदुळ। काम क्रोधे तैसेचि खळ ॥१॥

कां रे सिणलासी वाउगा। न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

मानदंभासाठीं। केली अक्षरांची आटी ॥२॥

तप करूनि तीर्थाटन। वाढविला अभिमान ॥३॥

वांटिलें तें धन। केली अहंता जतन ॥४॥

तुका म्हणे चुकलें वर्म। केला अवघाचि अधर्म ॥५॥ (९०)

**अर्थ :-** हे साधका, समाजात कर्मकांडाला महत्त्व देणारे तीळ, तांदूळ यज्ञ करून तू होमामधे जाळतोस, पण स्वत:च्या स्वभावातील काम-क्रोधादी शत्रू मात्र तू तसेच ठेवतोस. यज्ञयागादि कर्मकांडमध्ये व्यर्थ का शिणून जातोस, त्यापेक्षा पांडुरंगाची सेवा का करात नाहीस? समाजात मानसन्मान मिळविण्यासाठी व उदरनिर्वाहासाठी ग्रंथपठण, विद्याध्ययन करण्याचे कृत्य तू करतोस. तीर्थाटन करून स्वत:विषयी अभिमान वाढविलास. दानधर्म करून आपल्या दातृत्वाचे प्रदर्शन करून, अहंकार बाळगलास. तुकोबा म्हणतात, की हे कर्मकांड म्हणजे अधर्माचे वर्म आहे.

**अभंग ८ :**

भोरप्याने सोंग पालटीले वरी। बक ध्यान धरी मत्स्या जैसे।। १।।

टीळे माळा मैद लावे अंगी। देखो ने दी जगी सांसे जैसे।। २।।

भीतर या मत्स्या चारा घाली जैसा। भीतरी सांसद कळो नेदी।।३।। खाकी को हा स्नेहवादे पशुपाळी। कारावास नळी तयासाठी।। ४।।

तुका म्हणे तैसा भला मी लोकांता। परिवार तू कृपावंत पांडूरंगा ।।५।।(९४)

**विवेचन :** वरील अभंगात महाराज काही फसवणूकीची उदाहरणे देतात, की एक बगळा शांतपणे एका संताप्रमाणे झाडाच्या फांदीवर बसला आहे, परंतु त्याची नजर खाली असलेल्या पाण्यातील माशांवर आहे; एक मच्छीमार खायला द्यायचे अमिष दाखवून मासे पकडतो, मांस विक्रेता पशूंना खाऊ घालतो, नंतर त्यांना मारून टाकतो. तुकाराम महाराज म्हणतात, ते या भ्रामक लोकांसारखे नाहीत आणि म्हणून देव त्यांची काळजी घेईल.

धर्माच्या नावावर चालणाऱ्या भोंदूगिरी चे वस्त्रहरण करणारे अभंग तुकारामांनी लिहीले आहेत. तुकोबांच्या गाथेत जागोजाग त्यांच्या स्थळकाळाचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले आहे. इतके की, तुकोबांच्या गाथेतील तपशीलावरून आपण सतराव्या शतकातील मावळ भागातल्या जनजीवनाचे पूर्ण चित्र उभे करू शकतो. स्वतःचा काळ आणि स्वतःचा देश

यांचा विसर पडणारा धर्म तुकोबांनी अनुसरला नव्हता आणि तशी कविताही त्यांनी लिहिलेली नाही.

तुकोबांच्या अस्तित्वभानात सामाजिकता समाविष्ट होती आणि ती जागरूक होती याची जाणीव ठेवून गाथेचे पारायण केल्यास अनेक आश्चर्यकारक गोष्टी आपल्याला सापडू लागतात तुकोबांची गाथा हे निव्वळ काव्यात्म किंवा अध्यात्मिक आत्मचरित्रच नाही तर समाजाच्या संस्कृतीच्या भाषेच्या आणि दैनंदिन जीवनाच्या सर्व अंगावर प्रकाश टाकणारा एक असाधारण संदर्भग्रंथ आहे.[vii]

**अभंग ०९ :**

देती घेती परज गेली | घर खालीं करोनियां ||१||

अवघियांचें अवघें नेलें | कांहीं ठेविलें नाहीं मागें ||धृ.||

सोंगे संपादुनि दाविला भाव | गेला आधीं माव वरी होता ||३||

आतां तुका म्हणे न लागेचि हातीं | झाली तें निश्चिंती बोलों नये ||४|| (जोहार/१२९)

अर्थ : महाराज अभंगात व्यक्त होताना म्हणतात की जीवनात कोणी किती जरी कमावले, कोणी किती जरी मी उच्च जातीचा आहे म्हणून शेखी मिरवली तरी हे सगळ मृत्यूपर्यंत मर्यादित आहे, मग पुढे काय आहे? महाराज म्हणतात की जर एका विशिष्ट वेळेपर्यंतच मनुष्य देह जगणारा असेल तर आपण कशासाठी कमावून ठेवायचे. महाराज पुढे म्हणतात की एकमेकांना जात-पात वरून हिणवणारे तरी अशी काय दौलत कमवतात? एकमेकाला असला हिणवण्याचा अधमपणा आपण कधीही करू नये. असे करण्यानं सगळ्यांचे सगळे काही गेलेले आहे. आपण तरी किमान शहाणे व्हायला हवे. महाराज म्हणतात की उगी सोंग घेऊन काय उपयोग? आयुष्याच्या शेवटी निश्चिंतता हवी असेल तर नेहमी एकमेकांना जात-पात-धर्माच्या- पलीकडे जाऊन प्रेम करायला शिका.

**अभंग १० :**

आम्हां घरीं एक गाय दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥१॥

वान ते सांवळी नांव ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥ध्रु.॥

वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥२॥

चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥३॥

तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोकां ॥४॥

अर्थ :- आमच्या घरी एक गाय आहे व ती दूध देते. तिने पान्हा सोडला की त्या दुधाने त्रिभुवन भरून जाते; त्रिभुवनातहि ते मावत नाही. अशी ती गाय सावळ्या रंगाची असून तिचे नाव 'श्रीधरा' असे आहे. पृथ्वी सह चौदा भुवनांत ती चरत असते. तिला एकही वासरू नाही. ती कोणाबरोबरही जाते. भावपूर्वतेने जो कुणी तिला कुरवाळेल. त्याला ती पोटभर दूध देते चारही सडांतून धारा सोडून अमाप दूध देते. ते दूध पिउन ऋषि मुनि तृप्त

झाले आहेत. तुकाराम महाराज म्हणतात, अशी ही गाय त्रैलोक्यला तृप्त करू शकते. त्यापुढे माझी भूक ती कितीशी असणार?

## ३.५ तुकारामांचे कार्य

### शिवाजी आणि तुकाराम :पाईकांना उत्तेजन

श्री शिवाजी महाराज तुकारामांचे कीर्तन ऐकायला जात असत त्यावेळी शिवाजी केवळ १८-२० वर्षाचे तरुण होते. स्वातंत्र्य संपादनाचा प्रयत्न त्या वेळी सुरूच होता. अशा वेळी शिवजी महाराज केवळ विरक्तीचा उपदेश ऐकायला जात होते असे समजायला नको. तुकारामांच्या ओजस्वी वाणीच्या धाराप्रवाहातून स्फूर्ती घेण्यासाठी ते कीर्तन ऐकायला जात असत. त्यांच्याबरोबर त्यांचे  शरीरसंरक्षक राहणे असंभवनीय नव्हते. शिपायाला मराठीत पाईक असे म्हणतात त्या 'पाईकां'ना समोर ठेवून तुकारामांनी अनेक अभंग लिहिले आहेत. ते म्हणतात, "पाईक प्रजेचे पालन-संरक्षण करून दुष्ट शत्रूला समूळ नष्ट करतो." 'त्याशिवाय प्रजेचे दुःख नष्ट होऊ शकत नाही, म्हणून पाईकांनी आपल्या प्राणांचे बलिदान करण्यासाठी सदैव तयार राहिले पाहिजे त्यांची चिंता त्यांच्या स्वामीला असते. जेव्हा तीर आणि गोळ्यांचा वर्षाव होतो तेव्हा त्या छतावर झेलणे, युद्धात स्वामींच्या समोर राहून लढणे, हेच त्यांचे भूषण आहे. पाईकांना सर्व जागा, रस्ते, गुप्त मार्ग माहीत पाहिजे. स्वतःचे रक्षण करून शत्रूला युक्तीने पकडणे आणि त्याचे सर्वस्व हिरावून घेणे, स्वामीच्या जवळ शत्रूला येऊ न देणे, त्यांना स्वामीच्या मार्गाचा पत्ताही लागू न देणे अधिकाऱ्याचे चांगल्या प्रकारे करतात. त्यांनाच स्वामी तसेच लोक मान देतात. या आशयाचे बारा अभंग तुकाराम यांनी लिहिले आहेत. यावरून दिसून येते की शिवाजी बरोबर किंवा कधीकधी स्वतंत्रपणे कीर्तनास येणाऱ्या पायी त्यांना वारंवार उपदेश करून तुकाराम त्यांना शिवाजीच्या सेवेला प्रोत्साहित करत होते.[viii]

समारोप : तुकारामांच्या श्रोत्यांमध्ये त्यावेळचे अनेक शिपाई होते म्हणूनच तुकारामांनी युद्धाच्या अंगोपांगाच्या उपमा दृष्टांतांसाठी समुचित उपयोग केला आहे. अशा लोकांसमोर पाईकाचा आदर्श ठेवून त्यांनाही स्वामींच्या म्हणजे शिवाजीच्या कार्यात मदत करण्याचा उद्देश ते देत असत. असे म्हणतात की शिवाजी एक दिवस तुकारामांच्या किर्तनाला आले होते तेव्हा वेळ साधून मोगल शत्रूंनी त्यांना घेरले. आता सुटका कशी होणार तर दंतकथा आहे की त्यावेळी तुकारामाने उत्कट विठ्ठल भक्तीने विठ्ठलाची प्रार्थना केली मुसलमान शिपाई जेव्हा शिवाजीला पकडायला आता आले तेव्हा त्यांना सर्वत्र शिवाजी दिसायला लागले आणि खरा शिवाजी ओळखणे कठीण झाले तेव्हा मुक्त मनाने शत्रू पळून गेले. याचा व्यावहारिक अर्थ एवढाच आहे की तुकारामांनी ईश्वराला समोर म्हणजे समोर बसलेल्या जनता-जनार्दनाला प्रार्थना केली आणि संकटात संरक्षण करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित केले. तुकारामांच्या उद्देशाने तिथल्या प्रत्येक व्यक्तीच्या अंतकरणात शिवाजीची शक्ती निर्माण झाली ते युद्ध करायला लागले आणि त्यांचे शौर्य पाहून शत्रूला पळावे लागले. तुकाराम केवळ श्रध्दाळू भक्त नव्हते ते आपल्या युगाचे खरेखुरे प्रतिनिधी होते. म्हणूनच ते जनतेचे वाचस्पती होते. त्यांनी जाती हीन-दीन जनतेला ईश्वराच्या नावाचा मंत्र देऊन उन्नत केले आणि उच्च योग्यता प्राप्त करून दिली. त्यांनी धर्म संरक्षणाचा म्हणजे आर्य धर्माच्या रक्षणाचा, दृष्ट दुर्जनांचे निर्दालन करण्याचा, त्यासाठी अभिमानपूर्वक जीवन व्यतीत

munotes.in

करण्याचा आणि शौर्य धैर्याचा आदेश जनतेला दिला. शिवाजीच्या स्वातंत्रसंपादनाच्या कार्यात मदत करण्याची प्रेरणा जनतेच्या अंतकरणात त्यांनी निर्माण केली.[ix]

## ३.६ संत बहिणाबाई :

प्रस्तावना: तुकोबांच्या वाणीचा आणि विचारांचा प्रभाव लोकमानसावर पडत होता. त्यातून प्रेरणा घेऊन अनेकांनी आपले भावविश्व फुलविले होते. त्याचा अविष्कार त्यांच्या काव्यातून होत होता. तुकाराम महाराजांचा स्वप्नसाक्षात्काराने निळोबा, महिपती, काही अंशी कचेश्वर ब्रह्मे यांचे काव्य निर्माण झाले. या सर्वात अधिक भाग्याच्या म्हणजे बहिणाबाई! त्यांना तुकोबांचा साक्षात बोध व त्यांचे कीर्तनश्रवण अशा दोन्हींचा लाभ झाला आणि ही बहिणी वारकरी संप्रदायाचा कळस झालेल्या तुकोबांची साक्षात फडकती ध्वजा बनली.[x]

**<u>बहिणाबाईंचा वाङ्मयीन परिचय</u>** :

तुकारामांच्या चरित्र मंदिरात प्रवेश करत असता प्रवेशद्वारालगतच लागणारी आनंदओवरी म्हणजे संत बहिणाबाईची जीवनगाथा होय. तुकारामांच्या समकालीन प्रभावळीत बहिणाबाई अधिक प्रभावी वाटते. रामेश्वरभट व कान्होबा आपल्या रामोपासनेमुळे वारकरी संप्रदायाकडे जाणीवपूर्वक पाठ फिरवतात, तर बहिणाबाई जाणीवपूर्वक वारकरी संप्रदायसन्मुख होऊन त्यात आत्मविश्वासाने वावरू लागते व अधिकारवाणीने बोलू लागते. तुकारामांच्या प्रत्यक्ष दर्शनापूर्वीच बहिणाबाईने स्वप्नदृष्टांताच्या आधारे त्यांना आपले सद्गुरु मानले आहे. तिच्या चरित्राचा 'तुकाराम' हाच केंद्रबिंदू झाला आहे हे सर्व लक्षात घेतले म्हणजे बहिणाबाईंच्या या सुप्रसिद्ध अभंगाची अर्थवत्ता लक्षात येऊन त्याचे महत्त्व पटते.

संत कृपा झाली | इमारत फळा आली ||

ज्ञानदेवे रचिला पाया | उभारिले देवालया ||

नामा तयाचा किंकर | तेणें रचिले ते आवार ||

जनार्दन एकनाथ | खांब दिला भागवत ||

तुका झालासे कळस | भजन करा सावकाश ||

बहिणी म्हणे फडकती ध्वजा | निरुपण केले वोजा ||

या अभंगात बहिणाबाईने केवळ वारकरी संप्रदायाची परंपराच दिली आहे असे नसून वारकरी संप्रदायातील प्रमुख संत कवींचे संप्रदायसापेक्ष कार्य व त्याचे महत्त्व ही तिने वर्णन केले आहे. तुकाराम हा वारकरी संप्रदाय मंदिराचा कळस असून आपण त्यावर फडकणारी ध्वजा आहोत अशी बहिणाबाईच्या मनाची धारणा झाली आहे.[xi]

बहिणाबाईचा उपलब्ध अभंगांचा वेध घेतला तर तीन भागात त्या अभंगांचे वर्गीकरण करता येते.

१. बहिणाबाईचा जन्मापासून तिच्या मुलीच्या जन्मापर्यंतचे अभंग २ ते ५३ या अभंगात चरित्राचा हा पहिला भाग आहे.

२. ५४ ते ७९ या अभंगात पहिल्या भागातील काही घटनांचा परत उल्लेख आलेला आहे. परतच्या उल्लेखाची कारणे शोधावी लागतात. पती-पत्नीची भिन्न प्रवृत्ती, दोघांमधील संघर्ष, पतीचा अतिशय रागीट स्वभाव, त्याने केलेली शारीरिक पीडा, शरीराचे भोग यातून निर्माण झालेला सततचा संघर्ष, स्वतःची अस्मिता टिकवण्यासाठीची तिची धडपड, 'आनंद ओवरी'तील प्रसंग, तिची साधना, तुकारामांचे दर्शन, तुकारामांकडून मिळालेले काव्यस्फूर्तीचे वरदान इत्यादी घटनांचे महत्त्व व त्या प्रसंगांतून तिची मानसिकता बोलकी झाली आहे. घटनांचा तपशीलापेक्षा तिच्या मनाचं दर्शन या भागात अधिक प्रमाणात घडते. प्रौढ, परिपक्व मनाने या प्रसंगांचे कथन केलेले आहे.

३. मृत्यू साक्षात समोर उभा असताना मृत्यूपूर्वी चार-पाच दिवस तिला तिचे बारा पूर्वजन्म स्मरतात. याचा वृत्तांत तिने आपल्या मुलाला सांगितला आहे. तेराव्या म्हणजेच चालू जन्माची हकीकतच यात आलेली आहे. या अभंगांना 'निर्याणपर' अभंग म्हणतात.[xii]

## ३.७ बहिणाबाईंचे निवडक अभंग

<u>संत बहिणाबाई निवडक पाच अभंग:</u>

**अभंग क्र. १ (१३१)**

आकार विकार निमाला विचार | एक निरंतर निर्विकल्प ||
त्वपद तत्पद असि पदातीत | अनादि-अनंत अरूप ते ||
ज्ञान ना अज्ञान अभाव ना भाव | आनंदासी ठाव मूळ नसे ||
बहेणि म्हणे जो हा इतुका तितुका | तूचि सर्व लोका अंतर्बाह्य ||

**विवेचन :** 'श्री संत बहिणाबाईंची यांची अभंगाची गाथा' या ग्रंथात बहिणाबाईंच्या नावावर एकूण ७४० अभंग दिले आहेत त्यांचे स्थूलमानाने पुढील प्रमाणे विषयवार वर्गीकरण करता येते. बहिणाबाईची कविता क्वचित श्लोकरूप असली तरी प्राधान्याने अभंगरूपच आहे. १. आदी परंपरा २. आत्मनिवेदनपर ३. निर्याणपर ४. मन:पर ५.भक्तीपर ६.सद्गुरूस्तवन ७. अनुतापपर ८.संतवर्णनपर ९. बोधपर १०. निवृत्तिपर ११. तुलसी महात्म्यपर १२.ज्ञानपर १३. नाममहात्म्यपर १४. ब्रह्मकर्मपर १५. श्री पंढरीनाथपर १६. पंढरीमहात्म्यपर १७. पतिव्रताधर्मपर १८. करुणापर १९. टोणप्याचे अभंग २०. स्फुट २१. पदे-गौळणी-भारुडे २२. आरत्या २३. श्लोक २४. करूणापर (देवाशी भांडण) बहिणाबाईने वारकरी संप्रदायाचे सर्व काव्य विषय आपल्या अभंग रचनेत हाताळलेले दिसतात; त्यातून तिच्या कवितेचे सांप्रदायिक रूप सिद्ध होते. स्थूलमानाने बहिणाबाईची कविता विषयनिष्ठ झाली आहे.[xiii] वरील अभंग भक्तीपर अभंगातला आहे. बहिणाबाई म्हणतात, आकार, विकार, विचार निमाला आहे. हे परमेशा, तूच एक निरंतर निर्विकल्प म्हणजेच भेदरहीत ज्ञान देणारा आहेस. तुझ्या चरणाचे स्थान कशाच्याही पलीकडे आहे. तुला आदी, अंत नाही, रूप नाही. तुझ्यापाशी कसले विकार नाहीत. तू स्वतःच निर्माता आहेस, आनंदस्वरूप आहेस. ईश्वरा, तूचि सर्व त्रैलोक्यात अंतर्बाह्य भरून उरला आहेस. मनात व जनात तूच आहेस, असे बहिणाबाईना या अभंगात सांगायचे आहे.

**अभंग क्र. २ (१६२)**

आकाशीचा सूर्य जळात बिंबला | तरी काय बुडाला तयामाजी ||

तैसा या शरीरी अलिप्तचि असे | इंद्रियसमरसे असोनिया ||

चुंबकदर्शने लोखंडा चळण | आत्मा देहीजाण तैसा असे ||

पूर्ण चंद्र होता सिंधूसि भरते | पैसा देह वर्ते आत्मयाने ||

आलिया वसंत येती पुष्पेफळे | तैसा देह चळे आत्मसत्ता ||

बहेणि म्हणे आत्मा सर्वांही अतीत | अनुभवे पदार्थ सर्व कळे ||

**विवेचन:** हा अभंग अनुतापपर अभंगातला आहे. आकाशीचा सूर्य पाण्यात बुडलेला दिसतो म्हणजे तो खरेच बुडाला असे होत नाही. तसाच आत्मा इंद्रियरसात बुडालेला दिसला तरी तो अलिप्त असतो. चुंबकाला जसे लोखंड वेगाने चिकटते, तसेच देह आत्म्याला चिकटलेला आहे. पूर्ण चंद्राला पाहून सागराला भरते येते. देहाचा पैस/अवकाश आत्म्याने वर्तन करतो. वसंतात झाडांना बहर येतो तसे आत्मसत्तेने देह भ्रमिष्ट होतो, चळतो. आत्मा सर्वा पलीकडे आहे. अनुभव घेऊनच प्रचिती येऊ शकते.

बहिणाबाईचे वैराग्य अगदी जन्मसिद्धच दिसते. प्रपंच लाभूनही ती मुक्त राहिलेली दिसते. मुक्ताबाईला स्त्रीजीवन सहजपणे विसरता आले. पण ते विसरता येत नाही याची खंत बहिणाबाईला सतत लागून राहिलेली आहे या जन्मजात वैराग्याची तिला पूर्णतः जाणीव असल्यामुळे असल्याचे पुढील अभंगावरून दिसते. स्त्री पण व त्यानुसार प्राप्त होणारे विधिनिषेध रूप लौकिक जीवन हे आपल्या अध्यात्मिक जीवनाच्या आड येते. कौटुंबिक जीवन साधकास बंधनकारक ठरते अशी बहिणाबाईच्या हळुवार मनाची स्वानुभवाने ती धारणा झाली होती. त्यामुळे ती आपल्या संपूर्ण जीवनाकडे विलक्षण अलिप्त वृत्तीने पाहत आहे. बहिणाबाई त्यामुळेच आत्मनिवेदन करू शकली आहे या अलिप्त वृत्तीमुळे जन्मजात वैराग यामुळे व अर्थशून्य वैवाहिक जीवनामुळे ती कौटुंबिक जीवन अनुभूतींनाही पारखी झाली आहे. या जीवनात सर्वत्र तिला संघर्ष करावा लागलेला आहे. तिच्या अभंगातून हे आपल्याला जाणवत राहते.

**अभंग क्रमांक : ०३ (२५४)**

कावळा आकाशी करीतसे गती | गरुडपक्षा रीती तेचि असे ||

काय ते मानावे समान सज्जनी | आपल्याला गुणी वोळखावे ||

सूर्याचिया तेजे वर्तीतसे जन | दीपही धरून तेज वर्ते ||

गाईगाढविणीचे सारखेचि दूध | परद्वारे निंद्य पतिव्रता ||

तुळशीचा वृक्ष आणि तो धोतरा | फणस-इंद्रावनासम पाहे ||

बहेणि म्हणे ज्ञान पाहिजे अंतरी | वस्तूचे निर्धारी कळे तया ||

**विवेचन :** हा अभंग ज्ञानपर अभंगातला आहे. कावळा आकाशी उडतो, गरूडपक्षाची रीती पण उडण्याची आहे. काय ते आपण ओळखावे. कावळा आणि गरूड जसे एकाच आकाशात उडणारे पण वेगळे तसे सज्जन (संत) आणि सामान्य लोक वेगळे. आपल्याला त्यातले गुण ओळखता आले पाहिजेत. सूर्यात तेज आहे, दीपातही तेज वर्तते, दोन्हीत फरक आहे. दूध म्हणाल तर गायीचे पण आणि गाढविणीचे दिसायला सारखेच, परद्वार( परपुरूषाचा संग) केल्याने पतिव्रता ही निंद्य ठरते. तुळस आणि धोतरा, बघायला गेले तर दोन्ही वृक्षच पण गुणात भेद आहे. फणस – इंद्रावना सम होईल का? बहेणि म्हणते, ज्ञान अंतरी पाहिजे, वस्तूचे निर्धारण तेव्हाच कळते. वस्तूचे ( ब्रह्माचे/ देवाचे) ज्ञान ( माहिती नव्हे, अनुभव - साक्षात्कार)अंतरात ( आपल्यात तो आहे/ तो आणि मी एकच असे अभेदाने ज्ञान झाले) असले पाहिजे ते सुद्धा निर्धारे( नि: संशय).

### अभंग क्र. ०४ : (३१५)

हिंगाचिया संगे कापूर नासला | लवणे विध्वंसिला क्षीरयोग ||

म्हणोनिया संग करावा तो करी | जो हो सौख्यकारी प्राणियाते ||

केशर काजळासी सांगत जालिया | काजळाचा त्या संग लागे ||

बहेणि म्हणे संग धरावा तो ऐसा | मोक्ष तो आपैसा होय जेणे ||

**विवेचन :** हा अभंग ज्ञानपर अभंगातला आहे. हिंगाच्या संगतीत कापूरही नासतो, मिठाने क्षीर म्हणजे दूध पण नासते, म्हणून मैत्री, संग सौख्यकारी करावा. केशराची काजळासी संगत झाली तर काजळाचा संग त्याला लागतो. बहेणि म्हणते, संग धरावा तो ऐसा ज्याने मोक्ष सुद्धा आपैसा म्हणजे सहजतेने होईल.

### अभंग क्र. ०५ (४१२)

देहयंत्र वाहे हरी | निजसत्ते वाजवी कुसरी ||

वाचा-तारा लाविल्या हारी | येके स्वरे वाजवी चारी ||

इंद्रियरंध्रे केली प्रगट | मनसारी लाऊनी नीट ||

ओंकारध्वनि सूक्ष्म नाद | मातृका पिळोनी शुद्ध ||

बहेणि म्हणे अनुभव घ्यावा | वाजवी कोण तो पहावा ||

**विवेचन :** देहाला यंत्र करून त्याद्वारा कोणते संगीत वाजते, ते कोण वाजवतो हा अनुभव स्वतःच घेऊन पहावा अशा आशयाचा हा अभंग आहे. कुसरी म्हणजे श्रेष्ठत्व, कुशल सुद्धा. देहाच्या यंत्रातून ईश्वर वाहात आहे आणि तो चतुरस्त्रपणे स्वसत्ता गाजवीत आहे परा, पश्यंती, मध्यमा वैखरी या चारही वाणीच्या तारा करून एका स्वरात वाजवीत आहे. सारी म्हणजे चित्तरक्षा, ती लावून इंद्रियरंध्रांना प्रकट करतो. ईश्वराचा आवाज म्हणजेच ओंकार ध्वनीचा सूक्ष्म नाद त्यातून निघतो. मातृका म्हणजे अक्षरे त्याच्या साररसातून हा ओंकार ध्वनीचा सूक्ष्म नाद होत आहे. बहिणाबाई म्हणतात, आपण अनुभव घेऊन पाहावे की हे माझ्या देहातील संगीत कोण वाजवीत आहे.

बहिणाबाईने ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, जनाबाई यांच्या अभंग वाणीने प्रभावित होऊन त्यांच्या रचनेशी मिळतेजुळते असे बरेच अभंग रचलेले आहेत. बहिणाबाईचे निर्याणपर अभंग हे तिच्या अभंग गाथेतीलच काय पण मराठीतील एकूण अभंग सृष्टीतील एक अपूर्व प्रकरण आहे. बहिणाबाईला मृत्यूच्या मांडीवर १२ पूर्व जन्माची कथा आठवावी ही घटनाच विस्मयकारक व नाट्यपूर्ण आहे. तिच्या चरित्रातील अत्यंत अलौकिक व रहस्य पूर्ण भाग तो हाच होय. बहिणाबाईचे काही अभंग हे एकाच वेळी भूत व भविष्याशी अनुसंधान साधताना दिसतात. त्यांचे मन वर्तमानाला ही भेदून भविष्याच्या अज्ञात, गुढ आणि म्हणूनच विस्मयकारक प्रदेशात अत्यंत धीटपणे व आत्मविश्वासाने प्रवेश करते.

बहीणाबाईंचे हे विलक्षण अध्यात्मज्ञान पाहून, "बाईचे हे वेदांतज्ञान पाहून आमच्या स्वतःच्या ज्ञानाच्या आकुंचितपणा बद्दल लाज वाटते." अशा अर्थाचे उद्गार कै. गुलाबराव महाराजांसारख्या अधिकारी पुरुषांनी काढले ते उगाच नव्हते.[xiv]

## ३.८ संत रामदास

**उद्दिष्टे :**

संत रामदास हे शिवकालीन महत्त्वाचे संत कसे आहेत, त्यांच्या वेगळेपणाचा परिचय आपण करून घेणार आहोत. या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- शिवकालीन संत म्हणून रामदास यांचा जीवन परिचय करून घेता येईल
- संत रामदासांचे साहित्य तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीमुळे तसे का बनले ते स्पष्ट करता येईल.
- त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा घेता येईल.
- संत रामदासांचे सांस्कृतिक कार्य आणि महाराष्ट्र धर्माचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- संत रामदास यांच्या 'मनाचे श्लोक' आणि 'आनंदवनभुवनी' या साहित्यिक प्रकरणांचा परिचय करून घेता येईल.

**प्रास्ताविक:**

तेराव्या शतकाच्या प्रारंभापासून अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत महाराष्ट्रात संत परंपरा गाजत होती या काळातील मुख्यतः धर्माधिष्ठित असे समाजजीवन संतपरंपरेने प्रभावित झाले होते वाङ्मयाचा प्रवाह याच परंपरेने अखंड राखला होता. रामदास हे या परंपरेतले अखेरचे मोठे आणि प्रभावी संत मानले जातात. त्यांच्यानंतर संतपरंपरा चालू राहिली परंतु ती क्षीण होत गेली आणि पुन्हा त्यांच्या इतका समर्थ-संत पुरुष या महाराष्ट्र भूमीवर जन्माला नाही. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास या पाच संतांनी मध्ययुगातील महाराष्ट्रात संस्कृतीचे भरणपोषण केले, जीवनमूल्यांचे रक्षण केले. या पाच संतांमधील रामदास हे अखेरचे संत त्यांचे जीवन आणि कार्य इतर चारही संतांपेक्षा वेगळे आहे.

शिवकालीन प्रवृत्तींशी आणि आकांक्षांशी पूर्णतया समरस झालेले असे कवी म्हणजे रामदास हेच एक होत. रामदासांच्या राजकारणावर महाराष्ट्रातील विद्वानात आजवर बरीच रणे माजली आहेत. रामदास यांच्या कविते पैकी 'अस्मानी-सुलतानी' व 'परचक्र निरूपण' या प्रकरणातील देश-स्थितीचे स्पष्ट वर्णन 'आनंदवनभुवन' या काव्यात व्यक्त झालेली स्वराज्याकांक्षा, 'रामवरदायिनी' या स्तोत्रात शिवाजीच्या उत्कर्षासंबंधी केलेली प्रार्थना, शिवाजीला उद्देशून लिहिलेला 'सावधानता' हा दासबोधातील समास व पुढे संभाजी लिहिलेले उपदेशपर पत्र इत्यादी आधारांवरून तत्कालीन राजकीय परिस्थितीविषयी इतर संतांच्या तुलनेने रामदास हे अधिक जागरूक होते एवढा मुद्दा पटण्यास हरकत नसावी असे वाटते. अर्थात राजकीय बाबतीत समर्थांच्या कार्याचा वाटा वैचारिक किंवा सांस्कृतिक स्वरूपाचाच होता. प्रत्यक्ष राजकारणाच्या सैनिकी किंवा मुत्सद्देगिरीच्या स्वरूपाचा नव्हता ही गोष्ट तितकीच निर्विवाद आहे. धर्म रक्षणार्थ 'स्वातंत्र्य संपादन' हे ध्येय लोकांपुढे ठेवून स्वतःच्या प्रभावी नेतृत्वाने सत्ताधारी मराठा वर्गाच्या राजकीय आकांक्षांना शिवाजीने साकार केले. तर रामदासांचा दासबोध आणि त्या वर्गाच्या आकांक्षांना प्रभावशाली तत्त्वज्ञान मिळवून दिले अशा रीतीने शिवाजी व समर्थ या दोघांचे भिन्न क्षेत्रातील एका स्वरूपाचे कर्तृत्व समकालीन तत्त्वामुळे परस्परांच्या ध्येयाला पूरक ठरले. बदलत्या देशकाल परिस्थितीप्रमाणे रामदासांनी भागवत धर्माला महाराष्ट्र धर्मांचे वळण लावले हीच त्यांची राजकारणातील लोकोत्तर कामगिरी आहे.[xv]

रामदासांचे स्फुट व ग्रंथरूप सारेच वाङ्मय प्रासंगिक सहजस्फूर्त व प्रभावी आहे. आत्मनिष्ठ काव्या या दृष्टीने साधकावस्थेतील 'करुणाष्टकां'ची रचना आहे. अभंग रचनेत संतकवी सारखी ती रचना आहे स्तोत्रे, पदे, आरत्या आहेत. आत्मनिष्ठ कवितेपेक्षा विषयनिष्ठ काव्यरचनेत रामदासांचे वेगळेपण स्पष्ट दिसते. कारण इतर संत कवींच्या मनाने रामदासांची वृत्ती व दृष्टी अधिक बहिर्मुख आहे. या वस्तुनिष्ठ दृष्टीमुळेच 'अस्मानी-सुलतानी' व 'परचक्र निरूपण' यासारख्या प्रकरणात तत्कालीन देशा स्थितीचे ठसठशीत शब्दचित्र उमटले आहे.

## ३.९ मनाचे श्लोक व आनंदवनभुवन

**<u>'मनाचे श्लोक'</u> :**

बोधपर वाङ्मयाच्या मालेचा मेरूमणी शोभेल असा मनोबोध (मनाचे श्लोक-२०५) रामदासांच्या ओजस्वी, अस्खलीत, प्रवाही व स्फूर्तीप्रद रचनेमुळे अत्यंत लोकप्रिय झाला आहे. 'स्वानुभवाचे खडे तात्विक बोल' यादृष्टीने यातील एकेका श्लोकाचे मोल फार आहे.[xvi] एकवीस समासी व दासबोध यांतील विचार सामान्य जनतेसाठी सोप्या भाषेत पण त्रुटितपणे मनाच्या श्लोकांतून रामदासांनी सांगितले आहेत. भिक्षा मागत असताना रामदासी शिष्याने प्रत्येक घरासमोर उभे राहून एक श्लोक म्हणावा व पुढे जावे म्हणजे प्रत्येक घरात एक एक विचार दिल्याचे कार्य होईल या हेतूने मनाच्या श्लोकांचे लेखन झाले. समाजमनास बोध असे त्याचे स्वरूप आहे या श्लोकांची रचना भुजंगप्रयात वृत्तात असून त्यांची संख्या २०५ आहे. त्याचे रचना स्थळ व काळ निश्चितपणे सांगता येणे कठीण आहे 'मना सज्जना भक्ती पंथेची जावे' असा भक्तीमार्गाचा उपदेश मनाच्या श्लोकातून त्यांनी सांसारिकांना केला आहे व पुढे रामभक्ती सुचविली आहे. आठव्या श्लोकात श्रीरामचरित्र आले आहे. संकटकाळात 'मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे' असे ते सांगतात 'मना चंदनाचे परी त्वा झिजावे' अशी लोकसेवेचे

शिकवण देऊन 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' अशी आदर्श जीवनाची कल्पना ते मानतात. 'जगी सर्व सुखी असा कोणी' नसल्याने मना! तू श्रीरामाचे नाव घे. तारण्यास तो समर्थ आहे. 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे | असा सर्व; भूमंडळी कोण आहे?' असा धीरही ते देतात. 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' यासारख्या स्पष्टतेतून त्यांनी कर्तव्याची आठवण करून दिली आहे. सर्वांना सहज समजेल, रूचेल, पचेल असा उद्देश अत्यंत सोप्या शब्दात मनाच्या श्लोकातून रामदासांनी केला आहे.[xvii]

केवळ लोकप्रियतेच्या दृष्टीने विचार केला तर रामदासांची 'मनाचे श्लोक' ही निर्मिती मराठी मनाला सर्वाधिक परिचित आहे असे निश्चितपणे म्हणता येईल. मनाच्या श्लोकातील पाच दहा पंक्ती ज्याला मुखोद्गत नाहीत असा मराठी माणूस बहुधा सापडणार नाही. रामनवमीच्या उत्सवासाठी साधनसामग्री मिळावी या उद्देशाने या श्लोकांची रचना झाली अशी सांप्रदायिक कथा आहे. तिची यथातथ्यता  विवाद्य असली तरी भिक्षा मिळण्यापूर्वी एक श्लोक म्हणून 'जय जय रघुवीर समर्थ' अशी ललकारी देण्याचा संप्रदाय आज तीनशे वर्षानंतरही रामदासी मंडळींनी चालू ठेवला आहे. त्याला उद्देशून लेखन करण्याचा अन्य मराठी कवींनी प्रयत्न केलेला आढळतो तथापि प्रासादिक, ओघवती भाषा आणि सूत्ररूप परंतु आशय संपन्न विचार यामुळे रामदासकृत श्लोकांचे जनमानसातील स्थान अढळ राहिले आहे. अनेक वर्षांचे पारमार्थिक चिंतन आणि सामाजिक अवलोकन यांचा परिपाक या श्लोकांत उतरलेला आहे म्हणूनच परिणतप्रज्ञ अशा रामदासांच्या या रचनेचा 'अपौरुषेय वाणी' किंवा 'दासोनिषद' अशा शब्दांनी यथार्थपणे गौरव झालेला आहे. दोनशे पाच श्लोकांच्या या काव्याला 'मनोबोध' किंवा 'मनाची शते' अशी नाव नावे दिलेली असली तरी 'मनाचे श्लोक' हे त्याचे शीर्षक सर्वमान्य झाले आहे.

श्लोकांचे अंतरंग तपासून पाहिले म्हणजे त्यात रामदासांनी निरनिराळे विचार गुच्छ एकत्रित केलेले दिसतात. कदाचित त्यांचे लेखनही प्रसंगोपात होऊन अखेरीस काही निमित्ताने त्यांनी या सर्वांचे एकत्रीकरण केले असेल. कसेही असो, पारमार्थिक आणि सामाजिक जीवनाला सदैव मार्गदर्शक ठरणारी अनेक सुभाषितवजा वाक्ये मनाच्या श्लोकात सर्वत्र विखुरलेली असून ती रामदासांच्या मर्मग्राही लेखनाचा प्रत्यय आणून देणारी आहेत. त्यांच्या अंतरंगातील उत्कट रामभक्तीचे दर्शन घडविणारे 'नुपेक्षी कदा रामदासाभीमानी', 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' किंवा 'मना सज्जना राघवी वस्ति कीजे' या ध्रुवपांचे अनेक श्लोक यात अंतर्भूत आहेत, तर 'जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा' या श्लोक समूहात 'आदर्श भक्तीची गुणवैशिष्ट्ये' नोंदविलेली आहेत. अनेक देवदेवतांच्या पसारा बाजूला ठेवून देवाचा शोध घेणाऱ्या रामदासांचे मनोगत आणि 'अनेकी सदा एक देवासि पाहे' यात दिसेल तर त्यांच्या देव विषयक उदार समन्वय दृष्टीचा प्रत्यय 'विठोनें शिरीं वाहिला देव राणा' किंवा 'जेणें जाळीला काम तो राम ध्यातो' या ओळीत प्रकट झालेला आहे. 'विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी' यासारखी तत्त्वगंभीर वाक्येही अधून मधून आढळतात. मनाच्या श्लोकातील विचार सुटे आणि विविध प्रकारचे असले तरी त्यांचीही संगती लावण्याचा प्रयत्न झालेला आहे. कै. पांगारकर यांनी 'सगुणभक्ती', 'निर्गुणबोध' आणि अखेरीस 'सगुणनिर्गुणातील शुद्ध स्वरूप' अशा तीन गटात मनाच्या श्लोकातील विषय व्यवस्था मांडून दाखविली आहे. मनाच्या श्लोकातील अनेक श्लोक किंवा वचने यांना मराठी भाषेत नित्याच्या व्यवहारातील सुभाषितांची थोरवी प्राप्त झालेली आहे. पुढील काही चरण नमुनादाखल सांगता येतील.



munotes.in

१. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे दोन
२. समाधान ते सज्जनाचेनि योगें |
३. जगी सर्व सुखी असा कोण आहे ?|
४. मना चंदनाचे परी त्वां झिजावे| परी अंतरी सज्जना नीववावे
५. तुटो वादसंवाद तो हीतकारी|[xviii]

**<u>आनंदवनभुवन :</u>**

संत रामदासांनी हिंदुस्थानभर तीर्थयात्रा केली त्यावेळची परिस्थिती म्हणजे अस्मानी-सुलतानीची होती म्हणजे सुलतानी अत्याचारांनी त्रस्त होऊन इहलोकीच्या नरक यातना सोशीत बसलेल्या हिंदू समाजाची अवस्था केविलवाणी होती. ही परिस्थिती अमुलाग्र पालटून त्या ठिकाणी प्रत्येकाला परलोकी समाधान देणारे रामराज्य निर्माण व्हावे ही रामदासांची आकांक्षा होती. हिंदू समाजाची वर्तमानकालीन दुर्दशा समाप्त होऊन भविष्यकाळात धर्मराज्य स्थापन व्हावे याची स्वप्ने त्यांना पडत होती. त्यातून त्यांची अनेक प्रकरणे निर्माण झाली आहेत. "त्यांपैकी तुमचे देशी वास्तव्य केले | परंतु वर्तमान नाही घेतले||" या ओळीने सुरू होणारे पत्र शिवाजी महाराज यांना उद्देशून लिहिलेले आहे. या पत्रासंबंधी वाद नसला तरी त्याच्या लेखनकालासंबंधित तीव्र स्वरूपाचे मतभेद आहेत. "काही उग्र स्थिती सांडावी, काही सौम्यता धरावी", हा प्रारंभ असलेले पत्र शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर लगेच संभाजीराजांना उद्देशून लिहिलेले आहे हे ही निर्विवाद आहे. या दोन पत्रांखेरीज या पत्रातून रामदासांचे समकालीन परिस्थितीचे दर्शन घडविणारे किंवा त्यावर उपाययोजना सुचविणारे विचार शब्दबद्ध झाले आहेत. ती पत्रे कोणाला उद्देशून व केव्हा लिहिली गेली या संबंधी कोणतीही अस्सल प्रमाणे उपलब्ध नाहीत. शास्त्रधर्म, सेवकधर्म, राजधर्म ही अशा स्वरूपाची पत्रे आहेत. 'अस्मानी सुलतानी' आणि 'परचक्र निरूपण' ही दोन्ही प्रकरणे त्यांनी आपल्या बारा वर्षाच्या पदयात्रेत केव्हातरी घेऊन ठेवली असावी. 'क्षात्रधर्म' आधीची प्रकरणे गंभीर अशा वैचारिक स्वरूपाची असून राजधर्माचे अनेक वर्षे चिंतन-मनन करणाऱ्या विचारवंतांनी ती पाठवलेली आहेत हे निश्चित! या सर्व प्रकरणातून रामदासांच्या जागत्या आणि जाणत्या अंतरंगाचे अंतःकरणाचे प्रतिबिंब उमटले आहे. आनंदवनभुवन हे काव्य अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे.

रामदासांच्या इतर राजकीय स्वरूपाच्या प्रकरणांपेक्षा 'आनंदवनभुवन' या काव्याचे स्थान केवळ रामदासी वाङ्मयातच नव्हे तर साऱ्या मध्ययुगीन मराठी वाङ्मयात अनन्यसाधारण अशा स्वरूपाचे आहे. ५९ ओव्यांचे हे छोटेखानी काव्य म्हणजे दुष्टांचे निर्दालन करून आणि सज्जनांचे परित्राण करून धर्मस्थापना करू इच्छिणाऱ्या अवतारी पुरुषाच्या कल्पनेने आणि दर्शनाने हर्षभरित झालेल्या रामदासांच्या संवेदनाशील अंतकरणातून उमटलेले एक दिव्य सूक्त आहे! काही अभ्यासकांनी हे सर्व उत्स्फूर्त काव्य काशीनगरीला उद्देशून आहे असे मत प्रतिपादन केले आहे, तर काहींनी हे लिहिताना त्यांच्यासमोर दंडकारण्याचे आनंदवनभुवनात परिवर्तन होणाऱ्या महाराष्ट्राचे चित्र होते असे अनुमान काढले आहे. भूतकाळ,-भविष्यकाळ, भूतकाळ-वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या तीनही काळात बघून झेपावत जाणाऱ्या त्यांच्या दिव्य प्रतिभेचे दर्शन या प्रकरणात घडते. रामदासांनी आपल्या नित्याच्या परिभ्रमणात आपल्या समाजाचे सारे ऐहिक वैभव आणि मानबिंदु यांचा विध्वंस झालेला पाहिला होता. अधर्माची शीग भरलेली पाहून पुन्हा धर्मस्थापना कशी करता येईल, या विचाराने कृतीशील असणाऱ्या पराक्रमशाली वीरांच्या जयगाथा ते प्रत्यही ऐकत होते.

'दुरितांचे तिमिर नष्ट होऊन स्वधर्मसूर्य' पुन्हा प्रकाशमान झालेला दिवस आज ना उद्या निश्चितपणे उगवणार आहे', याची स्वप्ने ते मनाशी रंगवत होते. सर्व प्रकारच्या अधिभौतिक सुखांनी समृद्ध झालेली उपासना, ज्ञान आणि कला यांच्या भरभराटीमुळे भूलोकी रामराज्याचे अवतरण झालेले पाहणारी नवी सृष्टी ते अंत:चक्षूंनी पहात होते. या सर्वांच्या प्रेरणेतून 'आनंदवनभुवना'ची निर्मिती झाली असावी. बारा वर्षांची तीर्थयात्रा आणि शिवाजी महाराजांचा उदय काल यांचा या काव्याचे निश्चितपणे निकट संबंध असावा. रामदासांच्या जीवनकार्यातील धर्माधिष्ठित राजकारण आणि ऐहिक जीवनाचा सर्वांगीण उत्कर्ष याचे प्रतिबिंब या 'आनंदवनभुवन' काव्यात स्पष्टपणे पडले आहे यात संदेह नाही.[xix]

महाराष्ट्रात चेतवला जाणारा वन्ही सर्व हिंदुस्थानभर पसरला असे त्या स्वप्नात त्यांनी पाहिले आहे. 'आनंदवनभुवन' हे प्रकरण अनुष्टुप छंदातील ५९ श्लोकांचे आहे. पहिल्या तीन चरणात सामान्यतः आठ अक्षरे असली तरी अंत्य यमक नाही आणि पाच श्लोकांशिवाय सर्वत्र 'आनंदवनभुवना किंवा भुवनी' हा चौथा चरण पालुपद म्हणून योजला आहे. तो पहिल्या तीन चरणांशी प्रत्येक वेळी अर्थाने अन्वित होतोच असे नाही. आनंदवनभुवनात या स्तोत्राचे स्फुरण झाले म्हणून या चौथ्या चरणाचे पालुपद केले आहे. 'हे महाराष्ट्राचे राष्ट्रगीत आहे' असे वै. पांगारकर म्हणतात. आनंदवनभुवन म्हणजे महाराष्ट्र असे त्यांचे मत आहे, परंतु ते केवळ महाराष्ट्राचे राष्ट्रगीत नसून सर्व हिंदुस्तानचे राष्ट्रगीत आहे. हे स्तोत्र रचताना समर्थांच्या पुढे भावी महाराष्ट्राचे जसे चित्र होते तसे संपूर्ण हिंदुस्थानाचेही होते.[xx]

एकूणच, समर्थांच्या स्फुट संभारातील 'आनंदवनभुवन' किंवा 'वनभुवन' हे एक अद्भुत प्रकरण आहे. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या तिन्ही काळावरून झेपावत जाणाऱ्या त्यांच्या दिव्य प्रतिभेचे दर्शन या प्रकरणात घडते. त्यांच्या मनात दुखणाऱ्या नाना भावनांचे कल्लोळ या प्रकरणात शब्दरूपाने जितके व जसे प्रकट करता आले तसे त्यांनी केले आहेत. नानाविध भावनांचा आवेग इतका मोठा आहे की त्याच्या प्रकटीकरणाला शब्द अपुरे पडले आहेत. तिन्ही काळात प्रमाणेच अध्यात्मातील मुक्ती, भक्तीतील शक्ती आणि दिव्य कर्मातील दीप्ती यांचे असे काही विलक्षण मिश्रण या कवितेत आहे की त्यामुळे ती काहीशी गूढ झाली आहे. हिंदुस्थानाच्या चारही दिशांना बारा वर्षे भ्रमण करून काशीला रामगंगेच्या तीरावर बसलेले असताना समर्थांच्या बुद्धी पुढे सर्व हिंदुस्थान प्रचलित परिस्थितीसह उभे राहिले आणि त्यांच्या दिव्य प्रतिभेला भावी हिंदुस्तानचे जे भव्य चित्र उभे राहिले त्याचे चित्रण शब्दांना जितके पेलणे शक्य झाले तितके त्यांनी केले आहे.

देव आणि धर्म मस्तकी धरून मराठ्यांनी जो पुढे हलकल्लोळ केला आणि हिंदुस्थानात प्रतापगडापासून पानिपत पर्यंत जो रणयज्ञ धगधगत ठेवला त्या यज्ञाचे प्रमुख व पहिले यजमान छत्रपती शिवराय होते. या रणयज्ञातील वन्हीची ज्वाला प्रतापगडाला प्रज्वलित करून तेथे त्यांनी पहिली आहुती दिली. या चेतवलेल्या वन्हीज्वालेचा पहिला साक्षात्कार समर्थांना काशीक्षेत्रांत पडलेल्या जीवनस्वप्नांत झाला. हे स्वप्न बरोबर घेऊनच ते महाराष्ट्रात आले. म्हणून या यज्ञाचे पहिले प्रमुख यजमान श्रीशिवराय होते तसे या ज्वालेचे पहिले पुरोहित समर्थ रामदास हे होते. प्रतापगडाला पहिली आहुती देऊन यजमान श्री शिवराय जेव्हा समर्थांच्या भेटीला आले तेव्हा समर्थांचा आनंद 'उत्तमपुरूषसमासात' निरुपणाच्या समासात ओसंडून वाहताना दिसतो. समर्थांना आनंदवनभुवन पडलेले स्वप्न केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही त्याने सर्व हिंदुस्थान व्यापले आहे.[xxi]

## ३.१०  संत वेणाबाई

**प्रस्तावना:** मराठी संत परंपरेत ज्ञानेश्वर नामदेवांपासून सुरू झालेली वारकरी परंपरा तुकाराम-निळोबा नंतर संपते. समर्थ रामदासांच्या कार्यानंतर वारकरी संप्रदायापेक्षा भिन्न असलेला 'समर्थ संप्रदाय' सुरू झाला. रामदास समकालीन रामनाथस्वामी निगडीकर, केशवस्वामी भामानगरकर, जयरामस्वामी वडगावकर व आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर हे चार कवी व समर्थ रामदास या सर्वांना मिळून 'दास पंचायतन' असे संबोधले जाते. याशिवाय रामदासांचे बंधू श्री श्रेष्ठ किंवा रामीरामदास, समर्थ शिष्य दिनकरस्वामी व कल्याणस्वामी, समर्थ शिष्या वेणाबाई व वेणाबाई यांची शिष्या बाईजाबाई या प्रमुख कवींचा व कवयित्री यांचा समर्थांच्या प्रभावळीत समावेश होतो.[xxii]

**<u>वेणाबाईंचा जीवनपरिचय</u>**: वेणाबाईचा जन्म कोल्हापूर येथील देशपांडे घराण्यात शके १५४९ इ. स.१६२७ च्या सुमारास झाला. त्यांचे सासर मिरजेत होते. वयाच्या दहाव्या वर्षी वैधव्याची कुऱ्हाड कोसळल्यामुळे त्यांची वृत्ती विरक्त बनून त्यांचा भक्तिमार्गाकडे ओढा लागला. एकनाथी भागवताच्या पारायणामुळे त्यांची या मार्गावरील श्रद्धा दृढ झाली व रामदासांनी दिलेल्या राममंत्राचा उपदेशानंतर त्यांची आध्यात्मिक प्रगती होत गेली. वेणाबाईंच्या ईश्वर वेडामुळे त्यांना मातापित्यांचा विरोध व जननिंदा सहन करावी लागली.

वेणाबाईंची कार्यकुशलता पाहून उपहाराची व्यवस्था ठेवण्याचे जोखमीचे काम समर्थांनी त्यांच्यावर सोपविले होते. तसेच सभेत उभे राहून कीर्तन करण्याची समर्थांचे अनुज्ञा या एकाच शिष्येला मिळाली होती. खुद्द वेणाबाईंचा शिष्य समुदायही मोठा होता.

**<u>वेणाबाईंची ग्रंथरचना</u>**: उपदेशरहस्य-कौल, पंचीकरण, श्रीरामगुहसंवाद, सिंहासन व सीतास्वयंवर, काही स्फुट पदे अशी ग्रंथरचना वेणाबाईंनी केली आहे.[xxiii]

वेणाबाईची कविता अगदी साधी घरगुती भाषेत रचलेली आहे. मुक्तेश्वरी उच्च दर्जाचे काव्य या कवितेत फारसे नाही, पण स्त्री-स्वभावाचे सहज मार्दव आणि सहृदयता या दोन गुणांच्या बाबतीत ही कविता दुसऱ्या कोणत्याही कवीच्या कवितेस हार जाणार नाही. [xxiv]

अभंगांच्या शेवटी 'वेणी म्हणे' असे शब्द आहेत पण वेणाबाईंच्या नावावर प्रसिद्ध असलेल्या काही कवितांच्या शेवटी 'वेणीस्वामी' असे नाव आहे. सीतास्वयंवर याच्या काही अध्यायाच्या शेवटी 'वेणी' असे नाव आहे व काही अध्यायाच्या शेवटी 'वेणीस्वामी' हे नाव आहे यावरून वेणाबाईने स्वतःचा उल्लेख या दोन्ही नावांनी केला आहे असे दिसते.[xxv]

खालील अभंगावरून वेणाबाईच्या पारमार्थिक अधिकाराची व अध्यात्म ज्ञानाची थोडीशी कल्पना वाचकास होते.

## ३.११  वेणाबाईंचे निवडक अभंग

**अभंग ०१ :**

आमुच्या वाटे नका जाऊं |नये ते वाटे तुम्हां लाऊ ||
आम्ही पारिखे पारिखे | न हो लोकिकासारिखे ||
अशी स्थिती जाली मोठी | पोटी ब्रम्हांडाच्या कोटी ||
वेणी स्वामी आत्माराम | तेंचि आमुचे परंधाम ||

अर्थ - अहो, तुम्ही आमच्या वाटेला जाऊ नका. उगाच तुम्हाला नको ते वाटायला लावू नका. आमची स्थिति( मनाची अवस्था) एवढी व्यापक आहे की त्यात अनंत ब्रह्मांडे मावतील (केवळ आपल्या देहात अडकलेल्या तुम्हाला त्याची कल्पना करणेही अशक्य आहे) या जगाशी आम्ही पारखे आहोत. लौकिकातल्या गोष्टी आम्हाला नकोत. त्यात आम्ही रमत नाही (न हो लौकीकासारखे) या ब्रह्मांडाच्या अनेक कोटि आम्ही पाहिल्या आहेत त्यामुळे आमची अशी स्थिती झाली आहे. काय सांगू या 'वेणीस्वामी' चे 'आत्माराम' (आत्मरुपी धाम) हेच निजधाम परमधाम आहे.

**अभंग ०२ :**

धन्य होणे सफळ जिणें रामगुणे होते |

ध्यास पडे ज्यास त्यास सत्य कळो येते ||धृ||

काळ वेळ हे सफल हित करा कांही |

सर्व काळ सुखवेळ राम भजा भाई ||१||

काय जना कोण मना मानले हे सार |

रामवीण सर्व सीण दु:ख अनिवार||२||

वळे पळे निमिष घडी जात लवलाहीं|

अजि घडे तसें हेंचि उद्यांलागिं नाही ||३||

सर्व सोडी राम जोडी भजनी नि:काम |

धन्य तुम्ही धन्य आम्ही गाऊ रामनाम ||४||

हा ही लोक परलोक त्यास सासुरवाडी |

वेणी म्हणे भक्तजनां भजने राम जोडी ||५||

**<u>विवेचन</u> :** वेणाबाईंनी जी स्फुट पदरचना केली आहे त्या पदरचनेतून त्यांचे हृद्गत आविष्कृत झालेले दिसते. प्रभू रामचंद्रांच्या दर्शनाची लागलेली ओढ तसेच रामाच्या विनियोगाची लागलेली आंतरिक तळमळ काही पदांतून व्यक्त झाली आहे. वरील अभंगाचा अर्थ असा -

"या रामगुणांचा एकदा संसर्ग झाला की जिणे सफल होते. एकदा रामाचा ज्याला ध्यास लागला; त्याला सत्य कळून येते आणि रामनामाचे स्मरण करण्यातच वेळ कसा आनंदाने (सुखवेळ) जात असतो. जनांनी या रामाविण सारभूत कोणाला मानावे? रामाविना काय आहे ? सर्वत्र अनिवार दुःख आहे. क्षणामागून क्षण निमिषा मागून निमिष जात आहे. रोज रोज काही नवीन घडते आहे. आज आहे ते उद्या नाही. सर्वसंग सोडून रामभजनी निष्कामपणे जो काळ जातो त्याने तुम्ही आम्ही धन्य झालो आहोत. लोक व परलोक ही जणू सासुरवाडीसारखी जोडली गेली आहेत आणि त्याचा अनुभव घेतलेल्या सर्व भक्तजनांना हा राम आपल्या भजनांच्या द्वारे जोडत आहे."



munotes.in

साधक अवस्थेतील तळमळ व नंतर प्राप्त झालेली निरामय अवस्था वेणाबाईंच्या स्फुट पदांत दिसते. ईश्वर साक्षात्कारानंतर त्यांच्याकडून इतरांना उपदेश केला जाणे सहाजिकच होते. ईश्वराच्या गोड नामाने साधकाची काया शितल होते. तर कधी कधी कोदंडधारी रामाच्या नामस्मरणाने अपार सागरावर सेतू बांधला जातो. अनंत कोटी ब्रम्हांड उदरी सामावली आहेत, तो प्रभु रामचंद्र सुलभ अशा नामाने प्राप्त करून घेता येतो. श्रुती ज्याला 'नेति नेति' म्हणतात. त्या परब्रह्माच्या स्वरूपाची प्राप्ती नामस्मरणाने होते.

**अभंग ०३ :**

गुरू नि:शब्दाची बीजें | आम्हां प्राप्त आत्मकाजे ||

आम्ही अबोल अबोल | अबोले बोलु बोल ||

आमची माय वांज जाली | परब्रम्ही लया गेली ||

शब्द आकाशी निमाला | आत्माराम अवघा जाला ||

वेणी स्वामियाचे संगे | आम्ही राहो आत्मरंगे ||

अर्थ - गुरू हे नाव जणू नि:शब्दाचे बीज आहे. (गुरू चा अर्थ शब्दांनी व्यक्त करता येणार नाही) आम्हाला आमच्या आत्मरूपी साक्षात्कार होण्याच्या कार्यातून हे बीज प्राप्त झाले आहे. म्हणूनच इथे बोलण्यासारखे काही नाही (सर्वकाही शब्दातीत आहे -अबोले- बोलु) माय हे नाते राहिले नाही.( माय वांझ झाली) ते परब्रम्हीच लयाला गेले आहे. शब्द आकाशाचा गुण आहे आणि तो आकाशातच लयाला गेला आहे. आणि तो अवघा 'आत्माराम' झाला आहे. स्वामीच्या संगाने वेणाई आत्मरंगी वास करते आहे.

थोडक्यात, गुरु निःशब्दाचे(ब्रह्माचे) बीज आहे. आत्मज्ञानासाठी तो आम्हाला भेटला. त्यामुळे आम्हाला शब्दातीत ब्रह्माचे ज्ञान होऊन आम्ही अबोल झालो. अबोल होणे हेच आमचे बोलणे झाले ( मौनं हे, ज्ञान झाले असे सांगते/ दर्शवते). ज्या मायेमुळे आमचा जन्म झाला ती मायाच वांझ झाली. (तिचा मनावरील पगडा नाहीसा झाला , ती ब्रह्मात विलीन झाली. शब्द जेथून निर्माण होतो, त्या आकाशात विलीन झाला. फक्त आत्मा उरला असे गुरुकृपेने घडून आले.

**अभंग ०४ :**

आम्ही गुरु नाथपंथी |ज्ञानमुद्रा दिधली हाती ||धृ||

देह माझे मन माझे | सर्व नेले गुरूराजे ||

कर्णी चढली नाममुद्रा | मुखी अगोचर मुद्रा ||

कान फाडुनि जोगीजालों | संतदर्शनासी आलो ||

वेणी स्वामींचे दर्शन | मायासंकेतनिर्शन ||

अर्थ : आम्ही नाथपंथी आहोत. गुरूने आमचे सर्व काही हिरावून नेले आहे. मी, माझे मन, देह सर्व काही नेले आणि हाती ज्ञानमुद्रा दिली. कानात नाममुद्रा कायमची वसली आहे.



munotes.in

मुखात 'अगोचरी मुद्रा' (नाथपंथीयांची एक मुद्रा : अगोचरी मुद्रा = इंद्रियांच्या पलीकडील ब्रह्माचे ज्ञान झाल्याचे दर्शवणारी. गो= इंद्रिये ,गोचर = इंद्रियांना कळणारे, अगोचर = अतीन्द्रिय) विराजमान झाली आहे. आम्ही तर 'कानफाटे' (नाथ संप्रदायाचे दुसरे नाव - वसंत पंचमीसारख्या शुभ दिवशी कान फाडून त्यांत मंत्रपूर्वक कुंडले (मुद्रा) घातली जातात. ती कुंडले माती, हरिणाची शिंगे किंवा धातू यांपैकी कशाची तरी असतात. संप्रदायातील विधवा व गृहस्थ योग्यांच्या स्त्रियाही कुंडले धारण करतात.) म्हणजेच कान फाडून (इंद्रियगम्य जगाचा , लौकिकाचा नाद सोडून) आम्ही योगी झालो. मायेचे निरसन झाले. आणि जोगी झालो आहोत आणि संत दर्शनासाठी आलो आहोत ही वेणाबाई सर्व माया अविद्या रुपी संकेत त्याचे निरसन करून स्वामींच्या दर्शनाला आली आहे.

वेणाबाईंच्या रचनेतील विविधता लक्षणीय वाटते. तिच्यात 'पंचीकरण' सारखे तत्त्वचर्चापर प्रकरण आहे, 'सीता स्वयंवरा'सारखे स्वयंवर-काव्य आहे, भावोद्रेक प्रकट करणारी स्फुट पदे आहेत. श्रीसमर्थांच्या सहवासाने आणि शिकवणुकीने परमार्थाच्या क्षेत्रात श्रेष्ठ अधिकार संपादन केलेल्या एका स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे मनोज्ञ दर्शन तिच्या रचनेतून घडते. संत वेणाबाईंनी शके १६०० मध्ये चैत्र वद्य १४ ला सज्जनगड येथे देह ठेवला.

## ३.१२ सरावासाठी स्वाध्याय

**सरावासाठी प्रश्न :**

१. संत तुकाराम शिवकालीन समाजाची सांस्कृतिक आणि सामाजिक नांगरणी कशी करत होते ते त्यांच्या अभंगातून स्पष्ट करा.

२. तुकाराम महाराजांच्या बाबतीत लोकव्यवहारात अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची असे बोलण्याचा रिवाज होऊन बसण्याची कारणे व तत्कालीन परिणाम विशद करा.

३. जातीहीनता नष्ट करण्याकरता विठ्ठलभक्ती हा उपाय आहे संत तुकारामांनी त्यांच्या अभंगात कसे विशद केले आहे ते स्पष्ट करा.

४. तुकाराम महाराजांच्या या गाथेतील तपशीलावरून सतराव्या शतकातील मावळ भागातल्या जनजीवनाचे पूर्ण चित्र कसे उभे राहते ते विशद करा.

५. संत बहिणाबाईंचे विलक्षण अध्यात्मजज्ञान कसे प्रकट होते ते निवडक अभंगांच्या द्वारे स्पष्ट करा.

६. "शिवकालीन प्रवृत्तींशी आणि आकांक्षांशी पूर्णतया समरस झालेले कवी म्हणजे समर्थ रामदास होत." हे विधान साधारण स्पष्ट करा.

७. आनंदवनभुवन या काव्यातून रामदासांनी भविष्यकालीन भारत व महाराष्ट्राचे चित्र कसे रेखाटले आहे ते स्पष्ट करा.

८. 'मनाचे श्लोक' व 'आनंदवनभुवन' या काव्यातून संत रामदास तत्कालीन समाजाला कोणता संदेश देऊ पाहत होते ते साधार स्पष्ट करा.

९. संत वेणाबाईंचे वाङ्मयीन कार्य त्यांच्या निवडक अभंग द्वारे स्पष्ट करा.

## ३.१३ अधिक वाचनासाठी पुस्तके

**अधिक वाचनासाठी संदर्भ :**

१. जोग रा.श्री. व इतर मराठी वाङ्‌मयाचा इतिहास खंड ३, (१६८१ ते १८००) महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, १९७३

२. तुळपुळे शं. गो. 'पाच संत कवी', सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९८४

३. पाटील म.सु. 'तुकाराम-अंतर्बाह्य संघर्षाची अनुभव रूपे', शाद्वल प्रकाशन, मुंबई, २००४

४. भावे वि.ल., 'महाराष्ट्र सारस्वत' खंड १ व २ पॉप्युलर प्रकाशन मुंबई

५. सरदार गं.बा., 'संत साहित्याची सामाजिक फलश्रुती', महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, १९७०

६. सरदार गं. बा., 'तुकाराम दर्शन अर्थात अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' मॉडन बुक डेपो प्रकाशन, पुणे

---

[i] जाधव मारुती भाऊसाहेब, तुकाराम बावांच्या गाथेचे निरूपण: भाग १, संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मार्च २०१९, पृ.क्र. ०७

[ii] शेणोलीकर ह. श्री., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप', प्रकाशक- मा. बा. धोपेश्वरकर, बेळगाव, प्रथमावृत्ती १९५६, पृ. क्र. ८४

[iii] संपादक राजपूत नथुसिंग डोंगरसिंग, 'श्री संत तुकाराम महाराजांची सार्थ गाथा' प्रकाशक - वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची ,जिल्हा- पुणे, प्रथमावृत्ती शके १९१८, पृ. क्र. १७८

[iv] डॉ. धोंगडे दिलीप, 'तुका म्हणे – भाग एक', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २०१२, पृ. क्र. ०८

[v] तत्रैव, पृ. क्र. १३

[vi] तत्रैव, पृ. क्र. १५

[vii] चित्रे दिलीप पुरुषोत्तम, 'पुन्हा तुकाराम', प्रकाशक- शरद चंद्र कृष्ण बेलवलकर, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९९०, पृ. क्र. २४७

[viii] डॉ. कोलते विष्णू भिकाजी, 'मराठी संतांचे सामाजिक कार्य', लोकवाङ्मय गृह , मुंबई २५, दुसरी आवृत्ती २०१४, पृ. क्र. ८१,८२

[ix] तत्रैव पृ. क्र. ८२,८३

[x] नासिराबादकर ल. रा., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी आवृत्ती, २००८, पृ. क्र. १६१

[xi] संपा. मालशे स. गं., ' मराठी वाङ्मयाचा इतिहास', महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे,खंड दुसरा, भाग दुसरा, पृ. क्र. १८४ ते १८६

[xii] प्रा. डॉ. दातार आरती, ' महाराष्ट्रातील संत कवयित्री', डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्र. आ. २००९, पृ. क्र. ५७,५८

munotes.in

[xiii] संपा. मालशे स. गं., ' मराठी वाङ्मयाचा इतिहास', महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे,खंड दुसरा, भाग दुसरा, पृ. क्र. १८८

[xiv] ज. र. आजगावकर, 'महाराष्ट्र संत कवयित्री', भारत गौरव ग्रंथमाला, १९३९, पृ. क्र. १६०

[xv] शेणोलीकर ह. श्री., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप', प्रकाशक- मा. बा. धोपेश्वरकर, बेळगाव, प्रथमावृत्ती १९५६, पृ. क्र. १००

[xvi] तत्रैव पृ. क्र. १०५

[xvii] नासिराबादकर ल. रा., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी आवृत्ती, २००८, पृ. क्र. १७०

[xviii] संपा. मालशे स. गं., ' मराठी वाङ्मयाचा इतिहास', महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे,खंड दुसरा, भाग दुसरा, पृ. क्र. २४०

[xix] तत्रैव पृ. क्र. २४६

[xx] डॉ. पेंडसे शंकर दामोदर, 'राजगुरू समर्थ रामदास', केसरी प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९७४, पृ. क्र. ३४४,३४५

[xxi] तत्रैव पृ. क्र. ३४३,३४४

[xxii] संपा. मालशे स. गं., ' मराठी वाङ्मयाचा इतिहास', महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे,खंड दुसरा, भाग दुसरा, पृ. क्र. २९७,९८

[xxiii] तत्रैव पृ. क्र. ३११,३१२

[xxiv] ज. र. आजगावकर, 'महाराष्ट्र संत कवयित्री', भारत गौरव ग्रंथमाला, १९३९, पृ. क्र. १८६

[xxv] तत्रैव पृ. क्र. १९०

❄❄❄❄❄❄❄

munotes.in